
MARATHI EDITION

# जीर्णोद्धाराचा अग्नि

## पुनरूज्जीवनाचा मार्ग



आयवन रस्किनो

मोफत डाउनलोड व कॉपी करिता

*विषय सूची*

**परिचय** — ३

**संजीवन समजून घेणे, भाग १** — ४
खरे संजीवन आणि जागृति

**संजीवन समजून घेणे, भाग २** — ६
संजीवनासाठी देवाचे हृदय

**संजीवन समजून घेणे, भाग ३** — ९
संजीवनासाठी माणसाची जबाबदारी

**संजीवन कशाने थांबते आणि कशाने जीवंत राहाते** — १३

**व्यक्तीगत संजीवन भाग १** — २०
शुभवर्तमानातील सत्ये

**व्यक्तीगत संजीवन भाग २** — २८
आनंदाचे सामर्थ्य

**व्यक्तीगत संजीवन भाग ३** — ३७
खिस्तासोबत संयोग

**व्यक्तीगत संजीवन भाग ४** — ४५
मनाचे संजीवन

**व्यक्तीगत संजीवन भाग ५** — ५२
आत्म्याने पेरणी करणे

**काळाची चिन्हे** — ५५

## परिचय

जरी सर्वसाधारणपणे, जास्तीत जास्त देशांमध्ये जीवन जगण्याचा दर्जा मागील १०० वर्षांमध्ये सुधारलेला आहे, तरी जगामध्ये अभक्ती आणि दुष्टता झपाटयाने वाढत आहे आणि समाजाच्या मुळासाठी धोका निर्माण करीत आहे. समाज, जो आपल्याला मागील पन्नास वर्षापूर्वी माहित होता, तो पुन्हा परतणार नाही, उलट प्रत्येक महिन्यानंतर समाज आणखी वाईट होत जाणार आहे. असे असले तरी, खात्री बाळगा की आम्ही विनाशाचे संदेष्टे नाही, परंतु ते आहोत जे काळाची चिन्हे समजतात आणि आशा देतात. दानीएल ११:३२-३३ त्या लोकांबाबत बोलत आहे ज्यांना देवाची ओळख आहे आणि जे निर्धाराने अमंगळतेला विरोध करतील. आणि ते बहूतांना शिकवितील. प्रियांनो, आता तयार राहा, देवाजवळ या आणि इतरांनी सुध्दा तसे करावे म्हणून त्यांची मदत करा. कारण मोठया अंधाराच्या वेळी, चर्चसाठी सुध्दा उत्तम काळ असेल, जेव्हा चर्चमधून देवाचे गौरव चमकेल, ज्याचा परिणाम मोठया कापणीत होईल. (यशया ६०:२-३).

यशया ६०:२-३, *“पाहा, अंधकार पृथ्वीला झाकीत आहे, निबिड काळोख राष्ट्रास झाकीत आहे; पण तूजवर परमेश्वर उदय पावत आहे, त्याचे तेजा तुजवर दिसत आहे. राष्ट्र तुझ्या प्रकाशाकडे येतील, राजे तुझ्या उदयप्रभेकडे येतील.”*

जगभरातील पुष्कळ ख्रिस्ती लोक आपल्या अंतःकरणात असा अनुभव घेत आहेत की, देव संपूर्ण जगात मोठया संजीवनाद्वारे येणार आहे. वास्तविक जगाच्या वेगवेगळया भागात स्थानिक संजीवने मोठया प्रमाणात वारंवार घडत आहेत (भारताचाहि त्यात समावेश आहे).

या इ पुस्तकात, तुम्हाला खालील विषय पाहावयास मिळतील :
संजीवन समजूण घेणे
संजीवनासाठी देवाचे हृदय
संजीवनासाठी माणसाची जबाबदारी
संजीवन कशामुळे थांबते
व्यक्तीगत संजीवन
काळाची चिन्हे

**निसंकोचपणे, बिनामुल्य सामग्री उतरवा आणि त्याची प्रतिलिपी करा.**

## *संजीवन समजणे : भाग १ – खरे संजीवन आणि आत्मजागृती*

**२००६ मधील शिलॉंग संजीवनाकडे पाहू या (चित्रफित पाहा)** : १९०४ मध्ये वेल्स, युनायटेड किंग्डममध्ये मोठे संजीवन आले, जेथे देवाने कोळसा खाण कामदार इव्हान रॉबर्टसचा उपयोग केला. पुष्कळ वर्षे किशोर वयात असतांना इव्हानने त्याच्या किशोरवयीन मित्रांसोबत संजीवनासाठी प्रार्थना केली होती. आणि मग वेल्स, युनायटेड किंग्डम मध्ये संजीवन आले. इव्हानची बहिण आणि तिचे पती शिलॉंग, भारताला जाण्यास निघाले आणि देवाने शिलॉंग येथील प्रेस्बेटेरीयन चर्चमध्ये, मयरांग नावाच्या गावी संजीवन आणण्यासाठी त्यांना उपयोगात आणले.

१९०६ मध्ये झालेल्या त्या संजीवनाची शताब्दी साजरी करण्याचे नियोजन करत असतांना, प्रेस्बेटेरीयन चर्च, शिलॉंगने असे ठरविले की देवाला विनंती करावी की त्याने २००६ मध्ये ते संजीवन पुन्हा पाठवावे. यासाठी २००० पासून त्यांनी प्रार्थना करण्यास सुरूवात केली आणि हळूहळू चर्चेसनी दररोज आळीपाळीने प्रार्थना करण्याची जबाबदारी घेतली. मग, एप्रिल २६, २००६ ला जेव्हा तीन हजार लोक मायरांग येथील शेतामध्ये एकत्र जमले होते तेव्हा देवाने त्यांच्या विश्वासाचा आदर केला आणि मायरांग येथे संजीवन आले आणि संपूर्ण शिलॉंगमधील चर्चेसमध्ये पसरले, पूर्ण वर्षभर – जसे की आपण चित्रफितीत पाहातो.

**शिलॉंगमधील २००६ च्या संजीवनामध्ये काय झाले?** चर्चेसमध्ये देवाची पवित्र उपस्थिती प्रकट झाली, अशाप्रकारे की, खालील घटना घडल्या :
मंडळीमध्ये मोठया प्रमाणात पश्चाताप करण्यात आला.
शेकडो लोक विश्वासाकडे येत होते.
देवाच्या उपस्थितीसाठी लोक भूकेले होते, एवढे की ते दररोज चर्चमध्ये बारा तास राहात होते.
भक्ती आणि रदबदली दररोज २० तास चालू असायची.
मुले आणि तरूण अलौकीक गोष्टी पाहात असत.
परिवार पुन्हा एकत्र आले.
तुटलेले चर्चेस पुन्हा एक झाले.
नावाचे खिस्ती पश्चाताप करून आणि समर्पण करून चर्चमध्ये वापस आले. लोक देवाच्या वचनासाठी एवढे भूकेले होते की पवित्र शास्त्र आणि गीताचे पुस्तक प्राप्त करण्यासाठी ते रांगेत उभे राहात होते.
वाढत्या प्रमाणात आरोग्यदान आणि चमत्कार घडत होते.
चर्चमध्ये आराधना सुरू असतांना देवदूत वारंवार देवदूत दिसत होते, विशेषतः लेकरानां देवदूत दिसत होते.
येशूने स्वतः बरेचदा लेकरांना दर्शन दिले आणि पुर्ण महिनाभर, क्रॉस चकाकत होता आणि येशूची एक्स आकाराची प्रतिमा दिसत होती.
वरील सर्व गोष्टी ‘‘शिलॉंग संजीवन’’ चित्रफितीत पाहावयास मिळतात आणि कमी जास्त प्रमाणात, ख-या संजीवनामध्ये त्या गोष्टी सापडतात, ज्या जगातील इतर भागात, तसेच अनेक शतकापूर्वी सुध्दा पाहावयास मिळाल्या होत्या.

**संजीवन, केवळ भावनाविवशता आणि परिवर्तन :** काही लोकांनी प्रतिक्रिया व्यक्त केली की, शिलॉंगमध्ये जे काही घडले ती केवळ भावनिकता होती. असे असले तरी, जीवने परिवर्तीत झाली, ज्याचा परिणाम कुटूंबामध्ये बदल होण्यात झाला, ज्यामुळे मंडळया बदलल्या आणि परिणामी समाजहि परिवर्तीत झाला. **परिवर्तनाचा आलेख हा ख-या संजीवनाचे पुरावा आहे.**

**संजीवन, आत्मजागृति आणि समाजाचे परिवर्तन :** पूष्कळ लोकांना वाटते की संजीवन आणि जागृती या सारख्याच गोष्टी आहेत. तसे पाहिले तर त्या एकच आहेत आणि म्हणून त्यांचा एकमेकांशी संबंध आहे. परंतु, एका बाजूने त्या भिन्न गोष्टी आहेत, जरी त्या एकमेकांना पूरक आहेत. मूळ फरक आहे की संजीवन म्हणजे चर्चमध्ये काय होते आणि जागृती म्हणजे जगात काय होते. आपल्यापैकी पुष्कळ जण असा विचार करतात की संजीवनच शेवट आहे. परंतु जेव्हा चर्चमधील खरे संजीवन समाजात, शहराता आणि आजूबाजूच्या परिसरात ओसंडून वाहात, तेव्हा त्याला जागृती म्हणता येईल, कारण त्यामुळे शेकडो आणि हजारो लोकांची मने जागृत झाली आहेत, अशी मने जी जीवंत देवाला प्रतिसाद देत नव्हती. संजीवन आणि जागृतीने समाजामध्ये क्रांती घडवून आणली पाहिजे.

जेव्हा आपण इतिहासात घडलेल्या संजीवनाचा अभ्यास करतो, तेव्हा आपल्याला कळून येते की शेकडो संजीवने झालेली आहेत. जरी संजीवन हा देवाचा महान आशीर्वाद आहे, तरी जास्तीत जास्त संजीवने थोडया काळासाठी जीवंत राहातात आणि ती जवळच्या विभागामध्ये पसरत नाहीत. म्हणून त्याचा परिणाम जागृतीमध्ये आणि समाजातील क्रांतीमध्ये होत नाही. परंतु जर संजीवने अल्प जीवीत असतील, तर मग देवाने संजीवनाची सुरूवातच का केली. मला असे वाटते की तीन कारणांसाठी देव तसे करतो.

अ. त्याच्या लोकांमध्ये फार जवळकीतेने राहण्याची देवाची नेहमीच इच्छा असते.

ब. तो नेहमीच विश्वासाचा आदर करतो. जेव्हा लोक आपल्या मनापासून देवाचा धावा करतात तेव्हा त्यांना तो सापडेला आणि संजीवन येईल.

क. तो आपल्यासोबत हे बोलत आहे की तो आपल्या पवित्रतेचा मापदंड कधीहि सोडणार नाही. म्हणून, त्याची अशी इच्छा आहे की, संजीवन सुरू झाल्यावर आपण त्याला विरोध करू नये. परंतु, जर आपण त्याचा विरोध करतो, तर संजीवन थांबेल.

**संजीवन का थांबते** याबाबत आपण पुढील अध्यायात अभ्यास करणार आहोत.

जेव्हा आपण इतिहासात घडलेल्या संजीवनाच्या आणि जागृतीच्या काही गोष्टींचा अभ्यास करतो, तेव्हा आपल्याला हा विषय अधिक चांगल्यारीतीने समजून येईल आणि आपण आपआपल्या विभागात देवाच्या अधिन होण्यासाठी आणि तो जे काही करू इच्छित आहे ते घेण्यासाठी, देवाच्या पूत्राचे या जगात गोरव वहवे म्हणून, एकमेकांसोबत अधिक चांगल्याप्रकारे सहकार्य करण्यासाठी तयार राहू.

## *संजीवन समजणे, भाग २ - संजीवनासाठी देवाचे हृदय*

जर आपल्याला माहित आहे की देवाला आपल्यासोबत फार फार घनिष्टतेने राहावयास पाहिजे, तर आपण त्याला पूर्ण अंतःकरणाने अनुसरू. देवाची आपल्यासोबत राहण्याची इच्छा त्याने आपल्यासोबत केलेल्या करारातून उत्पन्ना झालेली आहे. आपल्या सोबत असलेला देवाच्या करारबध्द संबधाबाबत देव पवित्र शास्त्रामध्ये फार महत्वाची भाषा वापरतो.

साधारणपणे, **कराराची भाषा तीन प्रकारचे सूत्र आहे :**
मी तुमचा देव होईल. (उत्पत्ती १७:७-८)
तुम्ही माझे लोक व्हाल. (निर्गम ६:७)
मी तुम्हामध्ये वस्ती करीन. (निर्गम २९:४५-४६)

जणूकाय वर आपल्या वधूला सांगतो त्याप्रमाणे हे आहे, मी तुझा पती होईल - तू माझी पत्नी होशील - आणि मी तूजसोबत राहीन.

लेविय १६:१२ कराराचे परिपूर्ण सूत्र देते, देव इस्त्राएल लोकांना म्हणतो, *''मी तुमच्यामध्ये वावरेन; मी तुमचा देव होईल व तुम्ही माझी प्रजा व्हाल.''*

परंतु आणखी पुष्कळ शास्त्रलेख आहेत ज्याचा काही किंवा पूर्ण भाग देवाला मनुष्यासोबत जो करार करावयाचा आहे, त्याचे सूत्र देतात. उदाहरणार्थ, उत्पत्ती १७:७, निर्गम ६:७, यिर्मया ३१:३३, ३२:३८, जख-या ८:८, २ करिंथ ६:१६, आणि **त्याचा शेवट प्रकटी २१:३-४ मध्ये होतो,** जेथे देव मनुष्यांसोबत राहील, तोंडोतोंड.

प्रकटी २१:३-४, *''आणि मी राजासनातून आलेली मोठी वाणी ऐकली, ती अशी : 'पाहा', 'देवाचा मंडप' मनुष्यांजवळ आहे, त्यांच्याबरोबर देव आपली वस्ती करील, ते त्याचे लोक होतील, आणि देव स्वतः त्यांच्याबरोबर राहील. तो त्यांच्या डोळयांचे सर्व अश्रू पुसून टाकील; हयापुढे मरण नाही; शोक, रडणे व कष्ट ही नाहीत; कारण पहिल्या गोष्टी होउन गेल्या.''*

जरी वरील वचन, प्रकटी २१:३-४, हे वास्तविक स्वर्गाशी संबधीत आहे, तरी आज खिस्त आपल्या अंतःकरणात वेगळया प्रमाणात, पवित्र आत्म्याच्याद्वारे राहातो.

आपण म्हणू शकतो की देवाची वस्ती तीन प्रकारे होते :

(i) सुरूवातीचे राहण्याचे प्रमाण : तो आपल्यामध्ये व्यक्तीगतरीत्या राहातो आणि सामुदायीरीत्या चर्चमध्ये सुध्दा राहातो. तरी आपल्याला त्याची उपस्थिती केवळ सुरूवात झाल्यासारखी अनुभवयास मिळते.

१ करिंथ ६:१९-२०, *"तुमचे शरीर तुम्हामध्ये वसणारा जो पवित्र आत्मा देवापासून तुम्हाला मिळाला आहे त्याचे मंदिर आहे, हे तुम्हाला ठाउक नाही काय? आणि तुम्ही स्वतःचे मालक नाही; कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहा; म्हणून तुम्ही आपल्या शरीराने देवाचे गौरव करा."*
इफिस २:२१-२२, *"त्याच्यामध्ये संबंध इमारत जोडून रचली असता प्रभूच्या ठायी वाढत वाढत पवित्र मंदिर होते; प्रभूच्या ठायी तुम्हीहि आत्म्याच्या द्वारे देवाच्या वस्तीसाठी एकत्र रचले जात आहा."*

(ii) तीव्र सामुदायीक प्रमाण : इतिहासातील संजीवन आणि आत्मजागृतीच्या वेळी(प्रेषितांची कृत्यांमध्ये) आपल्याला देवाची समक्षता तीव्रतेने सामुदायीकरीत्या जाणवते. आत्म्याच्या जगतामध्ये ती एक मुसंडी आहे आणि त्याकडून जीवनाचा मार्ग उघडला जातो. पवित्र आत्मा पूर्ण जागेवर पराक्रमाने उतरतो आणि पापाची तीव्रतेने जाणीव करून देतो, ख्रिस्तामध्ये असलेले नीतीमत्व प्रकट करतो आणि अविश्वासणा-यांकडे जो न्याय नजर टाकीत आहे त्याची त्यांना जाणीव करून देतो.
योहान १६:८-११, *"तो येउन पापाविषयी, नीतिमत्वाविषयी व न्यायनिवाडयाविषयी जगाची खातरी करील; ते माझ्यावर विश्वास ठेवीत नाहीत हयावरून पापाविषयी, मी पित्याकडे जातो आणि हयांनतर तुम्हाला मी दिसणार नाही हयावरून नीतिमत्वाविषयी; आणि हया जगाच्या अधिपतीचा न्याय झाला आहे, हयावरून न्यायनिवाडयाविषयी."*

(iii) अखेरचे प्रमाण : सार्वकालीकतेमध्ये, स्वर्गात, प्रकटी २१:३-४, २२:३-५
लक्षात घ्या देव आपल्या लोकांसोबत एक हजार वर्षाच्या काळात आनदमयरीत्या राहणार आहे. परंतु हजार वर्षांच्या काळाबाबत वेगवेगळे दृष्टिकोन आहेत, मला त्यामध्ये शिरायला नको.

संजीवन आणि आत्मजागृती तीव्र सामुदायीक प्रमाण आहेत (वर सांगितल्याप्रमाणे), जेव्हा देव आपल्या लोकांसोबत विश्राम पावतो किंवा त्यांच्यासोबत वस्ती करतो.

देव आपल्या लोकांसोबत राहातो हे लोक देवावर विसंबून राहातात त्यापेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. (लक्षात घ्या : इब्री ४:११ आपल्याला आज्ञा करण्यात आली आहे की आपण देवामध्ये विसावा घ्यावा. असे असले तरी, देवामध्ये विसावा घेत असलेल्या लोकांना आपल्या तारणासाठी, त्याच्यासोबत चालण्यासाठी देवावर विश्वास ठेवण्याची आज्ञा करण्यात आली आहे. मत्तय ११:२८-३० पाहा.

परंतु आता संजीवनामध्ये, देव या जगात वस्ती करण्याची जागा शोधतो(किवा राहण्याची), जेथे त्याचे लोक त्याची **आज्ञा** पाळतात, त्याच्या इच्छेप्रमाणे वागतात आणि त्याला **विरोध करणे सोडून** देतात. तेव्हा त्याची **समक्षता आणि त्याचे हेतू उघडपणे प्रकट होतात**.

जेथे देवाची इच्छा पूर्ण परिमानाने देवाने ठरविल्याप्रमाणे पूर्ण होते, त्या पिढीमध्ये.

त्याची समक्षता जगात जेथे अशाप्रकारे प्रकट होते जी उघडपणे अविश्वासणा-यांना समजून येते . (प्रेषित ५:१२-१६, १९:१०, २० खाली दिल्याप्रमाणे).
यशया ११:१०:*“त्या समयी असे होईल की राष्ट्रांकरिता ध्वजवत उभारिलेल्या इशायाच्या धुमा-याला राष्ट्रे शरण येतील; त्यांचे निवासस्थान गौरवयुक्त होईल*

.

प्रेषित ५:१२-१६, *“प्रेषितांच्या हातून लोकांमध्ये पुष्कळ चिन्हे व अद्भूते घडत असत; आणि ते सर्व एकचित्ताने शलमोनाच्या देवडीत जमत असत; आणि त्यांच्यात सामील होण्यास इतर कोणाचे धैर्य होत नसे, तरी लोक त्यांना थोर मानीत असत. विश्वास ठेवणारे पूष्कळ पुरूष व स्त्रिया यांचे समुदाय प्रभूला मिळत गेले. ”*

प्रेषित १९:१०,२०: *“असे दोन वर्षे चालल्यामुळे आशियात राहणा-या सर्व यहूदी व हेल्लेणी लोकांनी प्रभूचे वचन ऐकले. ............हयाप्रमाणे प्रभूच्या सामर्थ्याचे वचन वाढत जाऊन प्रबल झाले. ”*

वरील टीपणांसाठी मी खालीलप्रमाणे संदर्भ घेतला आहे :
इव्हान रस्किनो - देवाचा करार.
माईक बिकल - संजीवनावरील संदेश

## *संजीवन समजणे, भाग ३ – संजीवनासाठी मनुष्याची जबाबदारी*

देवाची खरोखर इच्छा आहे की त्याने आपल्या प्रतिमेत निर्माण केलेल्या मनुष्यासोबत राहावे. आणि एदेन बागेत मनुष्याचे पतन झाल्यापासून, देवाने त्याच्या मुक्तीसाठी योजना बनविली, यासाठी की त्याला आपल्यासोबत राहाता यावे. जुन्या करारामध्ये देव जनावरांच्या बलीदानाच्या विस्तृत पध्दतीद्वारे तो आपल्या लोकांमध्ये राहिला. त्याची पवित्र समक्षता कराराच्या कोशामध्ये होती, जो मंदिरातील पडद्याने वेगळा केला गेलेला होता. परंतु, जुन्या करारातील सर्व पध्दती केवळ छाया होत्या आणि देवाच्या पुत्राचे प्रतिक होत्या, जो मानव झाला आणि नव्या करारामध्ये त्याने येशू ख्रिस्त म्हणून आपल्यामध्ये वस्ती केली. आणि येशूचे मरण, पुनःरूत्थान आणि स्वर्गारोहणानंतर, त्याने आपल्यामध्ये वस्ती करण्यासाठी पवित्र आत्मा पाठविला. तरी, आपण त्याची समक्षता केवळ सुरूवातीची वस्ती म्हणून अनुभवू शकतो. (जसे की आपण आधीच्या अध्यायात, ''संजीवनासाठी देवाचे मन'' मध्ये पाहिले आहे. संजीवन आणि आत्मजागृतीमध्ये आपण त्याची उपस्थिती तीव्र सामुदायीक पातळीवर अनुभवू शकतो.

असे असले तरी, देवाची मनुष्यासोबत राहण्याची कितीहि इच्छा असली तरी, त्याच्या उपस्थितीचा अनुभव घेणे ही आपली जबाबदारी आहे. जर आपण देवाजवळ आलो, तर तो आपल्या जवळ येईल. देवाच्या समक्षतेमध्ये येण्यासाठी पुढाकार घेणे हे पूर्णपणे मनुष्यावर अवलंबून आहे. देवाची अशी इच्छा आहे की आपल्याला तो हवासा वाटावा आणि आपण त्याला शोधावे.

**यिर्मया २९:१३,** *''तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवेभावे माझ्या शोधास लागाल, तेव्हा मी तुम्हास पावेन.*
**याकोब ४:८,** *''देवाजवळ या म्हणजे तो तुम्हाजवळ येईल, अहो पापी जनहो, हात निर्मळ करा; अहो द्विबुध्दीच्या लोकांनो, आपली अंतःकरणे शूध्द करा.''*

अम्माउसच्या वाटेवर, जेव्हा येशूने पाहिल्यांदा शिष्यांना दर्शन दिले, तो आपल्या वाटेने गेला, जोवर त्यांनी त्याला आपल्या सोबत राहण्याचा आग्रह केला नाही.

**लूक २४:२८-२९,** *''मग ज्या गावाला ते जात होते त्याच्याजवळ आले तेव्हा त्याने पुढे जाण्याचा रोख दाखविला; परंतु ते त्याला आग्रह करून म्हणाले, आमच्याबरोबर राहा; कारण संध्याकाळ होत चालली असून दिवस उतरला आहे. तेव्हा तो त्यांच्याबरोबर राहावयास आत गेला.''*

**आपल्या जबाबदारीसंबंधी आपण या गोष्टींबाबत तीन रूपे पाहू या.**

१. प्राधान्य
२. स्थिती
३ प्रार्थना

१. **प्राधान्य**. आपण **स्तोत्र १३२:१-५** ही वचने वाचू या.

“हे परमेश्वरा, मी शोकसागरातून तुझा धावा करीत आहे. हे प्रभू, माझी वाणी ऐक; माझ्या विनवणीच्या शब्दांकडे तुझे कान लागोत. *हे परमेशा, तू अधर्म लक्षात आणिशील, तर हे प्रभू, तुझ्यापुढे कोण टिकाव धरील? तरी पण लोकांनी तुझे भय धरावे म्हणून तुझ्या ठायी क्षमा आहे.”*

**वचने १-२** : परमेश्वरासाठी निवासमंडप बनविण्यासाठी दावीद व्याकूळ झाला होता.
**वचने ३-५** : स्वतःची आर्थिक स्थिती, घरगूती जीवन आणि व्यक्तीगत सुखसोयीपेक्षा परमेश्वरासाठी निवासमंडप बनविणे ही दावीदाची उच्च प्राथमिकता होती. (खाट आणि झोप).

याचा अर्थ असा नाही की आपण आपले पारिवारीक जीवन आणि आर्थिक जबाबदा-या विसराव्या, परंतु त्याचा अर्थ हा आहे की आपण देवाला इतर सर्व गोष्टींपेक्षा जास्त प्राधान्य दिले पाहिजे. पुष्कळ ख्रिस्ती लोक मागे सरतात कारण,
(अ) ऐषआराम आणि नैतिक समस्या
(ब) पैशांवर प्रेम (देवाचा शोध करण्यात बराच वेळ जातो).
(क) व्यक्तिगत सेवेवरील प्रेम (तुमच्या प्राथमिक ध्येयापासून लक्ष विचलीत होणे).
(ड) ख्रिस्ताच्या शरीरा सोबतच्या संबंधामधील समस्या.
(इ) देवापेक्षा मनुष्याला खूश करणे.
(फ) ख्रिस्ताच्या शरीराकडून टीका होण्याची भीती.

२. **स्थिती** : याचा अर्थ असा आहे की आपण स्वतःला योग्य रीतीने सादर करावे आणि देवाने त्याची वचने पूर्ण करावी म्हणून त्याजवर अवलंबून राहावे. आठवण ठेवा - केवळ देवच देवाला प्रकट करू शकतो. देव सार्वभौम आहे आणि आपण भूकेल्या अपेक्षेने त्याच्यावर विसंबून राहावे यासाठी आपल्याला बोलावण्यात आले आहे. आपण एवढेच करू शकतो की आपल्या व्यवहारात विश्वास, शुध्दता, ईमानदारी आणि इतरांसोबतचे चांगले संबंध टिकवून ठेवावेत. (मग ते विश्वासी असो किंवा गैरविश्वासी असोत). हे जणूकाय देवाला रिकामे पात्र देउन त्याने ते पवित्र आत्म्याने भरावे यासाठी त्याच्यावर विश्वास ठेवण्यासारखे आहे. परंतु पात्र उभ्या स्थितीत पकडणे आवश्यक आहे, त्याचे तोंड वरच्या बाजूला असले पाहिजे. आडवे पात्र देव भरू शकत नाही किंवा जे पात्र उपडे आहे ते सुध्दा तो भरू शकत नाही. आडवे पात्र म्हणजे जेव्हा देवाची संजीवनाबाबतच्या इच्छेबाबत आपण पूर्णपणे आश्वस्त नसतो - त्यामुळे आपले अग्रक्रम विखरलेले असतील आणि जिद्दीचा अभाव राहिल. उपडे पात्र म्हणजे अविश्वास आणि देवाच्या हेतूसाठी कळकळीचा अभाव.

दीर्घ काळ योग्य स्थितीत राहाण्याकडून देवाच्या अभिवचनांवरील विश्वास, धीर आणि जिद्द प्रकट होतात. असे लोक अभिवचनांचा वारसा मिळवितील. आपण सातत्याने आत्म्यामध्ये पेरणी केली पाहिजे - आणि देवावर विश्वास ठेवला पाहिजे की आपण आत्म्याने कापणी करू. (गलती ६:७-१०).

स्तोत्र १०१ वर विचार करा. दावीदाला देवाच्या समक्षतेची फार उत्कंठा लागलेली होती. (वचन २) आणि त्यासाठी त्याने निश्चय केला की तो देवासमोर आपल्या जीवनात शुध्दता आणि राजा म्हणून त्याच्या पदामधील ईमानदारी राखील (वचने १-४). जरी दावीद निर्दोष जीवन जगण्याबाबत काळजी घेत होता, तरी त्याला देवावर अवलंबून राहणे भाग होते यासाठी की देवाने त्याच्याकडे पाहावे आणि स्वतःला प्रकट करावे. *"मी आपल्या घरी सरळ अंतःकरणाने वागेन." (वचन २).* रिकाम्या कपाप्रमाणे दावीदाने विश्वासाची स्थिती राखली, नम्रपणे देवावर अवलंबून राहिला आणि तो देवाने त्याचा प्याला भरावा यासाठी व्याकूळ होता.

३. **प्रार्थना** : आपण जेव्हा संजीवनाचा इतिहास वाचतो, आपल्या लक्षात येईल की सर्व संजीवने प्रार्थना चळवळीपासून सुरू झाली. जरी प्रार्थनेवर हजारो पुस्तके आहेत, तरी महत्वाच्या गोष्टी सारख्याच आहेत. प्रार्थना चळवळीत खालील गोष्टी असतील तरच ती टिकेल, अन्यथा नाही :

(i) पुढारी देवासाठी भूकेले राहातील आणि देवासमोर आपली स्थिती चांगली ठेवतील.

(ii) पुढारी प्रामाणिकपणे आणि पूर्ण अंतःकरणाने देवाच्या वचनावर भरवसा ठेवतील.

देवाची अभिवचने स्वर्गात मोकळी केली जातात, परंतु त्या अभिवचनांना धरून राहण्यासाठी आणि ती त्यांना पृथ्वीवर आणण्यासाठी आणि त्याची सत्यता अनुभवण्यासाठी मनुष्य (किंवा स्त्री) ची किंवा सहकामदाराची गरज असते. यशया ६२:६-७, *"हे यरूशलेमा मी तुझ्या कोटावर पाहरेकरी नेमिले आहेत; ते रात्रंदिवस उभे राहत नाहीत; अहो, परमेश्वराला स्मरण देणा-यांनो, तुम्ही विसावू नका; आणि तो यरूशलेम सुस्थित करून ते पृथ्वीला प्रशंसाविषय करी तोवर त्याला चैन पडू देऊ नका."*

सर्वप्रथम पुढा-यांनी देवाजवळ येण्याची किंमत मोजली पाहिजे, त्याच्याकडून ऐकावे आणि मग देवाने त्यांच्या अंतःकरणात जो दृष्टांत दिला आहे त्यासाठी इतरांना प्रेरित करावे. सर्व पुढा-यांसाठी हे खरे आहे. उदाहरणार्थ मोशे, नेहम्या आणि दावीद.

स्तोत्र १३२ चा विचार करा. वचने १-५ मध्ये दावीदाची उच्च प्राथमिकता देवासाठी आहे (प्राधान्यवरील वरील टिपणे पाहा). त्यानंतर वचने ६-८ मध्ये त्याने लोकांना प्रेरित केले.

स्तोत्र १३२:६-८, *"पाहा, एफ्राथात **आम्ही** कोशाविषयी **ऐकले;** तो वैराण प्रदेशात आम्हाला सापडला. **आपण** त्याच्या निवासमंडपात **जाऊ; त्याच्या पदासनापुढे दंडवत घालू**. हे परमेश्वरा, ऊठ; तू आपल्या सामर्थ्याच्या कोशासह आपल्या निवासस्थानी ये."*

क्रम लक्षात घ्या : आम्ही ऐकले, आम्ही आलो, चला जाऊ, दंडवत घालू. हे दावीदाचे पुढारीपण आहे, त्याने आपल्या लोकांना प्रेरीत केले.

परंतु देवासाठी घर बांधण्याची प्रेरणा दावीदाला केव्हा आणि कोठे मिळाली? जेव्हा तो त्याच्या तारूण्यात (वचन६)बेथलेहेमात होता(एफ्राथा), जे किर्याथ यारीमच्या उत्तर पश्चिम ९ ते १० मैल अंतरावर होते(यारीमचे

शेत) जेथे कराराचा कोश २० वर्षे बिना देखभालीचा पडलेला होता. माझा विश्वास आहे की परमेश्वराचा कोश पडलेला आहे आणि कोणी त्याकडे लक्ष देत नाही हे पाहून दावीदाच्या हृदयाला खेद झाला असेल. तेव्हा त्याचे मन आतल्या आत उफाळून आले आणि त्याला परमेश्वराचे मंदिर बांधण्याचा उचंबळून आलेला दृष्टांत प्राप्त झाला. प्रत्येक दृष्टांताने आपल्याला कळकळीकडे नेले पाहिजे यासाठी की त्याद्वारे आपल्याला वास्तविकतेसाठी व्याकूळता प्राप्त होईल. नेहम्या १, दानिएल ९ आणि स्तोत्र १३२ मध्ये दावीदाचे स्मरण करा.

तत्व हे आहे की, जेव्हा देवाला काहीतरी करून घ्यावयाचे असते, तेव्हा तो त्याचे कार्य एखाद्या मनुष्याच्या किंवा स्त्रिच्या मनात टाकतो, जो देवाचे वचन वाहातो जोवन ते ओझे - दृष्टांत - उचंबळलेली व्याकूळता होत नाही-कृति - आणि मग मूर्त स्वरूप! शिवाय, या दृष्टांतालीा नियमीतपणे प्रार्थना आणि उपासात बुडवले पाहिजे. असे असले तरी, हा दृष्टांत सहसा एकापासून सुरू होईल किंवा थोडया लोकांपासून सुरू होईल, परंतु देवाला लोकांमध्ये राहावयाचे असते, केवळ एका व्यक्तीमध्ये राहावयाचे नसते. जरी त्याची सुरूवात व्यक्तीपासून होते, तरी तो/ती तो दृष्टांत इतरांपर्यंत पोहोंचविण्यासाठी आणि सोबत काम करण्यासाठी त्यांची सहमती घेण्यासाठी सक्षम असला पाहिजे. (स्तोत्र १३२:६-७, *पाहा, एफ्राथात आम्ही कोशाविषयी ऐकले; तो वैराण प्रदेशात आम्हाला सापडला. आपण त्याच्या निवासमंडपात जाऊ. त्याच्या पदासनापुढे दंडवत घालू."* मोशेला इस्त्राएलांच्या वडीलांकडे पाठविण्यात आले होते, नेहम्या इस्त्राएलांच्या वडीलांकडे गेला आणि आपला दृष्टांत त्याने त्यांना सांगितला. दावीदाने संघ निर्माण केला. पुढा-याकडे शील आणि सत्यतेची विश्वासयोग्यता असायलाच पाहिजे.

दावीदाने त्याच्या पिढीमध्ये देवाच्या पूर्णत्वाची सेवा केली (प्रेषित १३:२२, ३६).

प्रेषित १३:२२, *"नंतर त्याने त्याला काढून त्यांचा राजा होण्यासाठी दावीद उभा केला आणि त्याच्याविषयी प्रतिज्ञेने म्हटले की, इशायाचा पुत्र दावीद मला माझ्या मनासारखा मिळाला आहे, तो माझ्या सर्व इच्छा सिध्दीस नेईल." "कारण दावीद आपल्या पिढीची देवाच्या इच्छेप्रमाणे सेवा करून झोपी गेला, आणि पूर्वजांबरोबर मिळून त्याला कुजण्याचा अनुभव आला."*

लोकांनी पुढा-याचे अनुसरण करावयाचे असेल तर : लोकांची खातरी पटली पाहिजे की पुढा-यामध्ये खालील सद्गूण आहेत :

(i) त्यांच्याकडे देवासाठी व्याकूळ असलेले हृदय आहे - मंडळीमध्ये ज्वाला असण्यापूर्वी पुलपीटमध्ये ज्वाला असणे गरजेचे आहे.

(ii) त्यांनी देवाची वाणी ऐकली आहे आणि त्यांना दैवी दृष्टांत मिळाला आहे.

(iii) त्यांचे शिल सुभक्तीने सिध्द झालेले आहे.

(iv) त्यांचे मन सेवा करणा-या सेवकासारखे आहे.

मोशे, नेहम्या आणि दावीदाकडे या सर्व गोष्टी होत्या.

## *संजीवन कशामुळे थांबते आणि कशामुळे टिकून राहाते?*

**१८५९** मधील उल्सटर चे संजीवन केवळ एक वर्ष टिकले. १९०४ चे वेल्समधील संजीवन काही महिने टिकले परंतु नंतर ते एका वर्षानंतर कमजोर झाले. हेब्राईड चे संजीवन १९४९ ते १९५२ पर्यंत तीन वर्षे टिकले. शिलॉंगचे संजीवन २००६ ते २००७, एक वर्ष टिकले परंतु नंतर ते कमजोर झाले. प्रश्न आहे की आपण जे मिळविले ते आपण कसे टिकवून ठेवू शकतो आणि संजीवनाची ज्योत कशी पेटलेली ठेवू शकतो? संजीवन कशामूळे थांबते? मुळ कारण आहे की जेव्हा आपण दैहीकरीत्या वागून पवित्र आत्म्याला दुखवतो.

**संजीवन का थांबते याची तत्वे आणि प्रणाली :**

**१. पवित्रता आणि शिष्यत्वाबाबत समाज गंभीर नाही.**

''संजीवनासाठी देवाचे हृदय'' या अध्यायात आपण उल्लेख केला की संजीवन आणि आत्मजागृती ही देवाची आपल्या लोकांमध्ये राहण्याच्या तीव्र इच्छेचे परिमाण आहेत, जेव्हा देव विसावतो (किंवा आपल्या लोकांमध्ये वस्ती करतो). परमेश्वर विसावण्यासाठी किंवा वस्ती करण्यासाठी पृथ्वीवर जागा शोधत असतो, जेव्हा त्याचे लोक त्याच्या इच्छेचे पालन करतात आणि त्याला विरोध करणे थांबवितात. मग त्याची समक्षता आणि हेतू उघडपणे प्रकट होतात.

जेथे त्याचा हेतू त्या पिढीमध्ये देवाच्या अभिषेकाने पूर्णत्वास जातो.

जेथे त्याची समक्षता पृथ्वीवर अशाप्रकारे प्रकट होते जी अविश्वासणा-यांना उघडपणे दिसून येते (प्रेषित ५:१२-१६, १९:१०,२०).

असे असले तरी, देव आपल्या पावित्र्याज भयावह आहे. जेव्हा संजीवन आणि आत्मजागृतीद्वारे तो आपल्या लोकांमध्ये वस्ती करतो, तेव्हा तो मागणी करतो की त्याच्या लोकांनी त्याची आज्ञा पाळावी आणि त्याला विरोध करणे थांबवावे. जर त्याचे लोक त्याला विरोध करतील, तर दोन पैकी एक गोष्ट होईल.

(अ) **संजीवन चालू राहील**. देव आपल्या लोकांमध्ये राहील, परंतु **त्याच्या पावित्र्यामुळे**, जे त्याचे शिष्य त्याला संजीवनामध्ये विरोध करतील त्यांना तो मारून टाकील. कोरह, दाथान, अबिराम आणि त्यांचे अनुयायी उदाहरणे आहेत (गणना १६), नादाब आणि अबिहू(लेविय १०:१-३), हनन्या आणि सफिरा (प्रेषित ५:१-११). परंतु संजीवन चालूच राहिल.

(अ) **संजीवन बंद होईल**. आपल्या लोकांसाठी असलेल्या प्रेमामुळे देव त्याच्या लोकांना मारून टाकण्याऐवजी तो त्यांच्यामधून निघून जाईल. आम्ही विश्वास धरतो की आपल्या अवज्ञा करणा-या लोकांना जीवे मारण्यापेक्षा,

कारण तो त्यांच्यावर प्रिती करतो, देव निघून जातो म्हणून संजीवन थांबते. असे म्हटले जाते की वेल्स संजीवनाच्या अपयशाचे एक कारण हे होते की त्याच्यामध्ये देवाच्या वचनाच्या इंधनाचा अभाव होता. शिक्षण आणि संजीवन टिकविण्यासाठी दैवी दिशा दाखवली गेली नाही.

आम्ही हा मुद्‌दा व्यक्त करीत आहोत की, तुमच्या समाजात संजीवन यावे म्हणून जर तुम्ही गंभीर असाल तर शिष्यत्व आणि पावित्र्याबाबत गंभीर व्हा. पुन्हा म्हणतो, योग्य अशा शिष्यत्वाबाबत आणि पावित्र्याबाबत गंभीर व्हा. माझ्या समजूतीप्रमाणे, प्रार्थनेसोबत, देवाने त्याचा पवित्र आत्मा आपल्यावर ओतल्यावर, या गोष्टी सुध्दा फार महत्वाच्या आहेत, जेव्हा संजीवनाची प्रतिक्षा करतांना आपण स्थिर राहातो आणि संजीवन टिकावे अशी इच्छा बाळगतो.

२. **समाज देवाचे मार्ग आणि सैतानाचे मार्ग याबाबत फारच अज्ञानी आहे**. जेव्हा संजीवन वेग पकडते, समाज उत्साही होतो, लोकांना शिकण्याची इच्छा असते आणि ते शिकण्यास तयार होतात. या वेळी, पुढा-यासाठी हे फार महत्वाचे आहे की त्याने चांगला पाया घालावा. जर चांगला पाया घातला गेला नाही, तर संजीवन जसजसे गती पकडते, शिकण्यासाठी तयार असलेले तेच लोक, त्यांच्या ‘‘आत्मिक अनुभवामुळे’’ नंतर शिकण्यासाठी तयार होत नाहीत. संजीवनापूर्वीच्या साधेपणाची जागा सैतानी ‘‘कधीहि चूकत नाही’’ अशी वृत्ती घेते. या फसवणूकीचा उगम दुष्ट आत्म्यांपासून असतो जे विश्वासणा-यांची मने भ्रांत करतात, विश्वासणा-यांची मने ते आपल्या मुठीत ठेवतात आणि विश्वासण-यांना न झूकणारे आणि अवास्तव करतात.

आम्ही जो मुद्‌दा प्रस्तुत करीत आहोत तो आहे की, जर तुमच्या समाजात संजीवन यावे याबाबत तुम्ही गंभीर असाल तर, वडीलांच्या अधीनबाबत गंभीर असा, ज्यांनी आपली प्रगल्भता आणि सुभक्ती सिध्द केली आहे.

३. **हळूहळू अतिवादाकडे ढकलले जाणे** . संजीवनामध्ये, न्याहाळलेली एक कुयूक्ती जी सैतान करतो ती ही आहे की हळूहळू जे सत्य आहे त्यापासू संजीवनाला अतिवादाकडे ढकलणे. त्याचा अर्थ आहे की एका सत्याचा बळी देउन एका दुस-या गोष्टीवर जास्त जोर देउन सत्याचा तोल ढासळण्याचा प्रयत्न होतो. सुरूवातील हा ‘‘धक्का’’ हळूवार असतो, अशा प्रकारचे विचार सूचविले जातात जे लवकरच कृतिकडे घेउन जातात. परंतु जसजसा धक्का स्विकारला जातो, आणि लोक अवाजवी बनतात, जे अशाप्रकारे फसविले जातात ते पाखंडी कालांतराने पाखंडी बनतात. अशा विश्वासणा-यांचा निर्णय काळवंडतात आणि ते दुष्ट आत्म्याने अवाजवी आणि अशास्त्रीयरीतीने प्रेरीत केले जातात.

१९०४ च्या वेल्सच्या संजीवनामध्ये, अतिवाद घूसला. आणि दिशेचा अभाव असल्यामुळे, लोक आपआपल्या गोष्टी करू लागले, ते आत्मिक पुढारीपणाच्या अधिन राहिले नाहीत.

आम्ही जो मुद्दा प्रस्तूत करित आहोत तो हा आहे की, जर तुमच्या समाजात संजीवन यावे याबाबत तुम्ही गंभीर असाल तर, अनेक देवभिरू वडीलांना गांभीर्याने घ्या आणि त्यांच्या अधिन असा.

**४. ज्याची सुरूवात देवाने केली ती चळवळ मानवी नियंत्रणाखाली संपू शकते.**

**याकोब ३:१४-१६,** *"पण तुमच्या मनात तीव्र मत्सर व तट पाडण्याचा स्वभाव आहे तर ताठा मिरवू नका, व सत्याविरूध्द लबाडी करू नका. हे ज्ञान वरून उतरत नाही तरे ते ऐहिक, इंद्रियजन्य, सैतानाकडले आहे. कारण जेथे मत्सर व तट पाडण्याचा स्वभाव आहे तेथे अव्यवस्था व प्रत्येक कुकर्म आहे."*

देवाने कार्य करण्यास आणि आपले गौरव प्रकट करण्यास सुरूवात केल्याबरोबर, असे वाटते की श्रेय आपल्याकडे घेणा-यांमध्ये दैहिक स्पर्धा सुरू होते आणि संजीवनाचे श्रेय ते आपल्याकडे घेतात. काही भन्नाट पुढारी नियंत्रण घेण्याचा प्रयत्न करतात आणि दुसरा पुढारी, चर्च किंवा संप्रदायाहून अधिक मोठेपणा मिळवितात. आत्मिक गर्व शिरतो जेव्हा जे संजीवनात असतात ते संजीवनाच्या बाहेरील लोकांकडे खालच्या नजरेने पाहातात. मत्सर आपले डोके अशा लोकांविरूध्द वर काढतो, ज्यांचा मोठया प्रमाणात उपयोग होत आहे आणि ज्यांना विपूलतेने आशीर्वाद मिळत आहे, आणि संजीवनावर हल्ला केला जातो. असे म्हटले जाते, *"टीका हा असा चिखल आहे जो मत्सर यशावर फेकत असतो."* मानवी व्यक्तीचे नियंत्रण पवित्र आत्म्याला नेहमीच दुःखी करते आणि त्याच्या निघून जाण्यास कारणीभूत ठरते. गर्व आणि महत्वकांक्षा घूसते जेव्हा लोक बेमालूपणे पदासाठी आणि मोठेपणासाठी एकमेकांसोबत चढाओढ करू लागतात. ते असा विचार करू लागतात की संजीवनावर त्यांचा ताबा आहे किंवा संजीवन त्यांच्यामुळेच आले आहे. यामुळे दुही आणि तट निर्माण होतात. आम्ही हा मुद्दा प्रस्तुत करीत आहोत की, तुमच्या समाजात संजीवन यावे असे तुम्हाला खरेच वाटत असेल तर, पुढारी स्वतः नम्रपणे राहण्याबाबत गंभीर असावेत आणि त्यांनी संजीवनाची मालकी घेउ नये.

**५. वरीष्ट पुढा-यांमधील दुफळी**

**१९०६** च्या अझूसा स्ट्रीट संजीवन आणि **१९९५** चे ब्राउन्सव्हिल संजीवन कशामुळे थांबले याबाबत संकेत स्थळावर तुम्हाला बरेच काही वाचावयास मिळेल. हे सर्व लेख वाचत असतांना मला समजले की अझूसा स्ट्रीट संजीवनाच्या बाबतीत, दुफळीचे मुख्य कारण पवित्रीकरणाचा सिध्दांत हे होते. ब्राउन्सव्हिल संजीवनामध्ये, दुफळीचे मुख्य कारण प्रमुख पुढा-यांमधील दृष्टांतातील फरक हे होते. दोन्ही संजीवनामध्ये, अझूसा आणि ब्राउन्सव्हिल, प्रमुख पुढारी कृपेशिवाय एक दुस-यापासून विभक्त झाले आणि त्यांनी पवित्र आत्म्याला खिन्न केले. आम्ही हा मुद्दा व्यक्त करीत आहोत की, जर तुमच्या समाजामध्ये संजीवन यावे असे तुम्हाला वाटत असेल तर, नम्रतेबाबत पुढारी स्वतः गंभीर असावेत. जर समेट न होण्याजोगी भिन्नता निर्माण झाली, तर माझ्या मते, विभक्त होणे कृपेने झाले पाहिजे आणि एकमेकांसोबत स्पर्धा न करता व्हावे.

**६. पुढारी आणि समाज देवासोबतची जवळीक विसरून जातात आणि कालच्या अभिषेकावर जगतात.**

मला असे वाटते की योंगी चो यांनी म्हटले प्रार्थना ही कारचा वेग वाढविणारी पट्टी आहे. जोवर पाय त्या पट्टीवर आहे तोवर कार चांगल्या वेगाने सातत्याने समोर जाते. आपला पाय एकदा पट्टीवरून निघाला तर कार अजूनहि धावत आहे असे वाटून आपली फसवणूक होउ शकते. होय कार समोर जात आहे, पण आता ती आधीच्या गतीमुळे सरकत आहे आणि कालांतराने ती थांबणार आहे.

जेव्हा संजीवन येते, तेव्हा सेवाकार्य फार मग्न असते. ही बाब आपण शिलॉंगच्या २००६-२००७ च्या संजीवन चित्रफितीत पाहू शकतो. परंतु जर त्यांनी व्यक्तीगत आणि सामुदायीक आराधनेसाठी वेळ दिली नाही तर त्यांचा पाय वेगपट्टीवरून निघेल आणि कालांतराने संजीवन थांबेल.

आम्ही हा मुद्दा सांगत आहोत की, तुमच्या समाजात संजीवन चालू राहावे असे तुम्हाला वाटत असेल तर, तुमच्या सार्वजनिक प्रार्थनेबाबत आणि तुमच्या व्यक्तीगत संजीवनाबाबत गंभीर असा, ज्याचा आरंभ पुढा-यांपासून झाला पाहिजे.

<u>संजीवन थांबले तर आपण काय करावे?</u>

जेव्हा संजीवन थांबते तेव्हा आपण त्याला पुष्टी द्यावी आणि त्या पिढीसाठी देवाने जे योजिले आहे त्याचा कृतज्ञतेने स्विकार करावा. उदाहरणार्थ, अझूझा स्ट्रीट संजीवन (१९०४) कडे पाहू, जे बहूदा प्रेषितांच्या काळापासूनचे सर्वात मोठे संजीवन असू शकते. अझूझा स्ट्रीट संजीवनमध्ये, माझा विश्वास आहे की, देवाचा हेतू होता की नविन पेंटेकॉस्टली संजीवीत करावे. तसे घडले आणि पेंटेकॉस्टल संजीवन पूर्ण जगात पसरले आणि देवाचे वचन पूर्ण झाले. परंतु अझूझा संजीवन थांबले. काहीहि असो, त्या संजीवनाचे लाभ निश्चीतच आजहि तीन प्रकारे दिसून येतात :

(i) पवित्र आत्म्याच्या दानांचे नुतनीकरण होण्यामध्ये. शतकांपासून, चर्च, रोमन कॅथॉलीक आणि प्रॉटेस्टंटहि, असा दृष्टिकोन बाळगून होते की, प्रेषितीय काळासोबत पवित्र आत्म्याची दाने थांबलेली आहेत. परंतु आत्म्याच्या दानांचे विपूलतेने झालेल्या प्रकटीकरणामुळे, विशेषतः अन्य भाषेच्या दानाकडून, भविष्यवाणी आणि आरोग्यदान याद्वारे पवित्र आत्म्याची दानांचा पूर्ण जगभर चर्चने स्विकार केला.

(ii) वंशिक तालमेळ : देवाने संजीवन सुरू करण्यासाठी, विल्यम सायमोर यांचा उपयोग करून घेतला, जेव्हा अमेरिकेते गोरे आणि काळे यांना दुभागणारी मोठी भिंत अस्तित्वात होती, जे आफ्रो अमेरिकन प्रचारक होते. सायमोर यांच्या सेवेकडून ती भिंत तूटली, ज्याचा परिणाम वंशिक मेलमिलापामध्ये झाला.

(iii) स्त्रियांची सेवा सुरू झाली. अझूझा स्ट्रीट नंतर, जेनी मूर, लकी फरो, ज्युलिया हचिन्स, क्लारा लूम आणि फ्लॉरेन्स क्रॉफर्ड या सुरूवातीच्या काही पेंटीकॉस्टल प्रचारक झाल्या, ज्यांनी पूर्ण जगभर संदेश पसरविला आणि त्यानंतर इडा रॉबीन्सन, एमी सेम्पल मॅकफर्सन या आल्या. खरोखर यातील काही स्त्रियांनी भरभराट झालेल्या सेवा सुरू केल्या ज्या आजहि अस्तित्वात आहेत. त्यापैकी प्रमुख आहेत एमी सेम्पल मॅकफर्सन यांनी स्थापन केलेले फोरस्क्वेअर चर्च आणि फ्लॉरेन्स क्रॉफर्ड यांनी स्थापन केलेले ॲपॉस्टेलीक फेथ चर्च आहे.

**३. सतत २५ वर्षे सातत्याने संजीवन टिकवून ठेवण्यामागील किल्ल्या (टोरोंटो आशीर्वाद)**

टोरोंटो आशीर्वाद या नावाने नावाजलेले संजीवन १९९४ मध्ये सुरू झाले आणि आजहि ते चालू आहे. तर मग त्याचे रहस्य कशात आहे? लॅरी स्पार्क्स, लेखक आणि ख्रिस्ती मिडीयामध्ये क्रियाशील असणारे, आपल्याला तीन कारणे देतात :

**(i) संजीवन व्यक्तीगतरीत्या गतीमान नसते, ते देवावर केंद्रित असते.** टोरोंटो रॅंडी क्लार्क किंवा अर्नोटस यांचे बाबत नव्हते. ते इत्तर वक्त्यांबाबतहि नव्हते ज्यांनी आपल्या पूलपीटवरून संदेश दिले. ती सार्वजनिक रीत्या देवासाठी असलेली भूक होती, ज्याने टोरोंटोमधील एका कोठाराच्या चर्चला ऐतिहासिक आशीर्वादासाठी बदलून टाकले. आपण देवासाठी भूकेले आहोत काय? मुसंडीसाठी नाही. आशीर्वादासाठी नाही. आपले जीवन सुधारावे याची ही चावी नाही. किंवा संजीवनाचे प्रकटीकरणहि नाही. *आपल्याला किती प्रमाणात देवाचा अनुभव घ्यायला पाहिजे आणि येशूला सर्व गौरव मिळो असे आपल्याला वाटते?*

**(ii) संजीवन साक्षीच्या संस्कृतिमध्ये टिकून राहाते.** जेव्हा आपण लक्षात घेतो की देव आपल्याला सर्वकाही मोफत देतो, तेव्हा आपणहि जगाला मोफत द्यावे यासाठी आपल्याला पाचारण मिळते, तेव्हा आपण संजीवनाचे वाहक होतो. आपली गोष्ट, आपली साक्ष. यामध्ये आपल्या तारणाच्या अनुभवापासून आरोग्यदान, पुनर्वसन झालेला विवाह, नशापाणीपासून सूटका, देवाच्या समक्षतेत वार्तालाप आणि इतर बाबींचा समावेश होतो.

साक्ष जाहीर करते की, तोच परमेश्वर ज्याने तुम्हाला हालविले, तो कोणालाहि हालवू शकतो, कारण देव कोणामध्ये पक्षपात करीत नाही. ही एक महत्वाची बाब होती जिने टोरोंटोला जन्म दिला, जेव्हा देवाचे सामर्थ्य सोडण्याची सुरूवात झाली जेव्हा रॅंडी क्लार्क यांनी आपली साक्ष दिली की पवित्र आत्म्याने किती नाटयमयरीत्या त्यांचे जीवन बदलून टाकले.

त्या क्षणापासून आजपर्यंत टोरोंटोच्या आशीर्वादामध्ये साक्ष एक सांस्कृतिक भाग आहे. लोक साक्ष देण्यासाठी उठतात तेव्हा, देवाचे सामर्थ्य त्यांच्यावर पराक्रमाने येते आणि परिणामी पूर्ण मंडळीवर उतरते. जेव्हा एका पिढीपासून दुस-या पिढीपर्यंत साक्ष देण्यात येते तेव्हा लोक त्यांनी ऐकलेल्या देवाच्या पराक्रमी कृत्यांबाबत सातत्याने बोलत राहातात. याकडून आपल्याला स्मरण होते की येशू जीवंत आहे आणि पवित्र आत्म्याला आजहि आपल्याद्वारो स्वतःचे सामर्थ्य प्रगट करण्याची इच्छा आहे!

**(iii) संजीवन तेव्हा टिकून राहाते जेव्हा लोक पश्चाता ख-यारीतीन जगतात.** पश्चाताप नाही तर संजीवन मरून जाते. ही देवाची इच्छा नाही. जीवंत, टिकावू आत्मिक फळे द्यावयाची असतील तर त्यासाठी पश्चाताप ही किल्ली आहे. पश्चातापाच्या दोन मात्रा आहेत :

- पश्चातापाची पहिली मात्रा : आपण आपल्या पापाच्या विरोधाला तोंड दिले पाहिजे. पापाला केलेला अशा प्रकारचा विरोध दैवी दु:ख निर्माण करतो जेव्हा आपल्या जीवनाची पातळी आणि देवाने जे उपलब्ध केले आहे ते आपल्याला समजून येते. पुष्कळ लोक, असे असले तरी, पश्चातापाची अशा आवृतीचे प्रवचन करतात, जी ईश्वरी दु:खाची जागा घेते, परंतु कधीहि बाहेर निघत नाही. जर आपण दु:खानंतर पदवी संपादन करीत नाही, तर आपण पश्चातापाच्या फळाला अलिंगण देणार नाही.

  पापासाठीचे दु:ख निराश आणि दंडीत विश्वासी निर्माण करीत नाही. ते दु:ख आपण सध्या देवाचा जो अनुभव घेत आहोत आणि देवाने आधीच आपल्याला जे दिले आहे त्याबाबत जागृत करते. असे दु:ख आपल्याला आपले पाप कबूल करण्यास देवाला जास्त कळकळीने शोधण्यासाठी भाग पाडते. परिणामी, आपण देवाच्या नदीचा अनुभव घेतो. चिन्हे, अद्भूते आणि चमत्कार व्हायला सुरूवात होते. आरोग्यदान - शारीरीक आणि भावनिक - तीव्र परिमाणात वाहातात.

- पश्चातापाची दुसरी मात्रा : असे असले तरी, टोरोंटो आजहि - जागतिक पातळीवर - संजीवनाचा अनुभव घेत आहे, याचे कारण हे आहे की, कारण जेथे जे होते त्यांनी पश्चातापाच्या दुस-या पातळीचा स्विकार केला. त्यामध्ये पुढा-यानी नविन द्राक्षरस बुधले स्विकारले याचा अंतर्भाव होतो.
  साक्षी वाचा आणि तुम्हाला सतत दिसून येईल की, पापासाठीच्या ईश्वरी दु:खाचा लोकांनी अनुभव घेतला. असे असले तरी, पवित्र आत्म्याचा ‘‘नवा द्राक्षरस’’ ओतला जात होता तेव्हा, तेव्हा पुढा-यांनी आपले कान स्वर्गाकडे केले, नम्रतेने देवाला मागितले, ‘‘आम्ही आमच्या जीवनात कोणते बदल करावे असे तुला वाटते, हा पवित्र आत्मा ओतला जात आहे म्हणून आम्ही चर्च कसे चालविले पाहिजे? जर संजीवन केवळ एका पिढीसाठीच, विभागासाठी किंवा लोकगटासाठी असू नये असे जर आपल्याला वाटत असेल तर ही गोष्ट फार आवश्यक आहे. आपण पवित्र आत्म्याऐवजी एखाद्या पध्दतीला किंवा रचनेला बिलगून राहिलो म्हणून देखिल आपण पश्चाताप केला पाहिजे.

ही गोंधळाची हाक नाही. हे नैसर्गिक खिस्तीपणाकडे वापस जाणे आहे, हे आधुनिकता, किंवा महान स्वरूप, चर्चच्या वाढीची मोर्चेबांधणी (यापैकी ब-याच गोष्टी चांगल्या आहेत), आपण हे पाहातो की पवित्र आत्मा कसा कार्य करीत आहे आणि आपण विचारतो, ‘आमच्यामधील पवित्र आत्म्याच्या वास्तव्याचे आम्ही कसे स्वागत करीत राहू?’’

पुढील वाचनासाठी :

http:/www.charismanews.com/opinion/42478-3keys-to-sustaining revival-20 years-after the Toronto blessing.

http:/www.charismamag.com/life/women/26097-why-the-azusa-revival-ended.

http:/www1.cbn.com/spirituallife/what-happened \-to-brownsville%27s-fire

http:/www.ephrataministries.org/remnant-2009-10why-revival-leaves.a5w

## *व्यक्तिगत संजीवन भाग १ - शुभवर्तमानाची मुलतत्वे*

**उदाहरण** : एक जण बायबल सोसायटीच्या पुस्तक दुकानात जातो आणि ''मोल कमी केलेल्या'' पवित्र शास्त्राची आवृत्ती आहे का असे विचारतो. त्याला एनआयव्ही किंवा केजेव्ही किंवा बायबल सोसायटी विकते असे कोणतेहि भाषांतर नको होते, पण त्याला ''मोल कमी केलेले'' भाषांतर पाहिजे होते. त्याचे समर्थन असे होते :

- खूप जास्त सुसमाचार नको, परंतु जे मला आनंदी करील तेवढेच पाहिजे, परंतु त्या शास्त्रात एवढे शुभवर्तमान नसावे जे वाचत राहण्याची मला सवय लागेल.
- मला नक्कीच एवढे शूभवर्तमान नको ज्याकडून मी माझ्या वै-यावर प्रेम करू लागेल, किंवा स्वनाकारावर प्रेम करील आणि माझ्या जीवनातील वासना आणि हाव यांचा द्वेष करू लागेला.
- दुस-यांना सुवार्ता सांगायला मला ओशाळल्यासारखे वाटते, आणि मला नक्कीच मिशनरी व्हायचे नाही.
- मला आनंदमय अनुभव हवेत आणि चांगले वाटायला हवे, परंतु मला मनापासून केलेला पश्चाताप नको आहे आणि परिवर्तनहि नको.
- चांगल्या, मोठया मनाच्या लोकांनी मजवर प्रीती करावी, परंतु स्वतः मला अशा लोकांवर प्रेम करावयाचे नाही जे वेगळया जातीचे आहेत, ज्यांचा पेहराव वेगळा आहे आणि तसेच ज्यांचा वास येतो अशांवर मला प्रेम करावयाचे नाही.
- मला एवढे शुभवर्तमान पाहिजे ज्याकडून माझा परिवार सुरक्षित होईल आणि माझी लेकरे चांगले वर्तन करतील, परंतु एवढे शुभवर्तमान नको ज्याकडून माझी महत्वकांक्षा बदलेल आणि माझे देणे फारच वाढेल .

हे उदाहरण पहिल्यांदा प्राध्यापक डी. ए. कार्सन यांनी दिले होते. आपण सहमत आहोत की हे उदाहरण आजच्या आधुनिक जगातील मंडळीचे चित्रण आहे आणि ते प्रेषितांच्या कृत्यांमधील पाहिल्या मंडळीपेक्षा किती भिन्न आहे. म्हणून आपण शुभवर्तमानाती मुलतत्वांसाठी कळकळीने देवाला प्रार्थना केली पाहिजे, यासाठी की आपण आपल्या जीवनात देवाचे गौरव करावे.

**शुभवर्तमान मुलतत्वांची रूपरेषाः**

- **आध्यात्मिक जीवनासाठी चार आवश्यकता** (रक्त, पश्चाताप, विश्वास, मिलाप).
- **शुभवर्तमानाचे चार घटक** (देवासाठी उच्च दृष्टिकोन, मनुष्यासाठी वास्तववादी दृष्टिकोन, देवाने पुरवठा केलेल्या प्रायश्चितावरील विश्वास, सुवार्ता सांगणे).
- **शुभवर्तमान मनावर न घेण्याचे चार वाईट परिणाम** (आवेश नाही, शिष्यता नाही, आध्यात्मिक शक्ती नाही, दैवी लक्ष्य नाही).

- **शुभवर्तमानाची मुलतत्वे मनावर घेण्याचे चार चांगले परिणाम** (नविन व्यक्ती, नविन संबंध, नविन आध्यात्मिक शक्ती, पोहोंचण्याचे नविन अंतिम स्थळ).
- **आत्मिक जीवनासाठी चार आवश्यकताः**
  १. पहिली आवश्यकता : रक्तविमोचनावाचून पापक्षमा होत नाही. *(इब्री ९:२२).*
  २. दुसरी आवश्यकता : पश्चाताप केला नाही तर तुमचा नाश होईल *(लूक १३:३).*
  ३. तिसरी आवश्यकता : विश्वासावाचून देवाला संतोषविणे अशक्य आहे *(इब्री ११:६).*
  ४. चौथी आवश्यकता : माझ्याशिवाय तुम्ही काहीहि करू शकत नाही *(योहान १५:४-५).*

**१. पहिली आवश्यकता : रक्तविमोचनावाचून पापक्षमा होत नाही** *(इब्री ९:२२)*
महात्मा गांधीना नव्या करारातील येशूची शिकवण आवडत होती, परंतु त्यांनी प्रतिक्रिया दिली की जुना करार निष्टूर आहे, कारण ते भारतीय होते आणि शाकाहारी होते आणि रक्तविमोचन हे सर्व भारतीय व्यक्तींसाठी बंडखोरपणाचे आहे. जुन्या करारातील अर्पणांमध्ये रक्त आणि रक्त सर्व ठिकाणी आहे - आणि पापक्षमेसाठी ती देवाची अट

आहे. परंतु देवाला पापक्षमेसाठी रक्तविमोचनाची आवश्यकता का आहे? कारण देवाविरूध्द पापाचे वेतन (बंडाळी) मरण आहे (रोम ६:२३). अर्थातच बैलाचे आणि बक-याचे रक्त मनुष्याच्या पापाची किंमत चूकवू शकत नाही. ते केवळ येशूच्या परिपूर्ण रक्ताकडे अंगूलीनिर्देश करत होते. येशू देव आहे आणि मानवाच्या पापाची किंमत मोजण्यासाठी तो मनुष्य झाला. (आणखी सांगायचे म्हणजे आपल्यापैकी कोणीहि पशूचे रक्त आपल्या शरीरात टाकणार नाही, परंतु केवळ दुस-या मानवाचे रक्त आपण आपल्या शरीरात सोडू, मग त्या व्यक्तिची जात किंवा सामाजिक दर्जा कोणताहि असेल. कोणत्याहि प्राण्याचे रक्त आपल्या पापाची किंमत भरू शकत नाही).
मानव संस्कृति अभ्यासक (जे मानवाचा इतिहास आणि मानवी संस्कृतिचा अभ्यास करतात), असे म्हणतात की जगातील प्रत्येक लोकगटाने, त्यांच्या इतिहासात कधीतरी, देवाचा राग शमविण्यासाठी रक्तार्पण केले आहे.

*जगातील सर्व धर्मांमध्ये, खिस्ती धर्म सोडून, उपासकांकडून त्यांच्या देवाकडे रक्त वाहात असते, यासाठी की त्यांच्या पापांसाठी त्यांच्या देवाला आलेला राग शमवावा. परंतु खिस्ती धर्मामध्ये आपल्याला पापापासून शुध्दता मिळावी म्हणून देवाकडून आपल्याकडे रक्त वाहाते. आपल्याला केवळ त्याच्या बलिदानावन विश्वास ठेवावयाचा आहे. हा फार मोठा फरक आहे!* (अज्ञात स्त्रोत). आपण यशया ६:१-९ चा अभ्यास करतांना हे पाहातो.

**दुसरी आवश्यकता : पश्चाताप केला नाही तर तुमचा नाश होईल** *(लूक १३:३).*
पुष्कळ लोक असे समजतात की ते ठीक आहेत आणि त्यांनी काही चांगली कामे केली आहेत, तर मग देव त्यांना का दोष लावेल आणि देव प्रेमळ नाही का? परंतु असे दिसते की त्यांना समजत नाही की आपल्या

अंतःकरणाच्या खोलीमध्ये आपण देवाविरूध्द बंड करणारे आहोत आणि म्हणून आपली सर्व सत्कृत्ये घाणेरडया चिंधीसारखी होतात (इब्री वाक्प्रचार, मासिक पाळी) *(यशया ६४:६)*.

पश्चाताप हा खोलवरची ओळख आहे की देवाच्या नजरेत, आपण त्याच्याविरूध्द बंड करणारे आहोत आणि म्हणून आपल्याला त्याची माफी आणि नविनीकरणाची गरज आहे. जेव्हा यशयाने पवित्र परमेश्वराला पाहिले, यशया ६:१-८ मध्ये, तेव्हा त्याला आपल्या पापीष्टपणाची लगेच जाणीव झाली. तोवर, मी म्हणेन की यशया एक ब-यापैकी चांगला मनुष्य होता. परंतू ही जाणीव की आपण पापी आहोत, आणि पवित्र देवापासून विभक्त केलेले आहोत, ही एक देवाचीच देणगी आहे - हे सर्वोच्य देवापासून मिळालेले प्रकटीकरण आहे. आणि परमेश्वराच्या सान्निध्यात, आपल्याला कळते, जसे यशयाने केले, आपण नाश पावलेले पापी आहोत. *यशया ६:१-८* पाहा.

*“उज्जीया राजा मरण पावला त्या वर्षी प्रभूस उच्चस्थळी असलेल्या उच्च सिहासनावन बसलेले मी पाहिले; त्याच्या भोवताली सराफीम उभे होते; त्या प्रत्येकाला सहासहा पंख होते; दोहोंनी तो आपली तोंड झाकी, दोहोंनी आपले पाय झाकी, व दोहोंनी उडे. ते आळीपाळीने उच्च स्वराने म्हणत, पवित्र! पवित्र! पवित्र! स्नोधीश परमेश्वर! अखिल पृथ्वीची समृध्दी त्याचे वैभव होय! घोषणा करणा-यांच्या हया वाणीने उंबरठे हालले व मंदिर धुराने भरले. तेव्हा मी म्हणालो, हाय, हाय! माझे आता वाईट झाले, कारण मी अशुध्द ओठांचा मनुष्य आहे आणि मी अशुध्द ओठांच्या लोकांत राहतो; आणि सेनाधीश परमेश्वर राजाधिराज हयास मी आपल्या डोळयांनी पाहिले.*

*मग एक सराफदूत वेदीवरील इंगळ चिमटयाने हाती घेउन मजकडे आला; तो माझ्या ओठास लावून त्याने म्हटलेख पाहा, याचा स्पर्श तुझ्या ओठास झाला आहे, तुझ्या पापाचे प्रायश्चित झाले आहे. तेव्हा मी प्रभूची वाणी ऐकली ती अशी, मी कोणाला पाठवू? आमच्यासाठी कोण जाईल? तेव्हा मी म्हणालो, हा मी आहे, मला पाठीव.”*

आपण पापी आहोत ही एक झाली एक गोष्ट, परंतु आपण पापी आहोत हे समजणे ही दुसरी गोष्ट आहे. लोक असा विश्वास ठेवत नाहीत की ते पापी आहेत आणि देवाच्या क्रोधाचे धनी आहेत. ते समजतात की ते ठीकठाक आहेत. *योहान १६:९* मध्ये येशू म्हणतो, जेव्हा पवित्र आत्मा येईल तेव्हा तो जगाची पापाविषयी खात्री करील आणि जगाला पाप, नीतीमत्त्व आणि न्यायाच्या बाबतीत चूक ठरविल. (त्यांना वाटते त्यांचे ठीक चालू आहे, आणि ते जाणूनबाजून येशूवर विश्वास ठेवणे नाकारतात आणि म्हणून त्यांचा न्याय होईल). यासाठीच आपल्याला देवाच्या उच्च दृश्यासाठी प्रार्थना करण्याची गरज आहे (किंवा देवाच्या उच्च मानसन्मासाठी आणि देवाच्या भयासाठी) यासाठी की आपण पश्चाताप करावा. *यशया ६:६-७* मध्ये, यशयाला स्वर्गातून प्रायश्चित मिळाले आहे आणि ते देवाला संतोषविण्याकरीता केलेल्या मानवाच्या सत्कृत्यामुळे मिळालेले नाही. प्रायश्चित येशूबाबत बोलते. आणि मग, आपण सुवार्तेच्या घोषणेकडे येतो *(यशया ६:८)*.

- **यशया ६:१-८ मधील शुभवर्तमानाचे चार घटक.**

***वचने १-४ :*** प्रथम देवाला उच्च सिहांसनावर पाहाणे, हे देवाची आशा धरण्याकडून प्राप्त होते, जे देवाचे वचन वाचणे/ऐकणे/प्रार्थना करणे याकडून प्राप्त होते. स्मरण ठेवा, केवळ देवच देवाला प्रकट करू शकतो).
***वचन ५ :*** दुसरा घटक आहे मनुष्याबाबत सत्य दृष्टिकोन, की तो पूर्णपणे वाईट झालेला पापी आहे, त्याचा परिणाम खोलवर पश्चाताप करण्यामध्ये होतो.
***वचने ६-७ :*** तिसरी गोष्ट स्वर्गातून प्रायश्चित पुरविले गेले. (परमेश्वराच्या कृपेने), जे येशूद्वारे असलेल्या सुटकेबाबत बोलत आहे. (ज्यामध्ये त्याचे मरण आणि पुनःरूत्थान यांचा संबंध आहे), ज्याचा आपण विश्वासाने स्विकार केला पाहिजे.
***वचन ८ :*** शेवटी शुभवर्तमान इतरांना सांगणे हे येते.

***वचन १ ते ८*** च्या दरम्यान आपला पूर्ण ख्रिस्ती अनुभव येतो. कसा काय? बघा, जर आपण परमेश्वराला उच्च स्थानी बसलेले पाहात नाही, तर मानवी व्यवहारावरील, परमेश्वराचे सार्वभौमत्व आपल्याला कधीहि समजणार नाही. शुभवर्तमानाचे चार घटक न समजण्याचे चार वाईट परिणाम दिसून येतील.

- **शुभवर्तमानाचे घटक मनावर न घेतल्याचे चार वाईट परिणाम :**

(i) **शुभवर्तमानासाठी काहीहि आवेश राहात नाही,** परंतु आपला जगिक दृष्टिकोन मानवतावादाकडे झूकलेला राहील. देवाच्या वचनाबाबत आपला दृष्टिकोन खालच्या दर्जाचा असेल, प्रार्थना करण्यासाठी आणि शुभवर्तमान सांगण्यासाठी आपल्याला उत्साह वाटणार नाही. चांगली एकव गोष्ट आपण करू ती म्हणजे दुस-यांना चांगले बनविणे. आणि कालांतराने, आपण जगातील गोंधळ पाहून स्वतःचा गोंधळू आणि आपण आपल्या प्रयत्नांबाबत आशा गमावून बसू. "काय उपयोग आहे"? आणि मग आपण स्वतःसाठीच जगू.

(ii) **आपण पश्चाताप करणार नाही,** कारण आपला पश्चाताप जगिक दुःखामध्ये मूळावलेला असेल. (आपल्याला नेहमी भीती वाटेल की आपली पातके जगासमोर येतील). परंतु खरा पश्चाताप दैवी दुःखामुळे होतो जो आपण देवाला दुखावले हे समजल्यामुळे होत असतो.

(iii) **शिष्यत्व नाही**. आपले शिष्यत्व आणि दुस-यांना शिष्य बनविण्याचा आवेश अस्तित्वातच राहाणार नाही आणि जास्तीत जास्त आपण सुभक्तीच्या स्वरूपाकडे कलले जाऊ. (मानवी नैतिकता), परंतु विजयी जीवन जगण्यासाठी आणि दुस-यांना तसे जीवन जगण्यास मदत करण्यासाठी, आपल्यामध्ये शक्ती असणार नाही. (२ तीमथी ३:५).

(iv) **राज्याकडे लक्ष राहणार नाही**. आपल्या जीवनात आपले सारे लक्ष आपले भले कसे होईल याकडे राहील आणि जगामध्ये आपण इतरांना सुध्दा तीच मदत करू की ते स्वतःचे कसे भले करतील. परंतु तुमचे लक्ष राज्यावर केंद्रित आहे किंवा नाही याची तपासणी करण्यासाठी तुम्ही तुमची

वेळ(जीवन तपासणी), आणि तुमचा पैसा (शक्तीची तपासणी) कुठे खर्च करता हे समजून घ्या. याद्वारे हे प्रकट होईल की तुम्ही देवाचे राज्य यावे आणि त्याची इच्छा जशी स्वर्गात पूर्ण होते तशी पृथ्वीवर पूर्ण व्हावी हे शोधीत आहात का(त्याचे शासन). वास्तविक अशा मनुष्याचे तारण झाले आहे किंवा नाही याबाबत मी प्रश्न विचारतो.

आज जगभरातील मंडळया या बाबींसोबत परिचीत आहेत, असे तुम्हाला वाटत नाही काय?

**३. तिसरी आवश्यकता : विश्वासावाचून देवाला संतोषविणे अशक्य आहे** *(इब्री ११:६).*

देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकूलता एक पूत्र मानवाच्या पापांसाठी प्रायश्चित म्हणून दिला - सर्व जगासाठी मारला जावा म्हणून - यासाठी की जो कोणी त्याजवर विश्वास ठेवतो त्याचा नाश होउ नये तर त्याला सार्वकालीक जीवन प्राप्त व्हावे (योहान ३:१६ मधील चांगला संदेश). परंतु जर आपण देवाने ख्रिस्ताद्वारे दिलेला तारणाचा प्रस्ताव स्विकारत नाही तर आपला नाश होईल (विश्वास विरहीत).

आपण तारण करणा-या विश्वासाबाबत बोलत आहोत. तर, तो विश्वास काय आहे जो आमचे तारण करतो? तो विश्वास म्हणजे भरवसा ठेवणे की येशू मरण पावला आणि त्याने तुमच्या सर्व पापांसाठी आपले रक्त ढाळले आणि तो तिसरे दिवशी मेलेल्यातून पुन्हा उठला (पूर्णपणे भरवसा ठेवणे). हा विश्वास एखाद्या चांगल्या खूर्चीवर पूर्णपणे भरवसा ठेवण्यासारखे आहे जिच्यावर तुम्ही भरवसा ठेवता की तुमचे पूर्ण वजन ती पेलू शकेल. त्या खूर्चीवर बसण्यासाठी तुम्ही आशंकीत नसता.

पाहा, तुमचे तारण करण्यासाठी येशूवर पुर्ण विश्वास ठेवत नाही तर दुसरा मार्गच नाही! तुमचा वारसा, तुमच्या चर्चचे सभासदत्व, तुमची सत्कृत्ये, तुमचे पवित्र शास्त्राचे ज्ञान याकडून तुमचे तारण होत नाही - केवळ येशूवर विश्वास ठेवल्याने तुमचे तारण होते! आता, ख्रिस्तामध्ये वाढण्यासाठी मंडळीचे सभासदत्व आणि पवित्र शास्त्राचे ज्ञान आपल्यासाठी महत्वाचे आहे, आणि कोणीहि त्याकडे दुर्लक्ष करू नये (इब्री १०:२५, १ थेस्सलनी ५:१२). परंतु येथे, आपला विश्वास तारणासाठीचा विश्वास हा आहे आणि आपली वाढ हा नाही. जर स्वर्गातून पुरविण्यात आलेल्या प्रायश्चितावर (यशया ६:६-७, वरील दुसरा मुद्दा), तूमचा विश्वास नाही (भरवसा), तर तुमचा नाश होईल!

**परंतु, जेव्हा तुम्ही तुमचा पूर्ण विश्वास येशूवर ठेवता तेव्हा काहीतरी फार चांगले घडते.**

❖ **शुभवर्तमानाची मुलतत्वे मनावर घेतल्यामुळे घडणारे चार चांगले परिणाम :**

**(i)** **नवीन व्यक्ती** : तुम्ही नविन उत्पत्ती होता, जुने ते होऊन गेले, पाहा ते नविन झाले आहे *(२ करिंथ ५:१६).* तुम्हाला नविन हृदय आणि नविन आत्मा मिळतो ज्याकडून तुम्ही आज्ञा पाळू शकता आणि प्रभूची सेवा करू शकता *(यहज्केल ११:१९, ३६:२५-२७, इब्री ८:१०, इब्री १०:१५-१६).*

**(ii)** **देवासोबत नविन संबंध :**

तुम्ही देवाचे मुल होता. *(योहान १:१२-१३, १ योहान ३:१).*

येशू आणि पिता तुमच्यावर असे प्रेम करतात जसे ते एक दुस-यांवर प्रेम करतात. *(योहान १५:९, १७:२३).*

खिस्त येशूमधील प्रीतीपासून तुम्हाला कोणीहि विभक्त करू शकणार नाही. *(रोम ८:२८-३९, योहान १०:२७-३०).*

खिस्ताच्या शरीरामध्ये आणि त्याच्या कुटूंबामध्ये तुमचा बाप्तिस्मा झाला आहे (समावेश करण्यात आला आहे. *(१ करिंथ १२:१३).*

अंधाराच्या राज्यातून तुमची सूटका करण्यात आली आहे आणि तुम्हाला पुत्राच्या राज्यात ठेवण्यात आले आहे, जो तुमच्यावर प्रेम करतो, ज्याच्यामध्ये तुम्हाला सुटका मिळाली आहे आणि पापांची क्षमा मिळाली आहे. *(कलस्सै १:१३-१४).*

वरील दोन परिणाम फार महत्वाचे आहेत कारण ते नविन जन्माची फळे आहेत. जर आपण हे फळ पाहात नाही, तर आपण शंका घेउ शकतो की ही व्यक्ती शुभवर्तमानांच्या मुलतत्वांवर खरोखर विश्वास ठेवते किंवा नाही. असा विश्वास खोटा आहे, आपला विश्वास सहज भरवसा ठेवल्यासारखा नसावा, किंवा नाममात्र किंवा केवळ मनामध्ये असलेला नसावा, आपला विश्वास फळांद्वारे साध्य झालेला असावा - अन्यथा तो खोटा विश्वास आहे. *(योहान १५:६, याकोब २:१७).*

*(iii)* **पाप आणि जगित मोहांवर विजय** मिळविण्यासाठी नविन आत्मिक शक्ती मिळतेः कारण प्रत्येक जण जो देवापासून जन्मलेला आहे तो जगावर विजय मिळवितो आणि पाप करीत राहात नाही. *(१ योहान ५:४, १८).* तुम्हाला शांती मिळेल, जी जग देऊ शकत नाही *(योहान १६:३३, रोम ५:१).* तुम्ही येशूची आज्ञा पाळता तेव्हा, त्याचा आनंद तुमच्यामध्ये राहिल आणि तुमचा आनंद पूर्ण होईल. *(योहान १५:११).*

(iv) **नविन गंतव्य स्थान** : तुमचा नाश होणार नाही तर तुम्हाला सार्वकालीक जीवन मिळेल (योहान ३:१६). तुमचे भौतिक शरीर शेवटच्या दिवशी उठवले जाईल *(१ करिंथ १५:२२).* अंधाराच्या राज्यातून तुम्हाला वाचविण्यात आले आहे आणि पुत्राच्या राज्यात ठेवण्यात आले आहे, जो त्याच्यावर प्रीत करतो, ज्याच्यामध्ये तुम्हाला मुक्ती आणि पापांची क्षमा मिळाली आहे. *(कलस्सै १:१३-१४).*

वरील परिणामांव्यतिरिक्त आणखी बरेच परिणाम आहेत. परंतु यापैकी कोणताहि परिणाम तुम्ही केलेल्या सत्कृत्यांनी मिळविता येणार नाही. हे सर्वकाही देवाने आपल्याला विनामुल्य दिले आहे, जेव्हा तुम्ही त्याचा पूत्र येशू खिस्त याजवर विश्वास ठेवता! तो स्वर्गातून आलेले अवर्णनिय दान होतो. तुम्ही जेवढा त्याच्यावर विश्वास ठेवता आणि त्याप्रमाणे जगता, तेवढा तुम्ही देवाचा सन्मान करता. तुम्ही जेवढा कमी विश्वास ठेवता तेवढा कमी तुम्ही देवाचा सन्मान करता. येशू म्हणाला, *"देवाचे काम हेच आहे की, ज्याला त्याने पाठविले त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा " (योहान ६:२९).* हे लाभ मिळावे म्हणून मोठया प्रकटीकरणासाठी आपण आशीर्वाद दिला

पाहिजे, विश्वास ठेवला पाहिजे आणि प्रार्थना केली पाहिजे. *इफिस १:१७-२१* मध्ये पौलाने मोठया प्रकटीकरणासाठी प्रार्थना केली. जेवढे जास्त तूम्हाला हे परिणाम समजतात, तेवढे तुम्ही तुमच्या सामर्थ्यवान निर्माता आणि मुक्तीदात्यासोबत वाढत जाता जो तुमच्यावर अमर्यादीपणे प्रेम करतो. *विलापगीत २:१४* प्रमाणे आपण ख्रिस्तामध्ये लपविलेले आहोत (त्याच्या खडकाच्या कपारीमध्ये) आणि म्हणून आपण देवासाठी मनोहर आहोत आणि आपण त्याच्याजवळ यावे म्हणून तो आपल्याला आमंत्रण देतो कारण तो आपल्यावर फार प्रीती करतो. आपली आराधना मोहक होईल आणि आपले अंतःकरण देवाच्या सान्निध्यातील सार्वकालीक आनंदाच्या शांतीने, प्रेम आणि ख-या आनंदाने भरून जाईल. जीवनाचा मार्ग येशू आहे, जो मार्ग आहे, सत्य आणि जीवन आहे, त्याच्यावाचून कोणीहि पित्याकडे जात नाही. *(योहान १४:६)*. आपल्या भक्तीमध्ये आपण देवाचे जास्त आणि जास्त सौंदर्य शोधले पाहिजे. ही एक गोष्ट आहे जिचा आपण पाठलाग केला पाहिजे. भक्तीमध्ये, आपण देवाची वाणी ऐकणे, आरोग्य, सुटका, पूर्णता, शांती आणि आनंद शोधला पाहिजे.

*"गीतरत्न २:१४, अगे माझे कपोते, खडकाच्या कपारीत, कडयाच्या अडोशास राहणा-ये, मला तुझे मुख पाहू दे, तुझा शब्द मला ऐकू दे, कारण तुझा कंठ मधूर आहे, तुझे मुख रम्य आहे."*

*स्तोत्र १६:११, "जीवनाचा मार्ग तू मला दाखविशील, तुझ्या सान्निध्याता पूर्णानंद आहे; तुझ्या उजव्या हातात सौख्ये सदोदीत आहेत."*

*स्तोत्र २७:४, परमेश्वराजवळ मी एक वरदान मागितले, त्याच्या प्राप्तीसाठी मी झटेन, ते हे की आयुष्यभर परमेश्वराच्या घरात माझी वस्ती व्हावी; म्हणजे मी परमेश्वराचे मनोहर रूप पाहत राहीन व त्याच्या मंदिरात ध्यान करीन."*

**४. चौथी आवश्यकता : माझ्यावाचून तुम्ही काहीहि करू शकत नाही.** ***(योहान १५:४-५)***

ख्रिस्तासोबत भागीपण. जेव्हा आपण हा शास्त्रभाग योहान १५ या संदर्भ घेउन वाचतो तेव्हा आपल्याला कळते की आपले त्याच्यासोबतच्या भागीपणाबाबत येशू बोलत आहे. येशूशिवाय आपण कोणत्याहि परिस्थितीत फळ देउ शकत नाही.

आता नवीन हृदय आणि नविन आत्माने (तिसरा मुद्दा पाहा) ख्रिस्तामध्ये संयुक्त झाल्यामुळे तुम्ही प्रेरीत व्हाल आणि चांगली कामे करण्यासाठी, पवित्र आत्म्याने चालाल जी ख्रिस्ताने तुमच्यासाठी आधीच योजून ठेविली होती. *(इफिस २:१०)*. हे ऐश्वर्यपूर्ण फळ आहे, जे सार्वकालीकरीतीने राहिल. **मुख्य फळ आहे ख्रिस्ताचे शिष्य होणे *(योहान १५:८)* आणि एका किंवा जास्त प्रकारे इतरांना शिष्य बनविणे *(मत्तय २८:१९)*, दुस-या शब्दात सांगायचे तर, ख्रिस्तासारखे चरीत्र आणि ख्रिस्ताच्या सेवाकार्यात सहभागी होणे.**

*"योहान १५:८, तुम्ही विपूल फळ दिल्याने माझ्या पित्याचे गौरव होते आणि तुम्ही माझे शिष्य व्हाल."*

*"मत्तय २८:१९, तेव्हा तुम्ही जाउन सर्व राष्ट्रातील लोकांना शिष्य करा, त्यास पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या."*

आपण मोलवान पाषाण होतो की लाकूड आणि भूसा होतो हे ठरविण्यासाठी, एके दिवशी आपल्या सर्व कामांची परीक्षा अग्निने केली जाणार आहे *(१ करिंथ ३:१०-१५)*. जर ख्रिस्तावरील तुमचा विश्वास अस्सल आहे तर

त्याचा परिणाम फळांमध्ये होईल (चांगली कामे) जी तुम्ही खिस्तासोबत संयुक्त असल्यामुळे कराल आणि तुम्हाला त्यासाठी प्रतिफळ मिळेल. जर फळे नाहीत तर मग तुमचा विश्वास एकतर खराच नाही आणि मग खिस्तासोबतचे तुमचे भागीपण नकली आहे आणि ते निष्फळ जोडले गेले आहे - अशी फांदी द्राक्षवेलातून कापूण टाकण्यात येईल आणि तिचा नाश होईल. (योहान १५:६). येथे, मी नविन ख्रिस्ती लोकांना उत्तेजन दिले पाहिजे की त्यांनी देवावर विश्वास ठेवणे सुरू ठेवावे आणि प्रार्थना करणे, पवित्र शास्त्र वाचणे, आणि शिश्य होण्यासाठी देवाच्या आणि तुमच्या मंडळीच्या पुढा-यांच अधीन राहिले पाहिजे. हळूहळू तुम्ही फळ द्याल, जे टिकून राहिल.

असे असले तरी, चांगले काम जे केवळ खिस्तासोबत संयुक्त असल्यामुळे केले जाईल, ते देवाची उपकारस्तुती केल्याने आवडते होते, कारण त्याने तुमचे तारण केले आणि त्याच्या राज्यासाठी तुम्हाला उपयुक्त पात्र बनविले. याकडून तुम्ही नम्र झाले पाहिजे कारण खरेतर तारण पावण्यापूर्वी तुम्ही दिवाळखोर आणि जगिक व्यकती होता (लूक १७:७-१० मधील अपात्र दासाचा दाखला वाचा). अर्थातच देव आपल्याला पारितोषिक देण्याचे वचन देतो, पण आपली वृत्ती कृतज्ञ आणि नम्र असली पाहिजे.

## शुभवर्तमानाचे महत्व :

येशूचे शुभवर्तमान हे आणि केवळ हेच पित्यासोबत संबंध ठेवण्याचा मार्ग आहे (योहान १४:६). म्हणून, शुभवर्तमान आणखी सुंदर, आश्चर्यजनक आणि स्वर्गातून आलेली खूपच चांगली बातमी होत. आपण आपल्या संपूर्ण जीवनभर शुभवर्तमानाच्या मूलतत्वांबाबत शिकत राहावे, त्यांचे मनन करावे, कारण त्यामुळे आपल्या जीवनात नवीन ज्ञान मिळत राहील, विशेषतः खिस्ताच्या अद्भूत सौंदर्याबाबत. आपण त्याचा प्रचार करावा, ते वाटावे आणि त्याविषयी बोलावे, जेव्हा शक्य आहे तेव्हा आणि आपण तसे केले म्हणजे आपण त्यांच्यासाठी सर्वात मोठा आशीर्वाद होऊ. शिष्यतमध्ये, व्यक्तिगत संजीवनासाठी आणि फलदायी जीवनासाठी देवाची खरी भक्ती करायची असेल तर त्यासाठी सुवार्ता हा गौरवी रस्ता आहे.

## *व्यक्तीगत संजीवन, भाग २ - आनंदाचे सामर्थ्य*

आनंदाचे तत्व : देवाचे राज्य नीतीमत्व, शांती आणि आनंद आहे. (रोम १४:१७). तर मग स्वर्ग आनंददायी असला पाहिजे. जसे स्वर्गात तसे देवाचे राज्य पृथ्वीवर यावे अशी आपण प्रार्थना करतो. देवाचा पृथ्वीवरील प्रतिनिधी, पवित्र आत्म्याला वाटते की मंडळीला आनंदाने भरून टाकावे. मंडळीतील दुःखाचे कारण हे आहे की आपण देवासोबत योग्यप्रकारे जोडले गेलो नाही. दुःखी चर्च देवाला गौरव देवू शकत नाही.

*रोम १४:१७-१८, ''कारण खाणे व पिणे हयात देवाचने राज्या नाही, तर नीतिमत्व, शांती, व पवित्र आत्म्याच्या द्वारे मिळणारा आनंद हयात ते आहे. कारण हया प्रकारे जो ख्रिस्ताची सेवा करितो तो देवाला ग्रहणीय व मनुष्यांना पसंत आहे.''*

**रूपरेषा :**

१. परमेश्वर आनंदी आहे.
२. जेव्हा आपण देवासोबत योग्य संबंध जोडतो तेव्हा तो आपल्याला आनंद देतो.
३. आनंदाचे सामर्थ्य
४. येशू आनंदी आहे आणि आपणहि आनंदी असावे अशी त्याची इच्छा आहे.
५. आनंदाचे लूटारू
परंतु, ध्यानात ठेवा : तुम्ही दुःखात असूनहि नेहमी आंनदी असू शकता. (२ करिंथ ६:१०).

**१. परमेश्वर आनंदाने भरलेला आहे : तो स्वतःमध्ये आनंद करतो, जे सर्वकाही तो करतो त्यामध्ये आणि आपल्या लोकांसाठी पण आनंद करतो.**

**(अ) परमेश्वर स्वतःमध्ये आनंद करतो** : या विश्वातील सर्वात मोठे धन हे खुद्द परमेश्वर आहे - त्याच्या चारित्र्याची उत्कृष्टता, त्याच्या पवित्रतेचे सौंदर्य, त्याच्या गौरवाचा डौल आणि सामर्थ्य. कोणीहि त्याच्यासोबत चूकूनहि तूलना करू शकत नाही. तो जो काही आहे त्यामध्ये तो आनंद करतो. निर्मीतीमधील देवाच्या पुत्राविषयी बोलायचे झाले तर, *नीतीसुत्रे ८:२७-३१* म्हणते, ''*त्याने आकाश स्थापीले तेव्हा मी होते. जेव्हा त्याने जलाशयाची चक्राकार मर्यादा ठरविली, जेव्हा जलाशयाचे झरे जोराने वाहू लागले; जलांनी त्याची आज्ञा उल्लंघू नये म्हणून जेव्हा त्याने समुद्राला मर्यादा घालून दिली, जेव्हा त्याने पृथ्वीचे पाये रेखिले, तेव्हा मी त्याच्यापाशी कुशल कारागीर होतो; मी त्याला नित्य आनंददायी होते; त्याच्यासमोर मी सर्वदा हर्ष करी. मनुष्यजातीच्या ठायी मी हर्ष पावत असे.*''
*यशया ४:८* त्याच्या नावाच्या व्याकूळतेबाबत बोलते. जेव्हा परमेश्वर अवज्ञा करणा-या इस्त्राएल लोकांना ताडण करीत होता तेव्हा तो म्हणाला, *यशया ४८:११, ''माझ्या, केवळ माझ्याच प्रीत्यर्थ हे मी करितो; माझ्या नामीच अप्रतिष्टा का व्हावी! माझे गौरव मी इतरास देत नाही.''*

**(ब) देव आपल्या निर्मीतीमध्ये आनंद करतो आणि निर्मीती देवामध्ये आनंद करते.**

*ईयोब ३८:४-७, ''मी पृथ्वीचा पाया घातला तेव्हा तू कुठे होतास? तुला समजण्याची अक्कल असेल तर सांग द्य तिचे मोजमाप कोणी ठरविले बरे? तिला मापनसूत्र कोणी लाविले? हे तुला ठाऊक आहे काय? तिच्या स्तंभाचा पाया कशावर घातला? तिची कोनशिला कोणी बसविली? त्या समयी प्रभातनक्षत्रांनी मिळून गायन केले व सर्व देवकुमारांनी जयजयकार केला.'' (स्तोत्र १०४:३१ सुध्दा वाचा).*

*स्तोत्र १००:१, ''अहो पृथ्वीवरील सर्व लोकहो, परमेश्वराचा जयजयकार करा, हर्षाने परमेश्वराची सेवा करा. गीत गात त्याच्यापुढे या.''*

*स्तोत्र ९६:१२, ''शेत व त्यातील सर्वकाही उत्सव करोत; मग वनांतील सर्व झाडे परमेश्वरासमोर आनंदाचा गजर करितील.''*

*स्तोत्र ९८:६, ''कर्णा व शिंग वाजवून परमेश्वर राजासमोर जयघोष करा.''*

*यशया ४४:२३, ''हे आकाशा, जयघोष कर, कारण परमेश्वराने हे केले आहे; अहो पृथ्वीच्या अधोभागांनो, हर्षनाद करा; अहो, पर्वतांनो, हे वना, हयातील प्रत्येक वृक्षा, तुम्ही जयजयकार करा; कारण परमेश्वराने याकोबास उध्दरिले आहे; तो इस्त्राएलाच्या ठायी आपला प्रताप प्रगट करितो.''*

*यशया ४९:१३, ''हे आकाशा, जयजयकार कर; हे पृथ्वी, आनंद कर; अहो पर्वतांनो, जयघोष करा; कारण परमेश्वराने आपल्या लोकांचे सांत्वन केले आहे, आपल्या पीडलेल्या लोकांवर दया केली आहे.''*

**(क) परमेश्वर पृथ्वीवरील आपल्या सत्तेसाठी आनंद करितो कारण तो आपल्या कृत्यात दयाळू, न्यायी आणि नीतीमान आहे.**

*यशया ४६:१०, ''मी आरंभीच शेवट कळवितो, होणा-या गोष्टी घडविण्यापूर्वी त्या मी प्राचीन काळापासून सांगत आलो आहे; माझा संकल्प सिध्दीस जाईल, माझा मनोरथ मी पूर्ण करीन.'' (मी आनंद करतो). (स्तोत्र ११५:३, १३५:६ सुध्दा वाचा).* होय परमेश्वर ते करतो ज्यात त्याला आनंद आहे, परंतु परमेश्वर निर्दयी नाही. उलट तो दयाळू, न्यायी आणि नीतीमान आहे.

*यिर्मया ९:२४, ''बाळगावयाचा असला तर मी दया करणारा व पृथ्वीवर धर्म व न्याय चालविणारा परमेश्वर आहे, याची त्याला जाणीव आहे, ओळख आहे, याच्याविषयी बाळगावा; यात मला संतोष आहे, असे परमेश्वर म्हणतो.''*

**(ड) परमेश्वर आपला पुत्र, येशू ख्रिस्तामध्ये आनंद करितो, जो त्याच्या प्रतिरूपाचे प्रतिनीधीत्व आहे.**

*इब्री १:३, ''हा त्याच्या गौरवाचे तेज, व त्याच्या तत्वाचे प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे, आणि पापांची शुध्दि केल्यावर तो उर्ध्वलोकी राजवैभवाच्या उजवीकडे बसला.''*

*मत्तय ३:१७, ''आणि पाहा, आकाशातून अशी वाणी झाली की, हा माझा पुत्र मला परमप्रिय आहे, हयाच्याविषयी मी संतंष्ट आहे.''*

*मत्तय १२:१८, "पाहा, हा माझा सेवक, हयाला मी निवडीले आहे, तो मला परमेप्रिय आहे, त्याच्याविषयी माझा जीव संतुष्ट आहे, त्याच्यावर मी आपला आत्मा घालीन, तो परराष्ट्रीयांना न्याय कळविल."*

**(इ) परमेश्वर आपल्या मंडळीत आनंद करतो, जी त्याची वधू आहे. खालील शास्त्रलेखांचा विचार करा.**

इफिस १:४-५, *त्याप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेत पवित्र व निर्दोष असावे, म्हणून त्याने जगाच्या स्थापन्यापूर्वी आपल्या ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले. त्याने आपल्या मनाच्या सत्ससंकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरिता प्रेमाने पुर्वीच नेमिले होते."*

*रोम ८:२९, "कारण ज्याच्याविषयीचे त्याला पूर्वज्ञान होते त्यांनी आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे म्हणून त्याने त्यांना अगाऊच नेमून ठेवले; हयात हेतू हा की, तो पुष्कळ बंधुजनांमधला ज्येष्ट असा व्हावा."*

*इफिस ५:२५-२७, "...जशी ख्रिस्ताने मंडळीवर प्रीती केली तशी तुम्हीहि आपआपल्या पत्नीवर प्रीती करा; ख्रिस्ताने मंडळीवर प्रीती केली आणि स्वतःस तिच्यासाठी समर्पण केले, अशासाठी की तिला त्याने वचनाद्वारे जलस्नानाने स्वच्छ करून पवि? करावे, आणि गौरवयूक्त मंडळी अशी ती स्वतःला सादर करावी, म्हणजे तिला डाग, सुयकुती किंवा अशासारखे काही नसून ती पवित्र व निर्दोष असावी."*

वरील मुद्दा 'ड' मध्ये, आपल्याला दिसते की परमेश्वर आपल्या पूत्रामध्ये आनंद करतो. असे का हे आपल्याला दिसते, कारण, पुत्र त्याचे हूबेहूब प्रतिनिधीत्व आहे (इब्री १:३). आता, परमेश्वर पित्याने आपल्याला जगाच्या निर्मीतीपूर्वी त्याची मुले होण्यासाठी निवडले आहे, आपण त्याच्या नजरेत पवित्र आणि निर्दोष असावे म्हणून (इफिस १:४-५) आणि आपण त्याचा पूत्र येशू याच्या प्रतिमेप्रमाणे बनावे (रोम ८:२९) आणि त्याच्या मंडळीला त्याच्या पूत्रासाठी, वधूप्रमाणे निष्कलंक व निर्दोष बनवावे. आणि हे सर्व त्याच्या आनंदासाठी आणि इच्छेप्रमाणे करण्यात आले आहे. (इफिस १:४-५). त्याचा आनंद आणि इच्छा म्हणजे तो आपल्यामध्ये आनंद करतो, जे आपण निवडलेले लोक, त्याच्या पूत्राची वधू आहोत.

**तो आपल्यामध्ये आनंद करतो *(जख-या ३:१७, यशया ६५:१९)*, म्हणून सर्वकाही आपल्या चांगल्यासाठी होते. *(रोम ८:२८)*.**

*सफन्या ३:१७, "परमेश्वर तुझा देव, साहाय करणा-या वीरासारखा तुझ्या ठायी आहे; तो तुजविषयी आनंदोत्सव करील; त्याचे प्रेम स्थिर राहिल, तूजविषयी त्याला उल्लास वाटून तो गाईल."*

*यशया ६५:१९, "मी यरूशलेमेविषयी उल्लास पावेन, माझ्या लोकांविषयी आनंद पावेन, तिच्यात शोकाचा व आकांताचा शब्द पुन्हा ऐकू येणार नाही."*

*रोम ८:२८, "परंतु आपल्याला ठाउक आहे की, देवावर प्रीती करणा-यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलविलेल्यास देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात."*

**२. आपण त्याच्यासोबत योग्यरीतीने जोडलेले असल्यास परमेश्वर आपल्याला आनंद देतो.**

परमेश्वर रागीष्ट किंवा ज्याला संतोषविणे कठीण आहे असा नाही. त्याच्या विपरीत, तो चांगला आहे आणि आनंदी आहे आणि आपण आनंदाने भरलेले असावे असे त्याला वाटते. आता, आपल्यामध्ये त्याचा आनंद कसा राहिल? - योग्यप्रकारे त्याच्यासोबत संबंध ठेवल्याने. प्रथम आपण विश्वास ठेवावा की तो आपल्यावर प्रीती करतो आणि आपल्यामध्ये त्याला आनंद आहे आणि मग आपण त्याचे वचन प्रेमापोटी पाळावे, आणि त्याच्यासोबत असलेल्या संबंधासाठी आनंद करावा. जेव्हा तो म्हणतो की मी तुमच्यावर प्रीती करतो तेव्हा त्यात काहीहि राखून ठेवलेले किंवा अडकविणारे नसते, जेव्हा तो म्हणतो, जर तुम्ही मजवर प्रीती करतो तर माझ्या आज्ञा पाळाल (योहान १४:२३). आपण असे म्हणू शकत नाही की आपण परमेश्वरावर प्रेम करतो आणि त्याचवेळी त्याची आज्ञा पाळत नाही, कारण देव आणि त्याचे वचन एकमेकांपासून वेगळे करता येणार नाही. जर आपल्याला त्याच्यासोबत योग्य संबंध ठेवायचे असतील तर त्याची आपल्यावर जी प्रीती आहे तीवर आपण विश्वास ठेवायला हवा. मग आपला आनंद पूर्ण होईल (किंवा परिपक्व होईल). ***"आनंद हा खोलवर स्थिरावलेला आत्मविश्वास आहे की माझ्या जीवनाचे प्रत्येक क्षेत्र देवाच्या नियंत्रणाखाली आहे."*** *पॉल सेलमाईर.*
*योहान १५:९-११, " जशी पित्याने माझ्यावर प्रीती केली तशी मीहि तुम्हावर प्रीती केली आहे; तुम्ही माझ्या प्रीतीत राहा. जसा मी आपल्या पित्याच्या आज्ञा पाळून त्याच्या प्रीतीत राहतो तसे तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल तर माझ्या प्रीतीत राहाल. माझा आनंद तुम्हामध्ये असावा व तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा म्हणून मी तुम्हाला हया गोष्टी सांगितल्या आहेत."*

३. आनंदाचे सामर्थ्य :

**(अ) आनंद तुम्हाला स्वनाकार करण्यासाठी सक्षम करतो, वधस्तंभाच्या जीवनाला अलिंगण देण्यास, येशूसोबत तुमची शर्यत पूर्ण करण्यास तुमची मदत करतो, ज्याने पित्याच्या आनंदासाठी, फार मोठया दुःखावर आणि लज्जेवर मात केली.**
*इब्री १२:१-३, "तर मग आपण एवढया मोठया साक्षीरूपी मेघाने वेढलेले आहो म्हणून आपणहि सर्व भार व सहज गुतविणारे पा टाकून, आपल्याला नेमून दिलेल्या धावेवरून धीराने धावावे. आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू हयाच्याकडे पाहात असावे; जो आनंद त्याच्यापुढे होता त्याकरिता त्याने लज्जा तूच्छ मानून वधस्तंभ सहन केला आणि तो देवाच्या राजासनाच्या उजवीकडे बसला आहे. तुमची मने खचून तुम्ही थकून जाऊ नये म्हणून ज्याने विरोध सहन केला, त्याच्याविषयी विचार करा."*

**(ब) आनंद सैतान आणि अशुध्द आत्म्यांचा विरोध करण्यासाठी तुमची मदत करतो.**
आपल्याविरूध्द सैतानाची हत्यारे म्हणजे दोष लावणे, निराश करणे आणि फसविणे. आपण देवाच्या अधिन व्हावे आणि सैतानाला अडवा म्हणजे तो तुम्हापासून पळेल असे पवित्र शास्त्र आपल्याला सांगते. (याकोब ४:७). सैतानाला विरोध करणे दोन प्रकारचे आहे :

(i) त्याला देवाचे वचन सांगून, जसे येशूने केले जेव्हा सैतानाकडून अरण्यात त्याची परीक्षा घेतली गेली. (मत्तय ४:१-११).

(ii) प्रभूमध्ये आनंदाने भरून जाण्याकडून, कारण ती तुमची ताकद आहे. (नहेम्या ८:१०).

**४. येशू आनंदी आहे आणि आपणहि आनंदी असावे असे त्याला वाटते.**

(अ) येशूचा आनंद. मनुष्य या नात्याने येशू या जगामध्ये जगलेल्या सर्व मनुष्यांपेक्षा आनंदीत होता, कारण आपल्या सर्वांपेक्षा तो परिपूर्णतेने देवासोबत जोडलेला होता. (त्याची धार्मिकतेवर प्रीती होती आणि त्याने दुष्टाईचा द्वेष केला.

***इब्री १:९, "तुला न्यायाची चाड आणि स्वैराचाराचा वीट आहे; म्हणून देवाने, तुझ्या देवाने तुझ्या सोबत्यापेक्षा श्रेष्ट असा हर्षरूपी तेलाचा अभिषेक तुला केला आहे."***

आपल्या जगातील पूर्ण जीवनामध्ये त्याला दुःख आणि संकटांची पूर्ण जाणीव होती तरी, येशूचे मूलभूत आणि नाश न होणारे चरित्र आनंदी होते, नक्कीच हताश किंवा निराशाजनक नव्हते. तुम्ही हे या शास्त्रभागात पाहू शकता :

(i) आपले शिष्य आणि त्यांच्या उपासाच्या समर्थनार्थ बोलत असतांना येशू स्वतःला वराची उपमा देतो. (मार्क २:१८-२०).

(ii) त्याने पवित्र आत्म्यामध्ये आनंद केला. (लूक १०:२१).

(iii) त्याने सामाजिक आनंदोत्सवात भाग घेतला आणि तेथे तो आनंद नष्ट करणारा नव्हता (मार्क १४:३, लूक १४:१, योहान २:१, १२:१) आणि तो खादाड आणि दारूबाज आहे अशी लोकांनी त्याच्यावर टीका केली. (मत्तय ११:१९).

(iv) वधस्तंभी जाण्याआधी आपला आनंद शिष्यांना द्यावा अशी त्याची इच्छा होती. (योहान १५:११, १७:१९) आणि खरेतर पेंटेकॉस्टनंतर आणखी त्याने आपला आनंद आणखी मोठया प्रमाणात दिला.

(v) येशूची अपेक्षा आहे की त्याच्या अनुयायांनी पुन्हा आणि नेहमी आनंदीत असावे. तो वधस्तंभी खिळला जाण्याआधी येशूने आपल्या शिष्यांना वचन दिले त्यांच्यामध्ये आनंद राहिल. (योहान १५:११, १६:२४, १७:१३) जरी काही दिवस त्यांना दुःख वाटणार होते, परंतु नंतर त्याचा आनंद पुन्हा येणार होता जो ते कधीहि गमावणार नव्हते. (योहान १६:२२). येशू खरा ठरला. उत्तम शुक्रवारी शिष्य दुःखदपणे निराश झाले होते, परंतु पुनःरूत्थानाच्या दिवशी त्यांचा आनंद वापस आला (लूक २४:४१) आणि पेंटेकॉस्टच्या दिवशी त्यांच्या आनंदाला सिमा नव्हती, (प्रेषित २:४६-४७) आणि त्यांनी तो आनंद कधीहि गमावला नाही. (प्रेषित ८:३९, १३:५२). हे फार महत्वाचे आहे - प्रभूचा आनंद मंडळीमध्ये आहे जो पुन्हा कधीहि हरवणार नाही.

*योहान १६:२०-२४, ''मी तुम्हाला खचित खचित सांगतो तुम्ही रडाल व शोक कराल तरी जग आनंद करील; तुम्हाला दुःख होईल, तरी तुमचे दुःखच तुमचा आनंद होईल. स्त्री प्रसूत होते तेव्हा तिला वेदनेचे दुःख होते, कारण तिची प्रसूतीची घटका आलेली असते. परंतु बालक जन्मल्यावर मनुष्य जगात जन्मल्याचा जो आनंद होतो त्यामुळे तिला त्या क्लेशाची आठवण होत नाही. हयाप्रमाणे तुम्हाला आता दुःख झाले आहे, तरी मी तुम्हाला पुन्हा भेटेल आणि तुमचे अंतःकरण आनंदित होईल व तुमचा आनंद तुमच्यापासून कोणी काढून घेणार नाही. त्या दिवशी तुम्ही मला कांही प्रश्न विचारणान नाही. मी तुम्हाला खचित खचित सांगतो, तुम्ही पित्याजवळ काही मागाल तर तो ते तुम्हाला माझ्या नावाने देईल. तुम्ही अजून माझ्या नावाने काही मागितले नाही. मागा म्हणजे तुम्हाला मिळेल. यासाठी की तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा.''*

*फिलीप्पै ४:४, ''प्रभूमध्ये सर्वदा आनंद करा; पुन्हा म्हणेन आनंद करा.''*

*१ थेस्सलनी ५:१६-१८, ''सर्वदा आनंदीत असा. निरंतर प्रार्थना करा. सर्व स्थितीत उपकारस्तुती करा; कारण तुम्हाविषयी ख्रिस्त येशूमध्ये देवाची इच्छा हीच आहे.''*

(क) पवित्र आत्मा आनंदाचा वाहक आहे. आपण हे जुन्या करारात पाहातो की देवाच्या उपस्थितीत पुर्णानंद आहे. (स्तोत्र १६:११); परंतु, पवित्र आत्मा देव आहे आणि तो प्रत्येक विश्वासणा-यामध्ये वस्ती करतो. म्हणून, आपल्यामध्ये आनंद आहे. म्हणून पौलाने आनंद हे पवित्र आत्म्याचे एक फळ आहे असा उल्लेख केला आहे(गलती ५:२२) आणि ''पवित्र आत्म्यामधील आनंद'' हा देवाच्या राज्याचे महत्वाचे चिन्ह आहे असे सुध्दा पौल म्हणतो. (रोम १४:१७).

(ड) आनंद हा असा विश्वास आहे जो मोह, अपमान आणि छळावर विजय मिळवितो.

*१ पेत्र १:६-८, ''त्याविषयी तुम्ही उल्हास करिता, तरी तुम्ही आता थोडा वेळ, ाग पडतले तसे निनिराळया परीक्षांमुळे दुःख सोसले; हयासाठी की नाशवंत सोन्याची परीक्षा अग्नीने करितात त्या सोन्यापेक्षा मुल्यवान असे जे तुमचे विश्वासाच्या परीक्षेत उतरणे ते येशू ख्रिस्ताच्या प्रगट होण्याच्या वेळेस प्रशंसा, गौरव व मान हयास कारणीभूत व्हावे. त्याला पाहिले नसतांहि त्याच्यावर तुम्ही प्रीती करितात्र आता तो दिसत नसता त्याचच्यावर विश्वास ठेवता, आणि त्या विश्वासाचे पर्यवसन जे आपल्या जिवाचे तारण ते उाभागीत अनिर्वाच्य गौरवयुक्त आनंदाने उल्लासता.'' (तसेच १ पेत्र ४:१३).*

*मत्तय ५:११-१२, ''माझ्यामुळे लोक तुमची निंदा व छळ करितील आणि तूमच्याविरूध्द सर्वप्रकारच्या वाईट लबाडीने बोलतील तेव्हा तुम्ही धन्य. आनंद करा, उल्हास करा, कारण स्वर्गात तुमचे प्रतिफळ मोठे आहे; कारण तुमच्यापूर्वी जे संदेष्टे होऊन गेले त्यांचा त्यांनी तसाच छळ केला.''*

५. **आनंदाचे लूटारूः** तत्वतः आनंदाचे सर्व लूटारू तुमचा देवासोबतचा संबंध योग्य असू नये म्हणून तुमचे लक्ष विचलीत करतात आणि तुम्हाला दुसरीकडे नेतात. म्हणून काही, स्पष्ट आणि काही तितकेसे स्पष्ट नसलेल्या लूटारूंचे परिक्षण करू.

**स्पष्ट लूटारू :**

(अ) **निर्भेळ आणि कबूल न करण्यात आलेली पापे :** दावीद राजाने बथशेबेसोबत व्यभिचार केला आणि तिचा पती उरीया याचा खून केला. लक्षात घ्या दावीदाने पाप केले तेव्हा तो आपला आनंद पूर्णपणे गमावून बसला होता (स्तोत्र ३२:३-४)परंतु जेव्हा त्याने पश्चाताप केला तेव्हा त्याची क्षमा करण्यात आली आणि त्याचा आनंद पुन्हा स्थापीत करण्यात आला. *(स्तोत्र ३२:५, स्तोत्र ५१:७-१२).*

(ब) **सवयीची पापे :** पौल आपल्याला ताकीद देतो की जे देहाला संतोषविण्यासाठी पेरणी करतील ते नाशाची कापणी करतील, परंतु जे आत्म्याला संतोषविण्यासाठी पेरणी करतील ते सार्वकालीक जीवनाची कापणी करतील. *(गलती ६:७-८).* येथे सार्वकालीक हे देवाचे जीवन आहे जे आपल्याला पवित्र आत्म्यामधील नीतीमत्व, शांती आणि आनंद देते. *(रोम १४:१७, १५:१३).* जे सवयीनूसार पाप करतात त्यांनी सल्लामसलत घ्यावी आणि कोणाला तरी जबाबदार असावे. परंतु, सवयींच्या पापांवर विजय मिळविण्याचे तत्व हे वाईट सवयींबाबत कठोर असणे आणि त्याऐवजी चांगल्या सवयी जोपासने हे आहे.

(क) **जगिकता :** जगिकतेची व्याख्या *१ योहान २:१५-१७* मध्ये देण्यात आली आहे. ती आहे जगावर प्रीती, देहाची वासना, डोळयाची वासना आणि संसाराची फुशारकी.

(ड) **असमाधान :** पौल आपल्याला चांगले उदाहरण देतो, *“तू गुलाम असता तुला पाचारण झाले काय? त्याची चिंता करू नको, पण तुला मोकळे होता येत असेल तर खुशाल मोकळा हो.”* जीवनातील आपले स्थान जर आपण सुधारू शकतो तर ते योग्य आहे, नाहीतर जेथे तुम्हाला ठेवण्यात आलेले आहे तेथे समाधानी असा, कारण ख्रिस्तामधील आपले स्थान हे जास्त महत्वाचे आहे (तुम्हाला कुठे पाचारण करण्यात आले आहे).

**तितकेसे स्पष्ट नसलेले लूटारू :**

(i) देवासोबतच्या योग्य संबंधात खरा आनंद सापडतो. परंतु खोटा आनंद वस्तु आणि लोक यामध्ये असतो. अशाप्रकारे तुम्ही खोटा आनंद ताडू शकता - तो ‘जेव्हाच्या तेव्हा” असतो.
जेव्हा मला घर मिळेल तेव्हा मी आनंदी राहिन.
जेव्हा मला चांगले काम लागेल तेव्हा मी आनंदी राहिन.
जेव्हा माझे लग्न होईल तेव्हा मी आनंदी राहिन.
जेव्हा मला बाळ होईल तेव्हा मी आनंदी राहिन.
जेव्हा मला मुलगा होईल तेव्हा मी आनंदी राहिन. इत्यादी इत्यादी.

परंतु जर मला या गोष्टी मिळाल्या नाहीत तर मी आनंदी असणार नाही. हीच तर महत्वाची गोष्ट आहे. सैतानाला हे माहित आहे आणि देव हे पाहातो. तुमच्या देवासोबतच्या संबधापासून तुम्ही दूर जाता आणि संबंध अस्ताव्यस्त होतात आणि तुम्ही आपला आनंद गमावता.

म्हणून, खरा आनंद मिळण्यासाठी , देव म्हणतो, *''तर तुम्ही पहिल्याने त्याचे राज्य व त्याचे नीतीमत्व मिळविण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर हयाहि सर्व गोष्टी तुम्हाला मिळतील.''(मत्तय ६:३३).* तुमचा आनंद तुमच्या देवासोबतच्या संबंधात शोधणे यावर जोर दिला पाहिजे, मग तुमच्या कल्याणसाठी असलेल्या बाकीच्या गोष्टी तुम्हाला देवाकडून मिळतील.

**(ii) सुखभोग** : सुख भोगणे हे नक्कीच मनोहर आहे आणि पापीष्ट नाही. परंतु ते लूटारू होउ शकते जेव्हा, परंतु जेव्हा त्यामुळे देवासोबतच्या तुमच्या संबंधापासून तुम्ही वळता आणि तुमचे लक्ष विचलीत होते तेव्हा सुखभोग लूटारू होउ शकतो. नेहमीचे उदाहरण रात्री उशीरापर्यंत टी व्ही किंवा सिनेमा पाहाणे हे आहे. दुस-या सकाळी तुम्ही घाईने कामावर जाता. परंतु मग देवासोबत घालविण्याच्या वेळेचा बळी दिला जातो.

तत्वतः जेव्हा देवाला शोधण्यापेक्षा तुम्हाला दुस-या गोष्टींमध्ये आनंद दिसतो, तर आपोआपच तुम्ही वळाल आणि तुमचे लक्ष विचलीत होईल. कालांतराने, तुम्हाला दिसून येईल की तुम्ही सुखोपभोगाचे गुलाम झाला आहात. ते बंधन तुम्हाला प्रभूमधील आनंदापासून दूर ठेविल.

**(iii) लहान खोकड** : *''द्राक्षीच्या मळयाची नासधूस करणा-या खोकडास, त्या लहान खोकडास, त्या लहान कोल्हयास आम्हासाठी धरा, कारण आमचे द्राक्षीचे मळे फुलले आहेत.'' (गीतरत्न २:१५).* द्राक्ष खाण्यासाठी कोल्हे द्राक्षमळयात घुसतात, आणि म्हणून राखनदारांनी फांद्या बांधून ठेवाव्यात यासाठी की कोल्हे द्राक्षांपर्यंत पोहोंचणार नाहीत ''लहान कोल्हे'' ज्या गोष्टी बेमालूमपणे संबंध खराब करतात त्याचे प्रतिनिधीत्व करतात. चिंता (मत्तय ६:२५-३४), घाई (स्तोत्र १२७:२), बोलण्यामध्ये कृपेचा अभाव (इफिस ४:२९-३०) हे विध्वंस करण्यामध्ये प्रमुख आहेत.

**घाईबाबत** : पास्टर जॉन ओर्टबर्ग यांनी डॅलास विलाडे यांना विचारले आत्मिकरीत्या कसे वाढावे. विलार्ड यांनी उत्तर दिले, ''घाई करू नका'' घाई आणि चिंता तुमच्यामधील चांगले बाहेर येउ देणार नाही. तुम्ही काही गोष्टी करू शकता आणि इतर गोष्टींसाठी तुम्ही देवावर विश्वास ठेवावा आणि त्याच्यामध्ये विश्राम शोधावा.

**कृपेच्या अभावाबाबत** : पौल म्हणतो, *''तुमच्या मुखातून कसलेच कुजके भाषण न निघो, पण गरजेप्रमाणे उन्नतीकरिता जे चांगले तेच मात्र निघो, हयासाठी की, तेणेकडून ऐकणा-यांना कृपादान प्राप्त व्हावे. देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू नका, खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यत तुम्ही त्या आत्म्याच्या योगे मुद्रित झाला आहा.'' (इफिस ४:२९-३०).*

**उदाहरण** : लाकडाचा एक ओंडका पाण्यावर आरामात तरंगत होता. परंतु लाकूड पाण्याला शोषून घेत असल्यामुळे लाकूड जड होते आणि मग कसेतरी तरंगते आणि हळूहळू बूडून जाते. जेव्हा आपले तारण होते, तेव्हा आपण आनंदाने भरलेले असतो. परंतु स्पष्ट आणि काहीसे अस्पष्ट पापे आपल्याला बुडवू शकतात.

**निष्कर्ष** : साधारणपणे प्रेषितांच्या नव्या करारातील सर्व प्रार्थना या केवळ आपल्या देवासोबतच्या मजबून संबधाबाबत आहेत. परंतु, दुःखाची बाब आहे की आज चर्चमधील आपल्या सर्व प्रार्थना पृथ्वीवरील आपल्या

आनंदासाठी आहेत. आपण पृथ्वीवरील गोष्टीसांठी प्रार्थना करण्यापासून आपले लक्ष बदलले पाहिजे यासाठी की ज्याच्यामध्ये आनंद आहे त्या देवासोबतचा आपला संबंध मजबूत व्हावा.

पण हे घ्यानात ठेवा : ***दुःखी तरी नेहमी आनंद करणारे (२ करिंथ ६:१०).*** जरी पवित्र शास्त्र आपल्याला ''सर्वदा आनंद करण्याची'' आज्ञा करते तरी बरेचदा आपण दुःखी असतो कारण आपल्या आजूबाजूला कितीतरी दुःख असते, आपल्या जीवनात आणि जगातहि, आणि आपण त्याबाबत आंधळे किंवा असंवेदनशील असू शकत नाही. तरीपण, आपण देवासोबतचा आपला आनंद गमावू नये. देवहि, जगातील पाप आणि दुःखासाठी दुखावला जातो आणि त्यासाठीच त्याने येशूला जगात पाठविले की त्याने जगातील पाप आणि दुःख घालवून द्यावे. लाजर मरण पावला तेव्हा येशूला फार खेद झाला आणि तो रडला (योहान ११:३६-३८), कारण पापाने लोकांवर काय परिणाम केला आहे हे त्याला समजले. परंतु त्याने लाजराला मेलेल्यातून उठविले आणि तो म्हणाला, *''पुनःरूत्थान व जीवन मीच आहे.''* आणि एके दिवशी, *''मुक्त केलेले परमेश्वराचे लोक परत येतील; ते जयजयकार करीत सीयोनेत येतील; त्यांच्या मस्तकी अक्षय आनंद राहील; ते आनंद व हर्ष पावतील, दुःख व उसासे पळ काढतील.'' (यशया ३५:१०, यशया ५१:११).* आणि त्याचा अर्थ असा आहे की केवळ आपणच नाही तर देवाचे आपल्या दुःखसाबत जोडले जाणेहि पळ काढतील आणि असे कोणतेहि दुःख जगात उरणार नाही जसे आज आपल्याला दिसून येते.

म्हणून, कृपाकरून इतरांच्या मरणाच्या वेळी ''आनंद करा, आनंद'' हे गीत गाउ नका. उलट, ''रडणा-यांबरोबर रडा'' आणि जे आनंद करीत आहेत त्यांच्याबरोबर तुम्ही आनंदहि करू शकता. (रोम १२:१५, उपदेशकत १३:४). जे काही तुम्ही करिता त्यामध्ये इतरांप्रती संवेदनशील असा, परंतु देवासोबतचा तुमचा आनंद कधीहि गमावू नका आणि कधीहि ही गोष्ट विसरू नका की एके दिवशी सर्व दुःख पळून जाईल आणि आपल्या मस्तकावर सार्वकालीक जीवनाचा मुकूट घालण्यात येईल. माराना था. ये प्रभू येशू ये.

## *व्यक्तीगत संजीवन भाग ३ – ख्रिस्तासोबत जोडले जाणे आणि फळ देणे*


**पार्श्वभूमि :** योहान १५:१, *''मीच खरा द्राक्षवेल आहे''* हे योहानकृत शुभवर्तमानातील येशूच्या सात ''मी आहे'' पैकी शेवटचे ''मी आहे''. योहान १४ पूर्णपणे येशूच्या निर्गगमनाबाबत आणि त्याच्या शिष्यांसाठी पुन्हा येण्याबाबतचे आहे. परतु, योहान १५ हे केवळ पुन्हा येण्याबाबत नाही तर खिस्तामध्ये राहाणे याबाबत आहे. 'राहाणे' (किंवा वस्ती करणे) हा शब्द योहान १५ मध्ये १० वेळेला आला आहे. आपल्या शिष्यांनी आपल्यासोबतच्या निकटच्या संबधात असावे अशी येशूची इच्छा आहे, जसे फाटा वेलात राहातो, यासाठी की शिष्यांनी ख-या जीवनातील विपूल फळ द्यावे. आपण पाहाणार आहोत की योहान १५ हे ख्रिस्तासोबत जोडले जाणे आणि फळ देणे याबाबत आहे.

*वचन ३१* मध्ये, जे योहान १४ चे शेवटचे वचन आहे, आपण पाहातो की येशू आपल्या शिष्यांसोबत माडीवरील खोली सोडतो आणि गेथसेमाने बागेकडे आगेकूच करतो. रस्त्याने चालत असतांना, ते मंदीर ओलांडतात,



ज्याच्या भिंतीवर द्राक्षवेलाची प्रतिक चित्रे काढण्यात आली होती. जुन्या करारात बरेच शास्त्रभाग आहेत जे इस्त्राएलाचा उल्लेख द्राक्षरस म्हणून करतात : *स्तोत्र ८०:८-१६, यशया ५:१-७, यिर्मया २:२१, यहेज्केल १५:१-८, १७:५-१०, १९:१०-१४, होशेय १०:१*. द्राक्षवेल इस्त्राएलचे चिन्ह बनले, आणि एवढेच नाही तर, दोन कराराती मधल्या काळात मकॅबिसने चलनात आणलेल्या नाण्यांवर सुध्दा द्राक्षवेलाचे चित्र काढण्यात आले होते.

परंतु महत्वाचे हे आहे की जुन्या करारात जेव्हा जेव्हा या उपमेचा वापर करण्यात आला, तेव्हा हे सुध्दा सांगण्यात आले आहे की इस्त्राएल लोक फळ देण्यामध्ये विफल ठरले. विचार करा : *यशया ५:१-२, ''मी आपल्या वल्लभाप्रीत्यर्थ गाणे गाईन; आपल्या प्रियकराचे त्याच्या द्राक्षीच्या मळयाविषयीचे गीत गाईन. माझ्या वल्लभाचा द्राक्षमळा डोंगराच्या एका अतिशयीत सुपीक शृंगावर होता; तो त्याने खणून त्यातील गोटे काढून टाकिले व तेथे उत्तम प्रतीच्या द्राक्षीच्या वेलाची लागवड केली, आणि तया एक बुरूज बांधिला व द्राक्षकुंड खोदिले; मग त्यापासून द्राक्षे पैदा होतील म्हणून वाट पाहिली, तो त्याने रानद्राक्षे दिली.''*




द्राक्षमळयात बरीचशी झाडे असतात आणि जुन्या करारात इस्त्राएल देवाचा द्राक्षमळा होता. योहान १५:१ मध्ये येशू जाहीर करतो, *''मी खरा द्राक्षवेल आहे.''* येशूने इस्त्राएल या द्राक्षमळयाची जागा घेतली आहे, जे फळ देण्यात कमी पडले. आता देवाच्या या नविन द्राक्षमळयात केवळ एकच द्राक्षाचे झाड

आहे. आता आपण देवाच्या द्राक्षमळयातील वेल आहोत असे इस्त्राएल गृहित धरू शकत नाही. उलट संपूर्ण जगातील प्रत्येक व्यक्तीने, ज्यामध्ये इस्त्राएल लोकांचा देखिल समावेश आहे, स्वतःला एका ख-या द्राक्षवेलातून निघालेली फांदी समजले पाहिजे, आणि तो द्राक्षवेल येशू आहे ‘ देवाला आवडेल अशी फळे देणारा ख्रिस्ताचा शिष्य आपण झालो पाहिजे. (योहान १५:८) आणि इतरांना सुध्दा आपण उत्तेजर द्यावे की त्यांनी देखिल फळे द्यावीत हे सर्व राष्ट्रातील लोकांना शिष्य करणे आहे. (मत्तय २८:१९).

*योहान १५:८, “तुम्ही विपूल फळ दिल्याने माझ्या स्वर्गातील पित्याचे गौरव होते; आणि तुम्ही माझे शिष्य व्हाल ”*
.

*मत्तय २८:१९, “तेव्हा तुम्ही जाउन सर्व राष्ट्रातील लोकांना शिष्य करा; त्यास पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या. ”*

ख्रिस्तासोबत भागीपण असण्याचे तीन परिणाम होतील : फळ, येशूचे मित्र, जगाचे वैरी. आणि या तीन गोष्टी योहान १५ मध्ये सापडतात.

१. **फळ** जे ख्रिस्तासारखे चरीत्र आणि सेवाकार्यासाठी असेल.
२. **येशूचे मित्र** *(योहान १५:१२-१७)* - लोक आपल्या मित्रांकडे आपले मन मोकळे करतात परंतु दासांपुढे आपले मन मोकळ करीत नाहीत.
३. **वैरी**, कारण जग तुमचे वैरी बनेल. *(योहान १५:१८-२५).*

१. फळ

(अ) **भक्ती : तुम्ही माझ्या प्रीतीत राहा** *(योहान १५:५, ७, ९)*

योहान १५:५,७,९ *“मीच वेल आहे, तुम्ही फाटे आहा; जो माझ्यामध्ये राहातो आणि मी ज्याच्यामध्ये राहातो तो पुष्कळ फळ देतो, कारण माझ्यापासून वेगळे असल्यास तुम्हाला काही करिता येत नाही. ....तुम्ही माझ्यामध्ये राहिला व माझी वचने तुम्हामध्ये राहिली तर जे काही तुम्हाला पाहिजे असेल ते मागा म्हणजे ते तुम्हाला प्राप्त होईल. .....जशी पित्याने माझ्यावर प्रीती केली तशी मीहि तुम्हावर प्रीती केली आहे; तुम्ही माझ्या प्रीतीत राहा. ”*

जेव्हा आपला जन्म होतो आणि आपण या पृथ्वीवर राहातो, आपला आत्मा पापामुळे अंधकारमय होतो आणि देवापासून अलग होतो. येथे आपण थांबून देवाच्या भयप्रद पावित्र्याचा विचार केला पाहिजे जो केवळ पवित्र आत्म्याद्वारे प्रगट होतो, जो जगाची पापाबाबत खात्री करतो - त्याकडून आपण पश्चातापास प्रवृत्त होतो. देवाची स्तुती असो, पवित्र आत्मा आपल्याला ख्रिस्त जो आपला तारणारा त्यामध्ये असलेल्या देवाच्या प्रीतीची आपल्याला जाणीव करून देतो. आपण पश्चाताप करून येशूवर विश्वास ठेवतो तेव्हा आपला नविन जन्म होतो आणि आपला आत्मा उजळून निघतो आणि पवित्र आत्म्याकडून जागा केला जातो. आपण देवापासून जन्मतो आणि आपल्या आत्म्याचा पिता जो खरा आहे त्या पित्यासोबत आपण जोडले जातो, जरी आपली पृथ्वीवरील वैशिष्टे तशीच राहातात जी आपल्याला आपल्या जगित पालकांकडून मिळत असतात. (योहान १:१२-१३, इब्री १२:९ वचने पाहा, जी खाली दिली आहेत. तसेच खाली दिलेले चित्र १ - ३ सुध्दा पाहा).

*“जे त्याचे स्वतःचे त्याकडे तो आला तरी त्याच्या स्वकीयांनी त्याचा स्विकार केला नाही; परंतु जितक्यांनी त्याचा स्विकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणा-यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला .” (योहान १:११-१२).*

*इब्री १२:९, “शिवाय शिक्षा करणारे असे आमच्या देहाचे बाप आपल्याला होते आणि आपण त्यांची भीड धरीत असू; तर आपण विशेषेकरून जो आत्म्याचा पिता त्याच्या अधीन होऊन जिवंत राहू नये काय?”*





Figure 1
*1 Thess 5:23 May your whole spirit, soul and body be kept blameless at the coming of our Lord Jesus*





**Figure 2**
Separated from God due to sin, people can only be led by lust of the flesh & eyes (body) and the pride of life (soul). But the person's spirit remains undernourished.





**Figure 3**
Christian is in fellowship with God and the human spirit gradually grows as the person yields to God

ख्रिस्ती मनुष्याची देवासोबत सहभागिता आहे आणि मनुष्य देवाच्या अधीन राहातो तसा मानवी आत्मा हळूहळू विकसित होतो.

पिता जसा येशूवर प्रीती करतो तसा आपल्यावरहि प्रीती करतो असा विश्वास धरून आपण भक्तीमध्ये क्रियाशीलपणे सहभागी होऊ शकतो. *(योहान १७:२३, १५:९).*
*योहान १७:२३क, ''जशी तू माझ्यावर प्रीती केली तशी त्यांच्यावरहि प्रीती केली.''*
*योहान १५:९, ''जशी पित्याने माझ्यावर प्रीती केली तशी मीहि तुम्हावर प्रीती केली आहे; तुम्ही माझ्या प्रीतीत राहा.''*

**याप्रकारे तुम्ही येशूच्या प्रीतीत राहाता. प्रत्यक्ष कृति करून उदाहरण देतो.**

सरळ उभे राहा.
विश्वास धरा की देवा तुमच्या वर आहे
त्याच्या प्रेमाचे आणि कृपेचे किरण सरळ तुमच्यावर पडत आहेत. (योहान १७:२३, १५:९)
ज्ञात असलेल्या सर्व पापांसाठी पश्चाताप करा. आणि देव तुम्हाला क्षमा करतो.
आता, जेथे कुठे तुम्ही जाता, चालता/पळता/बसता/पहूडता/झोपता इत्यादि असा विश्वास धरा की देवाने आताहि तुमच्यावर त्याची प्रीती आणि कृपेच्या किरणांचे आणि बिनाअट स्विकाराचे आच्छादन टाकले आहे. त्यामध्ये जगा! याप्रकारे, तुम्ही देवाच्या समक्षतेचा नेहमी आनंद घेउ शकता.

शांती आणि आनंदामध्ये राहा कारण तो तुम्हाला स्विकारतो आणि तुमच्यावर प्रीती करतो.

देवासोबत भक्तीमध्ये/उपकारस्मरणामध्ये/बोलण्यामध्ये किंवा प्रार्थना करण्यामध्ये तल्लीन व्हा किंवा केवळ त्याच्यावर विसंबून राहा - विशेषतः जेव्हा तुम्ही देवाचे वचन वाचता तेव्हा असे करा. तुम्हाला दिसून येईल की तो तुमच्यासोबत बोलेल आणि तुम्हाला त्याची आज्ञा पाळण्यासाठी कृपा मिळावी म्हणून तुमच्यासाठी प्रार्थना करील.

**(ब) देवाच्या वचन पाळणे - माझे वचन तुमच्यामध्ये राहाते** *(योहान १५:७).* आता वचनाच्या दुस-या भागाकडे जात असतांना आपण आणखी काही गोष्टी करू - आज्ञापालन. देवाची आज्ञा पाळणे सोपे आहे असे तुम्हाला दिसेल कारण तुम्ही त्याच्या सान्निध्यामध्ये, त्याने केलेला स्विकार, त्याची प्रीती आणि कृपा यामध्ये प्रेरीत होता. देवाची प्रीती आणि कृपेच्या किरणांच्या बाहेर राहिल्याने आणि प्रयत्न केल्याने आज्ञापालन करता येत नाही ज्याची तुम्ही वरीलप्रमाणे तालीम केली. जर तुम्ही त्याची प्रीती आणि कृपेच्या किरणांच्या बाहेर उभे राहाता तर लवकरच तुम्ही पराभूत व्हाल कारण तुम्ही नियमशास्त्राखाली याल. उलट देवाची आज्ञा पाळणे हे त्याची प्रीती आणि कृपेमध्ये उभे राहिल्यामुळे आणि त्याच्यामध्ये विश्रांती आणि शांती शोधल्यामुळे येते. (तुम्ही वरील तालमीत

केल्याप्रमाणे). देवाची प्रीती आणि कृपेच्या किरणांमध्ये उभे राहण्यामध्ये एक मूलभूत गोष्ट आहे जी करणे गरजेचे आहे - **निश्चय करा (तुमचे लक्ष लावा) की तुम्ही प्रत्येक मार्गात देवाची आज्ञा पाळाल.** *(कलस्सै ३:२ मधून).* मग

तुम्ही आता परमेश्वर केंद्रित व्यक्ती आहात.
देवाचे वचन मोठयाने बोला आणि तुम्हाला समजून येईल की देवाचे वचन मोठयाने बोलण्यात शक्ती आहे.
दुस-यांची क्षमा करा आणि तुम्हाला कळून येईल की क्षमा करण्यामध्ये शकती आहे.
जीवनाच्या वधस्तंभाला अलिंगण द्या आणि तुम्हाला कळून येईल की वधस्तंभामध्ये शक्ती आहे.
येशूच्या नावाने बोला/प्रार्थना करा आणि तुम्हाला कळून येईल की येशूच्या नावात सामर्थ्य आहे.
येशूच्या रक्तासाठी विनवणी करा आणि तुम्हाला कळून येईल की येशूच्या रक्तात सामर्थ्य आहे.
देवाचे वचन वाचा आणि तुम्हाला कळून येईल की देवाचे वचन तुमच्यासोबत बोलत आहे. देवाचे वचन पाळण्यासाठी तुम्हाला कृपा मिळावी म्हणून प्रार्थना करा.

असे झाले तर आपण पावित्र्य आणि प्रीतीच्या देवासोबत आपण तादात्म्य पावतो. त्याची प्रीती, चांगूलपण आणि विश्वासूपणा याबाबत त्याच्या अभिवचनाचे श्रेष्टत्व आपण वर्णू शकतो. अशाप्रकारे पूर्ण दिवसभर आपण त्याच्या भक्तीमध्ये तल्लीन होऊ शकतो. मग आपला आत्मा - मनुष्य आधिक आणि अधिक तेजोमय होतो, आपण आत्मिकरीत्या वाढतो, आपला विश्वास उचलला जातो आणि प्रत्येक नकारकतेचा विनाश होतो (आकृति ३). अशारीतीने, येशूमध्ये राहण्याच्या आज्ञेला आपण कवटाळतो आणि तो त्याचा शब्द आपल्यामध्ये राहू देतो, परिणामी आपण फलदायी होतो.

**पुष्कळ लोक म्हणतात की देवाची आज्ञा मानने कठीण आहे. परंतु पवित्र शास्त्र सांगते तसे नाही.**

*मत्तय ११:३०, "कारण माझे जूं सोयीचे आणि माझे ओझे हलके आहे."*
*१ योहान ५:३-४, "देवावर प्रीत करणे म्हणजे त्याच्या आज्ञा पाळणे होय, आणि त्याच्या आज्ञा कठीण नाहीत. कारण जे की देवापासून जन्मलेले आहे ते जगावर जय मिळविते, आणि ज्याने जगावर जय मिळविला तो म्हणजे आपला विश्वास."*

देवाची आज्ञा पाळत असतांना एक सर्वात मोठी समस्या जिला आपल्याला तोंड द्यावे लागते ती आहे "मनाचे नवीकरण" जो व्यक्तीगत संजीवनाचा फार मोठा भाग आहे, जो पुढील अध्यायात देण्यात आलेला आहे.

(क) **फलदायी आणि यशस्वी** *(योहान १५:५,७)*

अ आणि ब मध्ये दिलेल्या अटी जेव्हा तुम्ही पूर्ण करता - तुम्ही फलदायी व्हाल आणि तुमच्या पाचारणात तुम्हाला यश मिळेल असे देव वचन देतो.

*योहान १५:५,७, "मीच वेल आहे, तुम्ही फाटे आहा; जो माझ्यामध्ये राहातो आणि* ***मी ज्याच्यामध्ये राहातो तो पुष्कळ फळ देतो,*** *कारण माझ्यापासून वेगळे असल्यास तुम्हाला काही करिता येत नाही..........तुम्ही माझ्यामध्ये राहिला व माझी वचने तुम्हामध्ये राहिली तर जे की तुम्हाला पाहिजे असेलत ते मागा म्हणजे ते तुम्हाला प्राप्त होईल."*

*यहोशवा १:८, "नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखी सदैव असू दे; त्यात जे काही लिहीले आहे ते तू काळजीपूर्वक पाळ आणि रात्रंदिवस त्याचे मनन कर,* ***म्हणजे तुझा मार्ग सुखाचा होईल व तुला यशप्राप्ती घडेल."***

विश्वास ठेवणे आणि जाहीर करण्याच्या बाबतीत हे फार महत्वाचे अभिवचन आहे की तुम्ही तुमच्या जीवनात फलदायी आणि यशस्वी व्हाल. आपल्यामध्ये अशी मानसिकता असली पाहिजे - फलदायी, भरभराट आणि यश मिळालेली सेवा. यामुळे नकारकतेचा विध्वंस होतो, परंतु उलट आशा निर्माण होते. येथे मुख्यतः मी जे काही तुम्ही हाती घेतो त्यामधील आत्मिक सुबत्तेबाबत बोलत आहे. हा व्यक्तीगत संजीवनाचा पाया आहे. तसेच नेहमीच याचा परिणाम भौतिक भरभराटीत देखिल होतो. परंतु हे आपल्या जीवनाचे ध्येय नाही, उलट, ख्रिस्तासोबतच्या भागीपणाचा तो परिणाम आहे.

*मत्तय ६:३३, "तर तुम्ही पहिल्याने त्याचे* ***राज्य*** *व त्याचे नीतीमत्व मिळविण्यास झटा म्हणजे त्याच्याबरोबर हयाहि सर्व गोष्टी तुम्हाला मिळतील."*

## आशा

काही लोकांचा जन्म आशादायी स्वभावाने होतो तर काहींचा जन्म निराशावादी स्वभावाने होतो. परंतु ख्रिस्ती आशा ही पुढे जे होईल त्याहून निराळी आहे. ती देवाच्या वचनावर आधारीत आहे. आशा भविष्यासाठीच्या विश्वासासारखीच आहे. पवित्र शास्त्र आशेची व्याख्या निश्चीततेसाठी आत्मविश्वास, धीर आणि आनंददायी अपेक्षा अशी करते. देवाच्या वचनाबाबतची निश्चीतता कारण देव विश्वासू आहे. **आशा, विश्वास आणि प्रिती सोबत विराजमान असते.** *१ करिंथ ११:१३* **ज्याचा परिणाम ख्रिस्ती जीवनातील शुध्द गाभ्यामध्ये होतो. आशा आपल्याला निराश करणार नाही.**

*रोम ५:५, "आणि आशा लाजवीत नाही, कारण आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे."*

*इब्री ११:१, "विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टीविषयीचा भरवसा आणि न दिसणा-या गोष्टींबद्दली खात्री आहे."*

*रोम ८:२४-२५, ''कारण आपण अशी आशा धरून तरलो; जी आशा दृष्य झाली आहे ती आशाच नव्हे, जे दृष्य झाले आहे त्याची आशा कोण धरील? पण जे अदृष्य त्याची जर आपण आशा धरली तर धीराने आपण त्याची प्रतीक्षा करीत असतो.''*
*रोम १२:१२, ''आशेने हर्षित व्हा. संकटात धीर धरा; प्रार्थनेत तत्पर राहा.''*
*१ करिंथ १३:१३, ''सारांश विश्वास, आशा, प्रीती ही तिन्ही टिकणारी आहेत; परंतु त्यात प्रीत श्रेष्ट आहे.''*

जेव्हा तुम्ही एकामागोमाग येणा-या समस्यांना तोंड देता, तेव्हा विचार करण्यासाठी दोन गोष्टी असतात :

- देव तुम्हाला शिस्त लावत आहे आणि तुमची छाटणी करीत आहे कारण तुमच्या दैहीक जीवनात असा भाग आहे जो तुमच्या व्यवस्थेतून काढून टाकण्याची त्याची इच्छा आहे यासाठी की तुम्ही अधिक फलदायी व्हावे.
- तुमच्या आशेचा विध्वंस करण्यासाठी सैतान तुमच्यावर हल्ला करीत आहे. जेव्हा तो तुमच्या आशेचा नाश करील, तेव्हा तुम्ही त्याच्या तावडीत सापडता आणि तो तुम्हाला आजाराप्रमाणे अशक्त करतो.

*नीतीसुत्रे १२:१२,''आशा लांबणीवर पडली असता अंतःकरण कष्टी होते, पण इष्टप्राप्ती जीवनाचा वृक्ष आहे.''*

दोन्हीही बाबतीत (संकट देवापासून असो किंवा सैतानापासून असो), स्वतःला देवासमोर लीन करा आणि त्याच्या अधिन राहा, सैतानाला अडवा आणि देव तुम्हाला उंच करील. **परंतु आशा सोडू नका,** कारण ज्याने तुम्हाला पाचारण केले तो विश्वासू आहे आणि तुमच्यासाठी असलेले हेतू पूर्ण करण्यासाठी तो सक्षम आहे. देवाने तुम्हाला फलदायी होण्यासाठी बोलावले आहे. सैतान तुम्हाला हताश करतो - परंतु देवाने केलेली तूमची नेमणूक हिरावून घेण्याचा त्याला आधिकार नाही. म्हणून सैतानाला विरोध करा. तुम्ही विजयी व्हावे अशी देवाची इच्छा आहे; आणि आशा तुमच्या अभिवचनाच्या देशात प्रवेश करण्याचा मार्ग आहे. विजय मिळविण्याचा मार्ग म्हणजे तुम्हाला देवामध्ये जी **आशा आहे (आत्मविश्वास, निश्चीततेसाठी आनंदी आणि धीराने धरलेली अपेक्षा)** त्याद्वारे कठीण समयी देवाचे आभार मानने आणि त्याची स्तुती करणे.

*स्तोत्र ५०:१३, ''जो आभाररूपी यज्ञ करितो तो माझे गौरव करितो; आणि जो सरळ मार्गाने चालतो त्याला मी देवाने सिध्द केलेले तारण प्राप्त करून देईन.''*
*स्तोत्र ३४:१९,''नीतीमानाला फार कष्ट होतात; तरी परमेश्वर त्या सर्वातून त्याला सोडवितो.''*

## मित्र

*योहान १५:११-१५, ''माझा आनंद तुम्हामध्ये असावा व तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा म्हणून मी तुम्हाला हया गोष्टी सांगितल्या आहेत. जशी मी तुम्हावर प्रीती केली तशी तुम्ही प्रीती करावी अशी माझी आज्ञा आहे. आपल्या मित्राकरीता आपला प्राण द्यावा हयापेक्षा कोणाची प्रीती मोठी नाही. मी तुम्हाला जे काही सांगतो ते तुम्ही कराल तर तुम्ही माझे मित्र आहा. मी तुम्हाला जे काही सांगतो ते तुम्ही कराल तर तुम्ही माझे मित्र आहा*

*. मी आतापासून तुम्हाला दास म्हणत नाही, कारण धनी काय करतो हे दासाला ठाऊक नसते; परंतु मी तुम्हाला मित्र म्हटले आहे. कारण जे काही मी आपल्या पित्यापासून ऐकून घेतले ते सर्व मी तुम्हाला कळविले आहे." (बायबल सोसायटी भाषांतर).*

अर्थातच आपण देवाचे दास आहोत. परंतु या वचनाचा अर्थबोध असा आहे की आपल्या धन्याची योजना कोणती आहे हे दासाला समजत नाही. परंतु आपण येशूचे मित्र व्हावे अशी येशूची इच्छा आहे, ज्यांच्यासोबत तो आपले मन आणि आपल्या योजना व्यक्त करू शकतो. फलदायी होणे आणि मित्र असण्याचा तो एक भाग आहे - येशूचे हृदय आणि योजना समजणे. अब्राहाम देवाचा असा मित्र होता (उत्पत्ती १८:१७ वाचा) आणि त्याचप्रमाणे मोशे आणि दावीदहि देवाचे मित्र होते. पृथ्वीवर आपले राज्य वाढविण्यासाठी आपले हृदय आणि योजना प्रगट करण्याची आणि ज्याला या जीवनात आपल्याला तोंड देणे भाग आहे त्या सैतानाची कुयूक्ती हाणून पाडणारी नवनवीन मोर्चेबांधनी आपल्याला देण्याची येशूची इच्छा आहे.

## ३. वैरी :

*"जग जर तुमचा द्वेष करिते तर तुमचा द्वेष करण्यापूर्वी त्याने माझाहि केला आहे हे तूम्हाला माहित आहे. तूम्ही जगाचे असता तर जगाने स्वकीयांवर प्रेम केले असते; परंतु तुम्ही जगाचे नाही. मी तुम्हाला जगातून निवडले आहे. म्हणून जग तुमचा द्वेष करिते. (योहान १५:१८-१९ बायबल सोसायटी भाषांतर).*

फलदायी होण्यामधील एक भाग आहे जगाकडून आपल्यावर आघात होणे. त्याची अपेक्षा ठेवा आणि त्याचे नवल वाटू देउ नका. परंतु आशा गमावू नका, उलट विजयी व्हा. जेव्हा तुम्ही स्वच्छ मनाने आणि स्वच्छ हाताने जीवन जगतो तेव्हा देव फलदायीपणा, सुबत्ता आणि यशाचे वचन देतो, तेव्हा पूर्ण दिवसभर त्याला धन्यवाद द्या आणि त्याची स्तुती करा (मुद्दा १)आणि देवाची अभिवचने बोलून दाखवा - तुम्हाला समजेल की वैरी तुम्हाला पराभूत करू शकत नाही.

प्रेषित ४:२३-३१ वाचा. प्राचीन मंडळीला तीव्र छळाला तोंड द्यावे लागले, परंतु त्यांनी प्रार्थना केली आणि धैयौने आगेकूच केली.

## *व्यक्तिगत संजीवन, भाग ४ - मनाचे नविनीकरण*

**उदाहरण :** एक कैदी तुरूंगात असताना आपले मन येशूसमोर उघडे करतो. तुरूंगातील त्याची वेळ संपल्यावर त्याला मुक्त करण्यात येते. जरी त्याचा नविन जन्म झालेला आहे, तारण झाले आहे, तो प्रामाणिकपणे येशूवर प्रेम करतो आणि त्याने आपले जीवन येशूला वाहून दिले आहे, तरी त्याच्या जुन्या सवयी त्याला बांधून ठेवायला पाहातात असे त्याला दिसून येते. **काय चूकत आहे?**

आता विचार करा. एका काचेच्या बाटलीत बारीक तार भरा. मग ती बाटली फोडून टाका. तुम्हाला काय वाटते त्या तारेचे काय होईल, आता ती तार बाटलीतून बाहेर आली आहे. काय आता ती आपल्या मूळ स्वरूपात पुन्हा येईल किंवा तिला बाटलीत जो आकार मिळाला तसाच तिचा आकार राहील? अर्थातच तारेचा आकार पुर्वीसारखाच राहिल. यासाठी वेळ आणि प्रयत्न लागतात.

तसेच, आपले तारण होण्यापूर्वी आपण बंदीवान होतो. येशूद्वारे मुक्त केले गेल्यावरहि आपण जगाप्रमाणे विचार करतो (आकार आणि नमूने). सरळ होण्यासाठी कष्टाचे प्रयत्न करावे लागतील. असे असले तरी, आपण घाईने पवित्र होऊ शकत नाही. ती पवित्रीकरणाची प्रक्रिया आहे, ज्यामध्ये ‘‘मनाच्या नविनीकरणाचा’’ अंतर्भाव होतो. मनातील तार बाटलीतील तारेहून जास्त आहे आणि आणखी बाटलीतीत तार निर्जीव आहे, पण मनातील तार क्रियाशील आणि प्रतिक्रिया व्यक्ती करणारी आहे. पवित्र शास्त्र विश्वासणा-यांना स्पष्ट सूचना देते, की देवाची इच्छा समजून घेण्यासाठी आपले मन जगाच्या रीतीरीवाजापासून नविन झाले पाहिजे.

*रोम १२ः२, ‘‘देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे म्हणून हया युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वतःचे रूपांतर होऊ द्या.’’*

मनाची जगिक वृत्ती आपल्याला बंदिवान बनवते आणि अधार्मिक प्रतिक्रियेकडे आपल्याला घेउन जाते. त्याला मनाचे ‘‘बालेकिल्ले’’ असे म्हणतात. तीन प्रमुख कारणे आहेत (जॅक टेलर यांच्या संदेशातून) :

(i) आपल्या मागे असलेला अनुभव (उदाहरणार्थ जे लोक नाकारले जातात त्यांच्यावर परिणाम होतो).

(ii) आपल्यामधील अविश्वास (उदाहरणार्थ काहीतरी चांगले करण्याएवढा मी चांगला नाही, मी निरूपयोगी आहे).

(iii) आमच्या आजूबाजूचे जग (उदाहरणार्थ जर तुम्ही आळशी लोकांमध्ये राहाता, तर तुम्हीहि आळशी होता).

या तीन गोष्टींमुळे आपल्या मनात सर्व प्रकारचे विकार, आणि फसवणूक निर्माण होईल, ज्यामुळे आपण आपल्या जीवनात फलहिन होऊ. वरील बालेकिल्यांना खोलवर सेवेची गरज असते, परंतु येथे मी केवळ सर्वसाधारण तत्वांचा वापर करणार आहे, स्वतःच्या उदाहरणामध्ये ते चित्रीत होते.

आपल्या मनातील बालेकिल्ल्यांसाठी वापरण्यात येणारी साधारण तत्वे अशी आहेत.

. नम्रतेने देवाचे वचन सातत्याने आपल्या अंतःकरणात स्विकारणे. योहान ८:३१-३२ चा विचार करा.

*योहान ८:३१-३२, "ज्या यहूद्यांनी त्याच्यावर विश्वास ठेविला त्यांना येशू म्हणाला, तुम्ही माझ्या वचनात राहिला तरे खरोखर माझे शिष्य आहा; तुम्हाला सत्य समजेल आणि सत्य तुम्हाला बंधमुक्त करील."*

काही यहूदी लोकांनी येशूच्या शब्दांकडे लक्ष दिले आणि सुरूवातीला त्याच्यावर विश्वास ठेविला, परंतु त्यांनी व्यक्तीगतरीत्या येशूला वाहून दिले नाही. असे असले तरी, येशूच्या शिक्षणामध्ये राहणे ही खरा शिष्य असण्याची खूण आहे. जे असे करतात, ते ख-यारीतीने येशूचा संदेश धरून ठेवतात ज्याचा परिणाम पापापासून बंधमुक्त होण्यात होतो.

परंतु आपल्या मनाचे देवाच्या वचनाविरूध्द झगडणे सुरू होते, जे देवाच्या वचनाला मानवाच्या अंतःकरणात शिरू देत नाही.

*स्तोत्र ११९:२५, "माझा जीव धुळीस मिळाला आहे; तू आपल्या वचनाप्रमाणे मला नवजीवन दे."*

*स्तोत्र ११९:१३०, "तुझ्या वचनाच्या उलगडयाने प्रकाश प्राप्त होतो; त्याने भोळयांस ज्ञान प्राप्त होते."*

वरील २५व्या वचनामध्ये, आपल्याला दिसते की आपली स्वाभाविक वृत्ती ही दैहिक बाबींना चिटकण्याची असते(धूळ) आणि केवळ देवाचे वचन वाचण्याकडून आणि आज्ञापालनाकडून आपण आत्मिकरीत्या संजीवीत होतो. परंतु, स्वाभाविक वृत्तीच्या मनुष्याचे मन अंधकारमय असते आणि देवाच्या वचन आतमध्ये येण्यासाठी ते विरोध करते, जरी वचनाचा स्विकार केल्यामुळे आपल्यामध्ये प्रकाश येतो आणि आपण संजीवीत होतो. (वचन १३०) देवाचे वचन वाचणे आणि आज्ञा पाळणे हे मनुष्यासाठी नेहमीच आव्हानात्मक राहिल आणि केवळ देवाच्या कृपेनेच तसे केले जाऊ
शकते.

स्मरण ठेवा, मन हा रस्ता आहे जो आपल्याला हृदयाकडे नेतो. सैतान आणि त्याचे दुरात्मे आपल्या मनावर हल्ला करतात आणि आपल्या अंतःकरणात शिरतात. आपल्यापैकी प्रत्येकामध्ये मनाचा विशेष विकृतपणा आहे जो सैतानाला सहजपणे ओळखू येतो जेव्हा आपण त्या क्षेत्रामध्ये अपयशी होतो हे त्याला दिसते. त्या विशेष जागी तो आपल्यावर मोह आणतो जेथे आपण त्याच्यासाठी सोपे भक्ष आहोत हे त्याला दिसून येते.

*याकोब १:१४-१५, "तर प्रत्येक माणूस आपल्या वासनेने ओढला जातो व भुलविला जातो तेव्हा मोहात पडतो. मग वासना गर्भवती होऊन पापाला जन्म देते आणि पाप परिपक्व झाल्यावर मरणास उपजविते."*

**मनाच्या हट्टी वृत्तींवर विजय मिळविण्याचे व्यावहारीक मार्ग**

**उदाहरण** : पर्वताच्या उंच शिखराचा विचार करा ज्याच्या आजूबाजूला भूतकाळामध्ये नाल्या खोदण्यात आल्या होत्या. जेव्हा उंच शिखरावर पाणी पडते, तेव्हा ते लगेच त्या नाल्यांमधून खाली वाहील. मनाच्या हट्टी वृत्ती या

नालीसारख्या आहेत ज्या तशा प्रकारचा विचार वारंवार केल्यामुळे भूतकाळात तयार झाल्या होत्या. आता जेव्हा व्यक्तीचा संबंध उत्तेजित करणा-या घटनेसोबत येतो, त्याचे विचार त्या मानसिक नाल्यांतून वाहातात ज्यावर जवळजवळ तो नियंत्रण ठेवू शकत नाही. मनाचे ते हट्टी विचारप्रवाह कदाचित वासना, मत्सर, राग, पूर्वग्रहदुषितपणा, कर्करोगाचे भय आणि आणखी काहीतरी असू शकेल.

जेव्हा तुमचे अंतर्याम अशा गोष्टींनी उत्तेजित होते तेव्हा दोन पर्याय आहेत. पहिला पर्याय आहे तेथून पळून जाणे. उदाहरणार्थ, लैंगिक वासनेपासून आपण पळून जावे असा पौल १ करिंथ ६:१८ मध्ये बोध करतो, ज्यामध्ये वासना उद्दीपीत करणारे चित्रपटांपासून पळून जाणे हे असू शकते. दुसरा पर्याय आहे जर मोह तुमच्या सर्वबाजूंनी आहेत आणि जर तुम्ही प्रत्येक वेळी पळून जाऊ शकत नाही. उदाहरणार्थ, आपल्या आजूबाजूला सुंदर लोक आहेत, आणि आपण त्यांच्यापासून पळून जाऊ शकत नाही. तरी त्यांच्याकडे पाहिल्याने व्यक्तीमध्ये वाईट विचार येतात. ती सुरूवातीची वाईट भावना पापीष्ट नाही, परंतु आपण त्वरीत आपले विचार सुंभक्तीकडे वळविले पाहिजेत. परंतु कसे?

आपल्या पर्वत शिखराच्या उदाहरणाकडे परत जाऊ. तुम्ही धरण बांधून ते पाणी नाल्यांमध्ये जाण्यापासून थांबवू शकता आणि मग तुम्ही ते पाणी दुस-या नाल्यांकडे वळवू शकता मग तुम्ही विचार केला त्यामानाने त्या उथळ असतील तरी. काही काळाने तुम्ही प्रवाह वळवत राहिला तर त्या उथळ नाल्या खोल होतील. तसेच, हट्टी विचारप्रवाहांमुळे, तुम्ही जगिक विचार थांबवू शकता आणि तुमच्या मनाने दैवी विचार करावे यासाठी तुम्ही त्याला वळवू शकता. यासाठी शिस्त आणि चिकाटी लागते. परंतु **विजयाची हमी** आहे कारण येशूने आपल्यासाठी विजय मिळविला आहे आणि तो जाहीर करतो, **"येथून पुढे पापाची तुमच्यावर सत्ता राहणार नाही."** *(रोम ६:१४)*. खाली अशा अधार्मिक संघर्षाबाबतचे माझे तीन विचार दिलेले आहेत.

**(i) आघात, कडवटपणा आणि रागाबाबत माझा संघर्ष :** पुष्कळ वर्षापूर्वी माझी पत्नी आणि मी, जरा नविन ख्रिस्तीच होतो तेव्हा, एका देवाच्या सेवकासोबत जवळून काम करीत होतो आणि आम्ही त्याच्या सेवेत फार मोठी गूंतवणूक केली होती. मग, काही दुर्दैवी घटना घडल्यामुळे, आमची त्यांच्यासोबतची जवळची भागीदारी कडू झाली . मोठया दुःखाने आम्हाला निघून जावे लागले. आमच्यावर आघात झाला, मन कडू झाले आणि आम्ही रागे भरलो. हा देवाचा सेवक सुपरिचीत असल्यामुळे, त्याचे नाव संभाषणामध्ये नेहमी येत होते आणि त्यामुळे आम्हाला जखम होत होती, कडवट वाटत होते आणि आमच्यामध्ये राग उफाळत होता. आम्हाला ठाऊक होते की आमचे विचार अधार्मिक आहेत, परंतु ख्रिस्ती जीवनातील त्या अवस्थेमध्ये, आम्ही त्यांच्यावर नियंत्रण ठेवू शकत नव्हतो. आम्ही पक्का निर्णय घेतला की आम्ही नकारात्मक बोलणे थांबवू, परंतु आमच्या शब्दांनी त्यांना आशीर्वाद देऊ. असा थांबा आणि वळविलेली विचारशैली जवळजवळ उत्तेजित करणारी आहे आणि लवकरच आमचे मन नविन विचारशैलीने भरून गेले. हळूहळू दोन वर्षांच्या कालावधीनंतर आमच्या भावना आणि विचार पूर्णपणे निरोगी झाले. या समस्येमध्ये असलेली आमची अप्रगल्भता आम्ही स्विकारली. आम्ही प्रेमाने आणि प्रशंसेने देवाने त्या सेवकाच्याद्वारे आमच्यासाठी ज्या चांगल्या गोष्टी केल्या त्याची आठवण करू लागलो आणि

त्यांच्याविषयी त्याप्रमाणे बोलू लागलो. ब-याच वर्षानंतर आम्ही सहभागितेच्या भावनांनी त्यांची भेट घेतली. आम्ही पूर्ण विजयाचा अनुभव घेतला.

**(ii) पुर्वग्रहदुषितपणाबाबत माझा संघर्ष** : मी मुबईच्या उग्र शेजारीपाजा-यांमध्ये वाढलो आणि स्वतःचे रक्षण करण्यासाठी कठोर उपाययोजना करू लागलो. जो कोणी मला खालच्या नजरेने पाहात आहे असे मला वाटत होते त्यांच्यासोबत मी सहसा आक्रमक आणि अरेरावी करीत होतो, विशेषतः गो-या लोकांसोबत. स्पष्टपणे मी पुर्वग्रहदुषित होतो आणि हे अधार्मिक होते. मला ते विचार थांबवावे लागले जे स्वाभाविकपणे मजकडे येते होते जेव्हा मी अशा लोकांना भेटत होतो आणि त्यांना देवाच्या नजरेतून पाहण्यासाठी मी माझे विचार वळविले, ती व्यक्ती मुक्त करण्याजोगी, ख्रिस्ताप्रमाणे होण्याच्या प्रवासात माझ्यासारखीच कृपेची गरज असलेली आहे असे मी समजू लागलो. पुष्कळ वर्षांनंतर, या विभागात माझी चांगली वाढ झाली आहे असे मला दिसून आले.

**(iii) असुरक्षितेबाबत माझा संघर्ष** : जरी मुंबई शहरामध्ये मी प्रार्थनेचा समन्वयक म्हणून पुष्कळ वर्षे सेवा केली तरी मी प्रमुख पाळकांच्या बाबतीत असुरक्षितेसोबत झगडत होतो. मी ही असुरक्षितता माझ्या कठोर व्यक्तीमत्वाच्या आड लपवित होतो. परंतु अशी लपवाछपवी सुध्दा अधार्मिक होती. मी या संघर्षातून त्याच पध्दतीने बाहेर आलो - असुरक्षितपणाच्या त्या विचारांना पूर्ण विराम देणे आणि माझे विचार वळविणे, प्रथम मी देवाच्या धोका न देणा-या प्रेमामध्ये मी सुरक्षित आहे याद्वारे आणि हे समजून की आपला प्रभू माझ्या अवतीभवती असणा-या देवाच्या सेवकांद्वारे स्वतःला प्रगट करीत आहे आणि माझ्याप्रमाणे ते सुध्दा पित्याच्या राज्यामध्ये सहभागी आहेत. यामुळे माझी असुरक्षितता तुटली आणि त्यामुळे ज्या प्रत्येक सेवकाला मी भेटलो त्यांच्यामध्ये ख-यारीतीने रूची राखण्यास, त्यांच्यासोबत आनंद करण्यास मला मोकळीक मिळाली. या विभागात मला वाढते यश मिळत आहे.

मी इतर क्षेत्रांमध्ये सुध्दा संघर्ष केला आहे जसे की चिंता, राग आणि वासना. परंतु माझ्या विजयाचा मार्ग मी वर दिलेला आहे - थांबा आणि तुमचे विचार देवासंबधीच्या गोष्टीकडे वळवा.

**मनातील रचनांवरील संघर्षांचा सामना करण्यासाठी आपली जबाबदारी सांगणारे शास्त्रवचनेः**

रोम ६ हे ख्रिस्ताबरोबर आपले एकत्रीकरण या बद्दल आहे. ते पापाला मारणे आणि ख्रिस्तामध्ये जिवंत राहण्याविषयी बोलते. कारण जेव्हा तो मेला तेव्हा , आम्ही त्याच्याबरोबर मेलो. तो पुन्हा जिवंत झाला आणि जिवंत आहे म्हणून आपण त्याच्यामध्ये नवीन जीवन जगतो (रोम ६: २-४). पाप तुझ्यावर स्वामित्व चालविणार नाही (रोम ६:१४). पण, ख्रिस्तामध्ये विजयाच्या या महान अध्याया नंतर, पौल ७: ७-२४ मध्ये आपला फलक आपल्या प्रभू येशू चा विजय होई पर्यंत त्याचे लक्ष्य केंद्रित होई पर्यंत पापाशी कसा झगडत आहे ते सांगतो, (७: २४-२५). आणि नंतर रोम ७ नंतर ८ रोम येते जे पवित्र आत्म्याच्या द्वारे जीवन ह्यासंबंधी आणखी एक गौरवशाली अध्याय आहे जो ख्रिस्ताचा विजय सतत आपल्या अंतःकरणामध्ये आपल्याला प्रकट करतो. परंतु रोम

८: ५-८ मध्ये आपल्याला हे लक्षात येते की आत्म्याला काय करण्याची इच्छा आहे यावर ''आपले मन'' लावावे नाही तर आपण रोम ६ मध्ये दिलेला विजय प्राप्त करू शकणार नाही. जेव्हा आपण आपले मन पापी स्वभावाच्या इच्छांवर लावतो तेव्हा आपण ख्रिस्ताचे सर्व अफाट सामर्थ्य बंद करतो. येशूने आपल्यासाठी सर्वकाही केले आहे, परंतु तो आपल्या इच्छा स्वातंत्र्यामध्ये हस्तक्षेप करणार नाही. आपले मन लावण्याची आपली जबाबदारी अनेक इतर वचनांमध्ये दिली आहे. आपण देवाची प्रार्थना करू शकतो की आपण अनीतीसाठी ''नाही'' म्हणावे म्हणून (तीत २: ११-१२) आणि त्याच्या आज्ञांचे पालन करण्याकरिता आपण प्रेरित व्हावे त्याने आपल्याला कृपा पुरवावी. तरीसुद्धा, आपण हेतुपुरस्सर वरील गोष्टींकडे आपले मन लावावे ही आपली जबाबदारी आहे. आम्ही सहजपणे त्याची कृपा ओलांडू शकतो आणि तो आपल्याला त्याच्या आज्ञांकडे दुर्लक्ष करण्यापासून रोखणार नाही. येथे काही शास्त्रवचने आहेत जी आपल्या असभ्य विचारांना रोखण्यासाठी आणि त्यांना देवाकडे पुन्हा निर्देशित करण्याची आपली जबाबदारी सांगतात.

*कलसै ३: २ ज्यावरील (स्वर्गातील)* ***गोष्टी आहेत त्याबद्दलचा विचार करा.*** *ज्या गोष्टी पृथ्वीवरच्या आहेत त्यांचा विचार करु नका.*

*इफिस ४: २२-२४ तुमच्या पूर्वीच्या जीवनाविषयी, तुम्हांला तुमच्या जुन्या मनुष्यापासून सुटका करुन घेण्यास शिकविले होते, जो मनुष्य फसवणुकीच्या इच्छेने अशुद्ध झाला आहे. २३ यासाठी तुम्ही अंतःकरणामध्ये व आत्म्यात नवे केले जावे आणि २४ नवा मनुष्य तुम्ही धारण करावा, जो देवाप्रमाणे निर्माण केलेला आहे.*

*कलसै ३: ८ पण आता, तुम्ही या सर्व गोष्टी बाजूला केल्या पाहिजेतः राग, क्रोध, दुष्टता, निंदा आणि तुमच्या मुखातील लज्जास्पद बोलणे, या सर्व गोष्टी तुम्ही दूर केल्याच पाहिजेत.*

*स्तोत्र ३४:१४ वाईट कृत्ये करणे सोडून द्या. चांगली कृत्ये करा. शांतीसाठी काम करा. शांती मिळे पर्यंत तिच्या मागे धावा.*

## काही व्यावहारिक सल्लाः

*१ करिंथ १०:१३ जे मनुष्याला सामान्य नाही अशा कोणत्याही मोहाने तुम्हाला पकडले नाही. परंतु देव विश्वासनीय आहे. तुम्हांला सहन करता येते त्यापलीकडे तो तुमची परीक्षा घेणार नाही. परंतु त्या मोहाबरोबर, त्यातून बाहेर पडण्याचा मार्गही तयार करील. म्हणजे तुम्हांला सहन करणे शक्य होईल.*

आपल्या सर्वांच्या या जीवनात कटुता, क्रोध, संताप, मत्सर, वासना, भीती, चिंता, असुरक्षितता इत्यादींचा मोह होतो. दुसऱ्या तरुणालाध्तरुणीला पाहून मोहित होणाऱ्या तरुण व्यक्तीचे उदाहरण घ्या. कदाचित पहिली व्यक्ती अधार्मिक विचार किंवा भावना ह्यांचा सामना करेल. हे सर्व प्रारंभिक विचार फक्त एक नैसर्गिक प्रतिक्रिया असू शकते आणि त्यासाठी दोषी वाटू नये आणि लज्जित होऊ नये. हे एका गरीब माणसासारखे आहे ज्याने आपल्या अह्फिसमध्ये पडलेली भरपूर रोख रक्कम पाहिली आहे. जर कोणीही पाहत नसेल तर ती खिशात टाकण्याचा मोह निर्माण होईल. परंतु जर त्याने त्या विचारांना नकार दिला नाही आणि त्याला ईश्वरी विचारांनी बदलले नाही , तर तो ती रोख घेईल आणि त्याविषयी गप्प बसेल. आता, ही चोरी आणि पाप आहे. पण एक खरा शिष्य अयोग्य विचार व भावनांनी नियंत्रित केला जाणार नाही, ज्या बाह्य उत्तेजनांद्वारे सुरुवातीला त्याच्या मनात उतरतात. **उलट, एक खरा अनुयायाची आत्म्याची इच्छा काय आहे त्यांने चालेल** *(रोम ८: ५).* तो आपल्या डोक्या वर फिरणाऱ्या कावळ्याला थांबवू शकत नाही, परंतु कावळ्याला आपल्या डोक्यावर घरटे बांधू देण्याचा नक्कीच प्रतिकार करू शकतो.  शिष्याने वरील गोष्टींकडे ‘‘आपले मन‘‘ लावले तर *(कल ३: २),* तो आपल्या अयोग्य विचारांना इच्छा-आकांक्षाना नाकारून देवाच्या विचारांकडे नेऊ शकतो.

येशूच्या अमर्याद शक्तीआणि कृपा उपलब्ध आहे, परंतु आपल्या इच्छाशक्तीचा स्विच आपल्या हातात पूर्णपणे आहे आणि आपण अधार्मिक विचारांना बंद करावे अंड आपले विचार वरील गोष्टींकडे पुन्हा न्यावे. सराव, चिकाटी आणि शिस्त यासह, आम्ही ते साध्य करू शकतो. म्हणून निराश होऊ नका. येशू विजये झाला आहे आणि त्याने जाहीर केले आहे, ‘‘ पाप तुम्हांवर राज्य करणार नाही. कारण तुम्ही नियमशास्त्राधीन नाही तर देवाच्या कृपेच्या अधीन आहात. ‘‘ (रोम ६:१४).

**पण, सैतानाच्या सामर्थ्याने लादलेले हट्टी विचार प्राणघातक लढा दिल्या शिवाय आपल्याला सोडणार नाही.**

*२ करिंथ १०: ३-५ कारण जरी आम्ही जगामध्ये राहत असलो, तरी जगाप्रमाणे लढाई करीत नाही. ४ ज्या शस्त्राने आम्ही लढाई करतो ती जगातल्या शस्त्रांसारखी नाहीत. उलट, त्यांच्यामध्ये दैवी शक्ति आहे ज्यामुळे शत्रूचे बुरुज नष्ट होतात. ५ आम्ही वाद आणि जे देवाविषयीच्या ज्ञानाविरुद्ध उभे राहते ते नष्ट करतो आणि प्रत्येक विचार पकडून त्याला ख्रिस्ताच्या आज्ञा पाळायला लावतो.*

त्या हट्टी दुष्ट विचारांना नाश करण्यासाठी आणि त्यांना ख्रिस्ताच्या आज्ञाधारकतेमध्ये बंदिसत करण्यासाठी जे शास्त्र आपण वापरतो ते : **देवाच्या वाचनावर मनन करणे** आहे ज्यामुळे  पश्चात्ताप, नम्रता, प्रार्थना आणि आपल्या जीवनात येशूच्या नावाने पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने देवाचे वचन बोलणे ज्या गोष्टी येतात.

देवाच्या वचनावर **मनन करण्यासाठी वेळ आणि मेहनत लागते**. यामध्ये सतत देवाचे वचना वर विचार करणे आणि त्यानुसार प्रार्थना करणे समाविष्ट आहे जेणेकरून वचन आपल्या मनामध्ये आणि हृदयापर्यंत आपल्याला कळवेळ की देवाचा मार्ग योग्य आणि आपल्यासाठी सर्वोत्तम आहे, परंतु आमचा मार्ग चुकीचा आहे आणि मृत्यूसाठी कारणीभूत आहे. देवाच्या वचनावर मनन केल्याने मन आणि हृदय बदलेल.

(पश्चात्ताप) जीवनाकाडे नेईल. अशिक्षित विश्वासानारेही देवाचे वचन पाठ करून आणि त्यांच्यावर मनन करून हे करू शकतात.

*यहोशवा १: ८-९ नियमशास्त्राच्या त्या ग्रंथात लिहिलेल्या सर्व गोष्टी नेहमी लक्षात ठेव. रात्रंदिवस त्या ग्रंथाचे मनन कर म्हणजे तुझ्या हातून त्याचे पालन होईल. असे वागलास तर अंगिकारलेल्या सर्व गोष्टीत सफल होशील. ९ खंबीर आणि निर्भय राहण्याची मी तुला आज्ञा केली आहे ना? तेव्हा कचरू नकोस. परमेश्वर तू जेथे जाशील तेथे तुझ्या बरोबर आहे."*

*स्तोत्र १: १-३ माणसाने जर वाईट लोकांचा सल्लामानला नाही, तो पापी लोकांसारखा राहिला नाही आणि देवावरविश्वास न ठे वणाऱ्या लोकांबरोबर राहाणे त्याला आवडले नाही तर तो माणूस खरोखरच सुखी होईल. २ चांगल्या माणसाला परमेश्वराची शिकवण आवडते तो त्याबद्दल रात्रंदिवस विचार करत असतो. ३ त्यामुळे तो माणूस ओढ्याच्या कडेला लावलेल्या झाडासारखा शक्तिशाली होऊ शकतो तो योग्यवेळी फळे येणाऱ्या झाडासारखा असतो तो पाने असलेल्या व न मरणाऱ्या झाडासारखा असतो तो जे काही करतो ते यशस्वी होते.*

**येथे महत्त्वपूर्ण वाचन आहेत जे आपल्याला जीवनातील सामान्य संघर्षांत मदत करू शकतात :**

रागाबरोबर संघर्ष : स्तोत्र ३७: ८; प्रो १४:२९; १६:३२; इफिस. ४:२६, ३१; स्तंभ ३: ८; याकोब १: १ ९-

लोभाबरोबर संघर्ष: इफिस. ४:२२, २४; १ पेत्र २:११; फिली ४: ८; २ कर १०: ४-५; रोम ६: ११-१२

कडूपणा बरोबर संघर्ष: इफिस ४: ३१-३२; इब्री १२:१५.

काळजीबरोबर संघर्ष: फिलपै ४: ६य १ पेत्र ५: ७

गर्वाबरोबर संघर्ष: याकोब ४: ६; १ पेत्र ५: ५-६; गलती ६: ३, १४.

लोभीपणा बरोबर संघर्ष: स्तोत्र ११९: ३६; लूक १२:१४; ३: १-२, ५-६; फिलपै ४: ११-१२; १ तिम ६: ६; इब्री १३: ५.

## वैयक्तिक संजीवन भाग ५: आत्म्याने पेरणी *(गलती ६: ७-१०)*

*गलती ६: ७-१०* तुम्ही फसू नका. देवाची थट्टा होणे शक्य नाही. कारण एखादी व्यक्ति जे पेरीते त्याचेच त्याला फळ मिळेल. ८ जो कोणीआपल्या देहस्वभावचे बीज पेरतो त्याला देहस्वभावापासून नाशाचे पीक मिळेल. पण जो आत्म्यात बीज पेरतो, त्यालाआत्म्यापासून सार्वकालिक जीवनाचे पीक मिळेल. ९ जे चांगले आहे ते करण्याचा आपण कंटाळा करु नये. कारण आपणआळस केला नाही, तर योग्य वेळी आपणांस आपले पीक मिळेल. १० तर मग ज्याप्रमाणे आपणांस संधि मिळेल, तसे सर्वलोकांचे आणि विशेषतः ज्यांनी सुवार्तेवर विश्वास ठेवला आहे त्यांच्या घराण्याचे चांगले करु या.

आपण या वचनांचा अभ्यास करू याः

**व ७ं अः फसू नकाः** जेव्हा पवित्र शास्त्र म्हणते की ''फसु नका'' दृ ते ह्यासाठी कि आपल्या स्वर्गीय पित्याला हे ठाऊक आहे की त्याच्या मुलांना नक्कीच फसविण्यात येईल. त्यामुळे या प्रकरणात, आपण आपल्या जीवनात वाईट बीजाची पेरणी करत राहिलो आणि देव चांगला आहे आणि आपल्या मुलांवर प्रेम करतो आपण आपल्याबरोबर  काही वाईट घडणार नाही असा विचार केला तर आपली फसवणूक होईल.

**व ७बःदेवाचा उपहास व्हावयाचा नाही.** एक माणूस जे काही पेरतो त्याचेच त्याला फळ मिळते. देवाच्या नियमांना अपवाद नाही. देवाचे नियम सार्वत्रिक आहेत आणि त्याचे कायदे विश्वासू आणि अविश्वासू लोकांसाठी सारखेच लागू आहेत.

**व८ः** आपल्या अध्यात्मिक जीवनाच्या संदर्भात देवाचे नियम स्पष्ट केले आहे. प्रत्येक मनुष्याला (विश्वास ठेवणाऱ्या ख्रिस्ती व्यक्तीला सुद्धा) जर वाईट बीज पेरतो नासहाचे पिक उदा. देहापासून येणारे वागणुकीचे बीज. वाईट बि पेरणे आपले आध्यात्मिक जीवन खाली आणेल आणि नष्ट करेल, आपण फलदायी होणार नाही. एक ख्रिस्ती विश्वासणारा त्याच्या आध्यात्मिक जीवनात चांगले बियाणे बी पेरतो तर तो ध तो देवामध्ये असलेले (अनंतकाळचे जीवन- धार्मिकतेचे, शान ती व आनंद ह्याची कापणी करेल. - १४: १७-१८). अशा व्यक्तीचे वैयक्तिक संजीवन होईल.

**व ९ः** जर आपल्याला लगेच परिणाम दिसले नाहीत तर सैतान आपल्याला निराश करतो व आपल्याला अविश्वास करायला लावतो. म्हणून, चांगले करण्याचे सोडू नका कारण ती विश्वासाची परीक्षा आहे. परंतु जेव्हा आपण चांगलं काम करत राहतो , तेव्हा आपण निश्चितपणे योग्य वेळी कापणी करू (एका विशिष्ट कालावधीनंतर, जे आपल्याला देवाच्या हातात सोडावे लागेल)

**व१०ः** म्हणून विश्वासात राहण्याचा आणि प्रत्येकाचे भले करण्यासाठी सतत प्रयत्न करा. परंतु विशेषतः विश्वासनार्यांचे चांगले करण्याकरिता काम करा कारण तुम्ही चांगली मातीमध्ये बी पेरणी करीत आहात ज्यातून मोथे पिक उत्पन्न होईल.

खालील वचनांचा विचार करा. लक्षात घ्या की ते पेरणी आणि कापणी यांची रचना आणि पेरणी आणि कापणी दरम्यानचे अंतर दाखवतात.

*होशेय १०:१२ एफ्राईम शिकविलेल्या तरुन कालवडीप्रमाणे आहे. तिला खळ्यातील धान्यावरुन चालायला आवडते. मी तिच्या गळ्यात चांगले जोखड अडकवीन. एफ्राईमला दोराने बांधीन मग यहूदा नांगरणी करील याकोब स्वतः ढेकळे फोडील.*

*होशेय १२: ६ म्हणून आपल्या परमेश्वराकडे परत या त्याच्याशी निष्ठा ठेवा. योग्य तेच करा. तुमच्या परमेश्वरावर नेहमी विश्वास ठेवा.*

*स्तोत्र ३७:३४ परमेश्वर सांगतो तसे करा परमेश्वराच्या मदतीची वाट पाहा. त्याला अनुसरा दुष्टांचा नाश होईल, परंतु परमेश्वर तुम्हाला महत्व देईल आणि देवाने कबूल केलेली जमीन तुम्हाला मिळेल.*

*याकोब ५: ७- यासाठी बंधूंनो, प्रभूच्या येण्यापर्यंत धीर धरा, लक्षात ठेवा की, शेतकरी आपल्या शेतातील मोलवान पिकाची वाट पाहतो. तो धीराने त्याची वाट पाहतो. पहिला व शेवटचा पाऊस मिळेपर्यंत वाट पाहतो. ८ तुम्हीसुद्धा धीराने वाट पाहिली पाहिजे. धैर्य धरा, कारण प्रभूचे दुसरे आगमन जवळ आले आहे.*

*इब्री १०: ३५-३६ म्हणून तुमच्यामध्ये जो दृढ विश्वास होता तो सोडू नका. कारण त्यापासून तुम्हाला मोठा लाभ होणार आहे. ३६ तुम्ही धीर धरणे जरूरीचे आहे. म्हणजे जेव्हा तुम्ही देवाची इच्छा पूर्ण करून त्याने तुम्हांला दिलेल्या त्याच्या वचनाप्रमाणे तुम्ही प्रतिफळ मिळावे.*

**पेरणी पद्धती**

**चांगले कर्म पेरणे आणि त्याची प्रतीक्षा करणे**. योग्य न्याय करा, धार्मिक कार्ये करा, गैरसोयीचे असले तरी प्रेमळ व दयाळू असा, नियमितपणे दशमांश द्या *(होशे १२: ६)*.

**नियमितपणे प्रार्थना व उपास करा आणि वाचनाचे मनन करा** आणि त्याची प्रतीक्षा करा. आर्थर वालिसने एकदा सुप्रसिध्द आणि अतिशय फलदायी ख्रिश्चनांच्या जीवनाचा अभ्यास केला त्यांला असे आढळले की फलदायी आणि देवभक्तीचे त्यांचे रहस्य हे होते की ते सर्व दररोज किमान एक तासासाठी प्रार्थना करीत होते, ते आठवड्यातून कमीत कमी एक दिवस उपवास करतात आणि ते सर्व वर्षभर सुरवाती पासून शेवटपर्यंत पवित्र शास्त्र वाचतात.

**पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणाऱ्या स्तानिक मंडळीशी पूर्णपणे समर्पित रहाः**कारण देवाचे राज्य या जगात आणण्यासाठी मंडळी देवाचे विशेष साधन आहे. *(इफिस ३: १०-११)*

त्याची वाट पाहत असताना **विश्वास ठेवा आणि त्याचे आश्वासनांचा दावा करा** *(२ पेत्र १: ३-४, ३: ८-९, इब्री ६: १२-१५).*

**त्याच्यामध्ये आनंद करा,** सर्वकाही साठी धन्यवाद द्या आणि सतत प्रार्थना करा म्हणजे त्याचा सतत त्याचा अस्तीत्वाचा सराव करा आणि त्याच्यावर अवलंबून रहा *(१ थेसल्नी ५: १६-१८).*

**प्रत्येकासाठी चांगले इच्छेचे बाह्य स्वरूप ठेवा,** आजारी लोकांसाठी प्रार्थना करा. त्याची प्रतीक्षा करा. *२ राजे ३* वाचा, विशेषतः *अ १६-२०* देव असे म्हणतो की जेव्हा इस्राएली लोकांनी वाळवंटातील खंदक (बाह्य स्वरूप) खोदले तेव्हा त्याने त्यास (कृपा आणि अभिषेक) पाण्याने भरले, तर  आपण बाहेर वाहत असतांना तो आपले जीवन त्याच्या कृपेने आणि अभिषेकाने भरून टाकेल. रोज अन्य भाषेमध्ये प्रार्थना करा कारण देवाने आपल्याला बांधण्यासाठी दिलेले ते एकमेव दान आहे. *(१ करिंथ १४: ४).*

**वारंवार सुवार्तेची घोषणा करा व त्याचे अध्ययन** : *नीती ११:३०* चांगला माणूस ज्या गोष्टी करतो त्या जीवनवृक्षासारख्या असतात. शहाणा माणूस लोकांना नवे आयुष्य देतो.

*फिलीपै १: ५-६ कारण अगदी पहिल्या दिवसांपासून ते आजपर्यंत सुवार्तेच्या कामात तुमचा सहभाग आहे. ६ मला याची खात्री आहे की, ज्या देवाने तुमच्यामध्ये अशा प्रकारचे चांगले कार्य सुरु केले आहे, तो ख्रिस्त येशू येण्याच्या वेळेपर्यंत ते पूर्ण करीत आणील.*

आपण आपल्या आध्यात्मिक जीवनामध्ये दररोज चांगले बियाणे पेरत असतांना , आपण अनंत जीवन प्राप्त करू शकता, जे देवाचे जीवन आहे. हे पवित्र आत्म्याद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या खोल संगतीत असलेले  जीवन आहे. पवित्र आत्म्यामध्ये धार्मिकता, शांती आणि आनंदाचे  जीवन आहे *(गलती ६: ७-१०).* **आणि तुम्ही प्रभूमध्ये बलवान व्हाल** *(इफिस ६:१०).* **तुम्ही शिष्यत्वात वाढाल आणि वैयक्तिक संजीवन प्राप्त कराल**

# *काळाची चिन्हे*

*मत्तय २४: १-३ येशू मंदिरातून बाहेर निघून चालत निघाला होता तेव्हा त्याचे शिष्य त्याच्याकडे आले. कारण त्यांना त्याला मंदिराच्या इमारती दाखवायच्या होत्या. २ प्रतिसादादाखल, तो त्यांना म्हणाला, तुम्ही या सर्व गोष्टी पाहता. खरे ना? आता, मी तुम्हांला खरे सांगतो, येथे एक दगड दुसऱ्या दगडावर राहणार नाही. त्यातील प्रत्येक दगड खाली टाकला जाईल." ३ येशू जैतूनाच्या डोंगरावर बसला असताना, त्याचे शिष्य त्याच्याशी एकांतात बोलावे म्हणून आले, ते म्हणाले, आम्हांला सांगा की या गोष्टी कधी होतील? तुम्ही परत येण्याचा आणि जगाचा शेवट होण्याचा काळ जवळ आला आहे हे आम्ही कोणत्या घटनांवरून ओळखावे?"*

**शिष्यांनी मत्तय २४: ३ मध्ये दोन प्रश्न विचारले.**

**प्रश्न** १: हे केव्हा होईल (मंदिर नाश)?

**प्रश्न** २:त्याच्या दुसऱ्या येण्याच्या वेळी आणि काळाच्या समाप्तीचे काय चिन्ह असेल?

मत्तय २४-२५ (मार्क १३ आणि लूक २१) यांना देखील ओलिव्हेट भाषण असे म्हटले जाते कारण येशूने येरुश्लेमच्या पूर्वेस जैतून पर्वत वर ते केले. हे वल्हांडण आणि वाधस्ताम्बावर जाण्या आधी दोन दिवस अगोदर झाले (मत्तय २६: २).

**प्रश्न १: यरुशलेममधील मंदिरांचा नाश करण्यासंबंधी येशूने मत्तय २४: २ मध्ये थोडक्यात उत्तर दिले परंतु लूक २१: २०-२४ मध्ये स्पष्ट केले.**

*लूक २१: २०-२४ " जव्हा तुम्ही यरुशलेमाला सैन्यानी वेढा घातलेला पाहाल, तेव्हा तुम्हांला कळून येईल की, तिचा नाश होण्याची वेळ आली आहे. २१ जे यहूदीयात आहेत त्यांनी डोंगरांमध्ये पळून गेले पाहिजे. जे रानात आहेत त्यांनी शहरात जाऊ नये. २२ ज्या सर्व गोष्टी लिहिलेल्या आहेत त्या पूर्ण होण्यासाठी हे शिक्षेचे दिवस आहेत. २३ त्या दिवसांत ज्या गरोदर स्रिया आहेत, व ज्या बाळाचे पोषण करणाऱ्या स्रिया आहेत, त्यांच्यासाठी ते किती भयंकर होईल. अशा स्त्रियांची खरोखर दुर्दशा होईल. मी असे म्हणतो कारण देशावर मोठे संकट येईल आणि लोकांवर देवाचा कोप ओढवेल. २४ ते तरवारीच्या धारेने पडतील आणि त्यांना बंदीवान करुन राष्ट्रांत नेतील आणि यहूदीतर लोकांचा काळ संपेपर्यंत यहूदीतर राष्ट्रे यरुशलेम पायाखाली तुडवतील.*

हे इ.स ७० मध्ये पूर्ण झाले जेव्हा रोमन सैन्याने यारुश्लेमला वेढा घातला आणि या वचनाप्रमाणे केले. आक्रमण करणाऱ्या रोमन सैनिकांनी मंदिराला आग लागली तेव्हा दगडांच्या क्पारीमध्ये गेलेले सोने काढण्यासाठी प्रत्येक दगड पालथा केला. इ.पू. ६०५ मध्ये नबुखदनेस्सराने यरुशलेमवर विजय मिळवला त्यावेळच्या काळात काही विदेशी सैन्याने केवळ थोड्या काळासाठी शहर ताब्यात घेतले. तथापि, १ ९ ६७ पासून, इस्रायली यहुदी लोकांनी यरुशलेमवर परतकब्जा केला आणि ते ताब्यात घेतले - हे हे सूचित करते की परराष्ट्रीयांची वेळ कदाचित संपुष्टात आली आहे.

**प्रश्न २: काळाच्या समाप्ती संबंधी मत्तय २४: ४-२८ मध्ये येशूने हे उत्तर दिले - ज्यामध्ये त्याने काही सामान्य चिन्हे दिली आणि काही ठराविक संकेत दिले.**

मत्तय मध्ये<u>सामान्य चिन्हे</u> २४: ४-१३ प्राचीन मंडळी पासून वाढत आहेतः

व ४-५: खोटे-ख्रिस्तः प्राचीन मंडळी पासून अनेक खोटे ख्रिस्त प्रगट झाले जे असाधारण शक्तीचा दावा करतात. ते उघडकीस आले होते, पण नवीन दिसू लागले.

व ६-७ : युद्धे आणि युद्धांच्या अफवा नेहमी मानवी इतिहासात आहे. तथापि, त्यांची वारंवारता आणि तीव्रता वाढेल. दुसऱ्या येण्या आधी आणखी एक शेवटचा युद्ध (प्रगटी १६: १३-१६) होईल.

व ७ : औषधोपचारात आलेले यश उदा. एड्स, कॅन्सर इ असूनही रोगराई वाढत आहे

व ७ : वारंवार येणारे भूकंप आणि दुष्काळ या काळात येत आहेत. तथापि, शेवटचा भूकंप इतका भव्य असेल की दुसऱ्या येण्या (प्रगटी. १६: १८-२०) आधी राष्ट्रांच्या शहरांचा नाश होईल.

व ९-१० : १ ९ ०० पासून, ख्रिश्चनांना पूर्वीपेक्षा जास्त छळ सहन करावा लागत आहे.

व ११ : खोटे संदेष्टे, खोट्या शिकवणी उदयास आल्या आहेत उदा. यहोवाचे साक्षीदार, महर्मन इ.

व १२ : ख्रिश्चन असल्याचा दावा करणारे बरेच लोक तसे जगिक झाले आहेत आणि त्यांच्यात प्रभूवर आणि एकमेकांसाठी प्रेम नाही. तथापि, जो शेवटपर्यंत आपले जीवन आणि सिद्धान्त याकडे लक्ष दयेल त्याला वाचवले जाईल आणि तो फसणार नाही.

<u>विशिष्ट संकेत</u> *मत्तय २४: १४-३१* मधील विशेषतः शेवटल्या काळात घडतात.

व १४: संपूर्ण जगात सुवार्ता प्रचार केला जाईल. प्रभूच्या दयामुळे काळाचा शेवट लांबविला जात आहे कारण अधिक लोकांनी पश्चात्ताप करून सुवार्तावर विश्वास ठेवावा आणि अशा प्रकारे तारण प्राप्त करावे म्हणून डावाची कृपा आहे (२ पेत्र ३: ९). त्याने आपल्याला सुवार्ता सांगण्याचे काम सोपवले आहे. आता २१ व्या शतकात हे शक्य झाले आहे कारण टीव्ही आणि इंटरनेटमुळे हे पूर्वी कधीही झाले नव्हते.

व १५-२२: ‘‘महान संकट‘‘ नावाचा सर्व पृथ्वीवर महान अडचणीचा एक काळ असेल

व १५ मध्ये, आमचा प्रभु येशू विशेषतः दानियल ११-१२ मधील दृष्टिकोनाकडे आपले लक्ष आकर्षित करतो. तो असा उल्लेख करतो की भयावह (नाश) कारणीभूत असलेल्या घृणास्पद गोष्टीचा देखावा मोठ्या संकटाचा प्रारंभ करण्यासाठी होईल. मत्तय २४: १४-३१ आणि दान ११-१२ मध्ये उल्लेख केलेल्या विशिष्ट चिन्हे मंडळी आणि जगभरातील देशांत तीव्रतेने वाढत आहेत. लोक ख्रिस्ताला अनुसने सोडत आहेत आणि मोठ्या संख्येने ख्रिश्चन त्यांच्या जीवनशैलीत मोठ्या तडजोडी करीत आहेत. जगात वाईटाची खूप वेगाने वाढ होत आहे आणि समाजाची पायाभरणी धोक्यात आहे. गेल्या पन्नास वर्षात आपल्याला हे माहित होतं की जीवन परत येणार

नाही, उलट प्रत्येक महिना जात असतांना ते आणखी वाईट होतं आहे असं दिसतं. तथापि, मी नाशाचा संदेष्टा नाही, परंतु जो काळाची चिन्हे समजून घेण्याची आणि आशा देतो तो आहे. दानीयल ११: ३२-३३ अशा लोकांविषयी बोलते ज्यांनी देवाला ओळखले आहे आणि घृणास्पद गोष्टींचा प्रतिकार करतात आणि ते अनेकांना मार्गदर्शन करतील. प्रियांनो, आता तयार राहा, देवाच्या जवळ या आणि इतरांनाही असे करण्यास मदत करा. कारण काळोख जास्तीतजास्त असेल तेव्हा मंडळीचा उत्तम काळ असेल, जेव्हा मंडळीद्वारे देवाचे गौरव चमकेल आणि परिणामी मोठ्या प्रमाणात कापणी होईल (यश ६०: २-३).

व २२: मानवजातीला टिकून राहण्यासाठी दिवस कमी केले जातील.

व २३-२५: आमचे प्रभु येशू आम्हाला चेतावणी देत आहे की अनेक खोटे-ख्रिस्त आणि खोटे संदेष्टे लोक शक्यतो लोकांना फसवण्यासाठी चमत्कारिक चिन्हे करतील, तर ते खऱ्या विश्वास्नार्यांना फसवण्यासाठी प्रयत्न करतील.

व २३:प्रभुच्या दुस-या येण्याच्या अकाली बातम्या येतील.

व २९:दुसर्या येण्याआधी आकाशात उल्लेखनीय चिन्हे होतील.

व ३०:प्रभु येशूचे चिन्ह आकाशात दिसेल आणि जेव्हा आपला प्रभु येशू आकाशात ढगावर येईल तेव्हा राष्ट्रे शोक करतील (मत्तय २४:३०)

व३१: देवदूत आकाशात तुतारीचा मोठा आवाज करतील आणि ते खऱ्या विश्वास्नाऱ्याना आकाशातील एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत एकत्र करतील

**तथापि, दुस-या येण्यापूर्वी काय घडणे आवश्यक आहे ते पुढील वाचनात लक्षात घ्या कीः**

२ **थेस्सलनी** २: ३-४*तर कोणीही तुम्हाला कोणत्याही प्रकारे फसवू नये. म्हणून सावध असा. मी असे म्हणतो कारण पहिल्यांदा मोठी* ***बंडखोरी****झाल्याशिवाय प्रभूचा दिवस येणार नाही. आणि जो नाशासाठी नेमला आहे, तो नियम मोडणारा प्रकट होईल. ४ तो विरोध करील आणि स्वतःला सर्व गोष्टींच्या वर उच्च करील. त्याला देव किंवा उपासना करण्याची कोणतीही एखादी वस्तु असे म्हणतील. येथपर्यंत की तो देवाच्या मंदिरात जाईल आणि सिंहासनावर बसेल आणि तो स्वतःला देव असे जाहीर करील.*

***यशया*** *६०: २-३ आता अंधाराने जग व्यापले आहे आणि लोक अंधारात आहेत. पण परमेश्वराचा प्रकाश तुझ्यावर पडेल, त्याची प्रभा तुझ्यावर पसरेल. ३ राष्ट्रे तुझ्या प्रकाशाकडे (देवाकडे) येतील. राजे तुझ्या तेजस्वी प्रकाशाकडे येतील.*

*प्रगटी २२:११ जे मनुष्य अयोग्य वागतो. तो आणखी चुकीचे वर्तन करीत राहू दे! जो मलिन आहे, त्याला आणखी मलिन राहू दे! जोमनुष्य पवित्र आहे, त्याला आणखी पवित्रपणाने चालू दे."*

**वरील शास्त्रवचनांवरून, दुसऱ्या येण्यापूर्वी तीन अतिरिक्त चिन्हे आहेतः**

**येणे :विद्रोह उद्भवतो (एक मोठा घसरण होत आहे)** २ थेस्सलनी २: ३ हा विद्रोह किंवा घसरण होणे (ग्रीकः अपुपासाटीआ म्हणजे काहीतरी वेगळे किंवा घटस्फोट करणे) शेवटच्या काळाची भावना आहे जेथे प्रकाशाची मुले आणि अंधकाराची मुले वेगळे होत आहे यशया ६०:२ मध्ये सांगितल्या प्रमाणे. प्रगटी २२:११ मध्ये ''सुरू ठेवा'' हा शब्द म्हणजे ''मोठ्या प्रमाणात''. यास्तव, पवित्रांपासूनच दुर्जनांचे वेगळे होणे मोठ्या प्रमाणात होईल.

**शेवटच्या काळातील जगभरातील संजीवन आणि जागृती** ज्यात जग भारतील लोक व त्यांचे शासक ह्यांच्या आत्म्यांचे पिक प्राप्त होईल.(यश ६०: २-३).

**स्वतःला देव म्हणविणारा ख्रिस्तिय विरोधक प्रत्यक्ष प्रगट होईल**(२ थेस्सलनी २: ३ ख -४).

**इतर शास्त्रवचनेः**

*१ तींमथी ४: १-३ आत्मा स्पष्ट म्हणतो की, नंतरच्या काळात काही जण विश्वास सोडतील, ते भविष्य सांगणारे आत्मे, जे फसविणारे आहेत त्यांच्याकडे लक्ष देतील, २ आणि भूतापासून येणाऱ्या शिक्षणाकडे आणि ढोंगी फसविणाऱ्यां कडे लक्ष देतील. ३ ते लोकांना लग्न करण्यास मना करतात व काही अन्नपदार्थ टाळण्यासाठी सांगतात. जे विश्वासणारे आहेत, व ज्यांना सत्य माहीत आहे अशांनी उपकार मानून घेण्यासाठी देवाने ते निर्माण केले आहेत.*

*२ तींमथी ३: १-५ हे लक्षात ठेवः शेवटच्या दिवसांत कठीण समय आपल्यावर येतील. २ लोक स्वार्थी, धनलोभी, बढाईखोर, गर्विष्ठ, शिव्याशाप देणारे, आईवडिलांची आज्ञा न मानणारे, कृतघ्न, अधार्मिक ३ इतरांवर प्रीती नसणारे, क्षमा न करणारे, चहाडखोर, मोकाट सुटलेले, क्रूर, चांगल्याच्या विरुद्ध असले. ४ विश्वासघातकी, उतावीळ, गर्वाने फुगले, देवावर प्रेम करण्यापेक्षा चौनीची अधिक आवड धरणारे असे होतीलय ५ ते देवाच्या सेवेचे बाहेरचे स्वरूप चांगले राखतील, परंतु त्याचे सामर्थ्य नाकारतील. त्यांच्यापासून नेहमी दूर राहा.*

*२ थेस्सलनी २: ३-४ तर कोणीही तुम्हाला कोणत्याही प्रकारे फसवू नये. म्हणून सावध असा. मी असे म्हणतो कारण पहिल्यांदा मोठी बंडखोरी झाल्याशिवाय प्रभूचा दिवस येणार नाही. आणि जो नाशासाठी नेमला आहे, तो नियम मोडणारा प्रकट होईल. ४ तो विरोध करील आणि स्वतःला सर्व गोष्टींच्या वर उच्च करील. त्याला देव किंवा उपासना करण्याची कोणतीही एखादी वस्तु असे म्हणतील. येथपर्यंत की तो देवाच्या मंदिरात जाईल आणि सिंहासनावर बसेल आणि तो स्वतःला देव असे जाहीर करील.*

<u>नकारात्मक कल</u>

**चिन्ह १:** समुद्रातील गर्जना आणि कोंब फुटेल तेव्हा राष्ट्र क्लेश सहन करतील व गोंधळून जातील. (लूक २१:२५, मत्तय २४: ७). १ ९ ६०-२०१० **च्या शांतता आणि समृद्धीचा युग संपला आहे आणि त्याची पुन्हा पुनरावृत्ती होणार नाही.**मध्य पूर्व अशांतीत आयसीस सोबत हे होत आहे. युरोपमधील सीरियन शरणार्थी याचा अर्थ असा होतो की अनेक दहशतवादी लपून स्वार होत आहेत. पॅरिस नोव्हेंबर २०१५ दहशतवाद्यांनी केलेला हल्ला - पोप फ्रान्सिस म्हणाले, ही तिसऱ्या महायुद्धाची सुरवात आहे. आर्थिक बाजारपेठा हाताबाहेर होत आहे. जागतिक तापमानवाढीमुळे पूर येण्याची शक्यता वाढत आहे.

**चिन्ह** २: बरेच लोक विश्वासापासून दूर जातील . दुष्टपणात वाढ . . सर्वात जास्त प्रेम थंड होणे (मत्तय २४: १०-१२, १ तिमथी ४: १, २ तिमथी ३: १-५).

दुष्टपणा वाढणे: अश्लीलता, समलैंगिकता, विवाह बंधना शिवाय एकत्र राहणे, घटस्फोट. आज आम्ही एका पोस्ट-ख्रिश्चन काळाबद्दल बोलत आहोत. फक्त १०० वर्षांपूर्वी, वेल्स, इंग्लंड, यू.एस. मध्ये मोठे संजीवन आले आज ते त्यांच्या वारसा विसरले आहेत.

**चिन्ह** ३: मोठ्या संकटाचा काळ सुरु होईल तेव्हा स्वतःला ख्रिस्त म्हणविणारा ख्रिस्त विरोधक प्रकट होईल. (मत्तय २४:१५, २ थेस्सल २: ३-४).

सकारात्मक कल

**चिन्ह १: शेवटच्या काळातील जागतिक संजीवन:** यशया ६०: १-३ "यरूशलेम, माझ्या ज्योती, ऊठ. तुझा प्रकाश (देव) येत आहे. परमेश्वराची प्रभा तुझ्यावर फाकेल. २ आता अंधाराने जग व्यापले आहे आणि लोक अंधारात आहेत. पण परमेश्वराचा प्रकाश तुझ्यावर पडेल, त्याची प्रभा तुझ्यावर पसरेल. ३ राष्ट्रे तुझ्या प्रकाशाकडे (देवाकडे) येतील. राजे तुझ्या तेजस्वी प्रकाशाकडे येतील.

**चिन्ह २:जे लोक त्यांचे देव ओळखतात ते महान गोष्टी करतील आणि अनेकांना शिकवतील:** *दानियल*

*११: ३१-३३ यरुशलेमच्या मंदिरात भयानक कृत्ये करण्यासाठी उत्तरेचा राजा सैन्या पाठवील ते सैन्य लोकांना नित्याचे होमार्पण अर्पणे करू देणार नाहीत.मग तो काह?तरी खरखरच भयंकर कत्य करतील विनाशास कारणीभत हणारी भयंकर गोष्ट ते स्थापन करतील. ३२ "पवित्र कराराला अनुसरण्याचे सोडून दिलेल्या यहुद्यांना उत्तरेचा राजा खोटे नाटे सांगून आणि गोड बोलून फसवील. ते यहूदी तर त्याहून वाईट पाप करतील.पण जे यहूदी देवाला जाणतात व देवाच्या आज्ञा पाळ?तात ते यहूदी वलवान होतील.ते हल्ला परतवितील. ३३ सुज्ञ यहूदी पुष्कळ लोकाना शिकवतील आणि इतर लोकांना घडणाऱ्या गोष्टी समजावून सांगतील पण त्यांच्यापैकी काहीजणांना सुध्दा छळ सोसावा लागेल.अशा काहिंना तलवारीने मारले जाईल ,काहिंना जाळण्यात येईल,किंवा तूरूंगात टाकण्यात येईल.काहिंची घरे आणि वस्तु काढून घेण्यात येईल.*

<u>ही पिढी (खाली लूक २१:३२)</u>: ही चिन्हे पूर्ण होईपर्यंत ही पिढी नष्ट होणार नाही. पवित्र शास्त्रातील पिढी १०० वर्षे आहे (उत्पत्ती १५: १३-१६) म्हणून मी ''विचार करतो'' -आपण १०० वर्षांत किंवा त्यापूर्वीच्या काळात प्रकट होणारी अंतिम वेळा पाहू शकतो.

*लूक २१: ३२-३६ मी तुम्हांस खरे सांगतो की, ह्या सर्व गोष्टी घडून येईपर्यंत ही पिढी नाहीशी होणार नाही. ३३ आकाश व पृथ्वी नाहीशी होतील पण माझी वचने नाहीशी होणार नाहीत. ३४ सावध राहा, दारुबाजी आणि अधाशीपणात तुमचा वेळ घालवू नका, किंवा ऐहिक गोष्टींमध्ये मग्न राहू नका. जर तुम्ही तसे कराल, तर तुम्ही व्यवस्थित विचार करु शकणार नाही, व तुम्ही तयार नसताना तो दिवस (शेवट) अकस्मात तुमच्यावर येईल. ३६ सर्व समची जागृत राहा. होणाऱ्या सर्व गोष्टींपासून जिवंत राहण्यासाठी आणि विश्वासाने मनुष्याच्या पुत्रासमोर उभे राहणे शक्य व्हावे यासाठी प्रार्थना करा."*

**आत्ताच तयारी करा**

**योग्य दिशेने अधिकाधिक जात रहा**: या पिढीत *प्रगटी २२:११* जे मनुष्य अयोग्य वागतो. तो आणखी चुकीचे वर्तन करीत राहू दे! जो मलिन आहे, त्याला आणखी मलिन राहू दे! जोमनुष्य पवित्र आहे, त्याला आणखी पवित्रपणाने चालू दे."

**भीतीमुळे चुकीचे निर्णय घेण्यास अनेक लोक प्रेरित होतील**- सावध राहा, दारुबाजी आणि अधाशीपणात तुमचा वेळ घालवू नका, किंवा ऐहिक गोष्टींमध्ये मग्न राहू नका. जर तुम्ही तसे कराल, तर तुम्ही व्यवस्थित विचार करु शकणार नाही, व तुम्ही तयार नसताना तो दिवस (शेवट) अकस्मात तुमच्यावर येईल. *(लूक ३१:२४).*

**विश्वास योग्य निर्णय घेण्यास मदत करेल ''जागृत रहा व प्रार्थना करा''** *(लूक २१:३६).*

जागृत रहाणे- वेळाची लक्षणे समजून घेण्यासाठी मनाची क्रिया आहे प्रार्थना दृ देवाशी संलग्न होण्याकरिता हृदयाची क्रिया

-------------------------------------- समाप्त ---------------------------------------